## तिसरी मुलगी झाल्याने पत्नीला जिवंत जाळले

■ **वृत्तसंस्था, परभणी, दि. २८ :**
माणुसकीला लाजवेल अशी घटना परभणी जिल्ह्यातून समोर आली आहे. या घटनेत तिसरीही मुलगी झाल्यामुळे संतापलेल्या पतीने पत्नीला जिवंत पेटवून दिले. या घटनेनंतर महिलेने जीव वाचवण्यासाठी धाव घेतली, मात्र तिचा मृत्यू झाला.

परभणी शहरातील उड्डाणपूल परिसरात कुंडलिक काळे आणि त्यांची पत्नी व मुली राहतात. कुंडलिका काळे यांना पत्नीपासून आधी दोन मुली होत्या. या दोन मुलींनंतर त्यांच्या पत्नीला पुन्हा एकदा मुलगी झाली. त्यामुळे कुंडलिक काळे हे चांगलेच संतापले. रागाच्या भरात पत्नीवर पेट्रोल टाकून तिला जिवंत जाळले.


Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २७१ * * नागपूर * रविवार, दिनांक २९ डिसेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)







### थोडक्यात..

#### प्रयागराजमध्ये १०० फूट उंच टॉवर कोसळला

■ **प्रयागराज :** उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये १०० फूट उंच टेंशन लाइन टॉवर कोसळला. या अपघातात एका कामगाराला पाय गमवावा लागला आणि तो खाली पडला. टॉवरखाली २ कामगार दाबले गेले. या घटनेत ७ मजूर गंभीर जखमी झाले आहेत. अपघातानंतर घटनास्थळी एकच गोंधळ उडाला.
ही घटना शनिवारी दुपारी २ वाजता गंगापार येथील सराईनायत पोलिस ठाण्याच्या हद्दीतील साहसोन परिसरात घडली. रिंगरोडच्या बांधकामामुळे जुने टॉवर हटवून नवीन टॉवर बसवले जात आहेत. ३३ हजार व्होल्टची हाय टेंशन लाईन बदलण्यात येत आहे.

#### हिमाचलमध्ये बनवलेल्या २७ औषधांचे नमुने फेल

■ **नालागड :** हिमाचल प्रदेशमध्ये उत्पादित २७ औषधांचे नमुने निकामी आढळले आहेत. ही औषधे सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनच्या मानकांची पूर्तता करत नाहीत. याबाबत सीडीएससीओने ड्रग अलर्ट जारी केला आहे. राज्य औषध नियंत्रकाने या उद्योगांना नोटिसाही बजावल्या आहेत.

हिमाचलमधून बनवलेल्या औषधांचा देशभरात पुरवठा केला जातो. सॅम्पल फेल झाल्यानंतर औषध नियंत्रकांनी या फार्मा कंपन्यांना औषधांचा साठा परत मागवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या कंपन्यावर कारवाई प्रस्तावित आहे.

### वाल्मीकला अटक आणि मुंडेंच्या राजीनाम्याची एका सुरात मागणी

# बीडमध्ये सर्वपक्षीयांचा मोर्चा

**संतोष देशमुख हत्यांकाड**

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. २८ :**
बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडाप्रकरणी आज बीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. या मोर्चानंतर आयोजित करण्यात आलेल्या सभेत सर्वच पक्षांच्या नेत्यांनी एका सुरात या प्रकरणी वाल्मीक कराड याला अटक करण्याची व मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

संतोष देशमुख यांची हत्या करणाऱ्यांना लवकरात लवकर अटक करून कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जनतेची आहे. जनतेची जी मागणी आहे तीच मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची हवी, असे मनोज जरांगे म्हणाले.

तुम्ही त्यांच्यासोबत चहा प्यायला लागले तर गुंडगिरी कशी कमी होणार? असा सवालही मनोज जरांगे यांनी केला. तुम्ही गुंडगिरीला बळ द्यायला लागले आहेत. तुम्ही आल्यापासून हे पूर्ण दबायला पाहिजेत, हे तर जास्तच सक्रीय झाले, असा घणाघात मनोज जरांगे यांनी यावेळी केला. सरकारला गुंडच पोसायचे असून हे राज्य वेगळ्या दिशेने न्यायचे असल्याचा आरोपही मनोज जरांगे यांनी यावेळी केला.

बीड जिल्ह्यात आज कायदा सुव्यवस्था नावाला राहिली नाही. संतोष देशमुख हे हेवा वाटणारे माणूस होता. त्यांना संपवण्याचे काम या परळीच्या लोकांनी केले. या सर्वांचे मूळ विंड मिलच्या खंडणीच्या प्रकरणात लपले आहे. आज २० दिवस झाले, पण संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांचा शोध लागला नाही. वाल्मीक कराड या प्रकरणातील आका आहे. तर त्याचा सूत्रधार हे धनंजय मुंडे



आहेत. त्यामुळे त्यांना मंत्रिमंडळात राहण्याचा अधिकार नाही, मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी केली.

**'वाल्यांना' थांबवण्याची वेळ**

आता बीडमधील 'वाल्यांना' थांबवण्याची वेळ आली आहे. नाही तर महाराष्ट्रात सर्वत्र असे लोक तयार होतील. आज व्यक्त होणारी जनता बीडमध्ये रस्त्यावर उतरली आहे. अशी जनता महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरली, तर या शासनाला पळता भुई थोडी होईल. त्यामुळे वेळीच सावध व्हा, असे आमदार जितेंद्र आव्हाड म्हणाले.

आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या मोर्चातील सभेतून थेट धनंजय मुंडे यांच्यावर हल्ला चढवला. बीडचे पालकमंत्री व पोलिसांनी मिळून जिल्ह्याचा सत्यानाश केला, असे ते म्हणाले.

दरम्यान, आमदार प्रकाश सोळंके, आमदार अभिमन्यू पवार, आमदार संदीप क्षीरसागर, मराठा नेता नरेंद्र पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनी हजेरी लावत धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली.

**सुरेश धस यांचा पंकजा मुंडेंवर घणाघात**

गोपीनाथ मुंडे यांनी आपल्या काळात मटक्याचा खटका बंद केला. मुंबईतील गँगवॉर बंद केले. त्यांच्यासोबत आम्ही काम केले. पण आता पंकजा मुंडे यांना चांगली माणसे चालत नाहीत. त्यांना जी हुजूर करणारी माणसे हवी आहेत. पण आम्ही जी हुजूर करणारे नव्हे तर स्वाभीमानी माणसे आहोत. आम्ही भलेही राजकारणात बाजूला पडू. पण तुमच्यापुढे जी हुजूर करणार नाही, असेही सुरेश धस यावेळी म्हणाले.

# मनमोहन सिंग पंचतत्वात विलीन

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २८ :**
माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यावर शनिवारी निगम बोधघाट येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. लष्कराच्या तोफखाना गाडीमधून त्यांचे पार्थिव दिल्लीतील निगमबोध घाटावर आणण्यात आले. येथे तिन्ही सैन्याने त्यांना सलामी दिली. यानंतर शासकीय इतमामात अंत्यसंस्काराचे विधी पार पडले.

मनमोहन यांच्या पत्नी गुरशरण कौर, मोठी मुलगी उपिंदर सिंग (६५), दुसरी मुलगी दमन सिंग (६१) आणि तिसरी मुलगी अमृत सिंग (५८) निगम घाटावर उपस्थित होते. या कुटुंबाने पंतप्रधान मोदींचीही भेट घेतली. मुलीने मुखाग्नी दिला.

अंत्यसंस्काराच्या वेळीही मनमोहन सिंग यांना निळी पगडी घातली होती. फेंट निळा हा मनमोहन यांचा आवडता रंग आहे आणि त्यांना केंब्रिज विद्यापीठाच्या दिवसांची आठवण करून द्यायचा, म्हणूनच ते नेहमी निळा पगडी घालत असत.

लष्कराच्या तोफखाना वाहनातून त्यांचे पार्थिव निगमबोध घाटावर आणण्यात आले होते. राहुल गांधी मृतदेहासोबत गाडीत बसले होते. सोनिया गांधी, प्रियंका गांधी आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते घाटावर उपस्थित आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मनमोहन यांना अखेरची श्रद्धांजली वाहिली.
मनमोहन यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या निवासस्थानातून काँग्रेस मुख्यालयात आणण्यात आले होते. डॉ. सिंग यांच्या पत्नी गुरशरण कौर आणि मुलगी दमन सिंग यांनी काँग्रेस मुख्यालयात त्यांना श्रद्धांजली वाहिली. राहुल गांधी, सोनिया आणि प्रियंका यांच्याशिवाय काँग्रेसच्या इतर नेत्यांनी मनमोहन यांना अखेरचा निरोप दिला.

**मुलीने दिला मुखाग्नी ■ तिन्ही सैन्य दलाची सलामी**



दरम्यान, निगमबोध घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याने काँग्रेसने नाराजी व्यक्त केली. केसी वेणुगोपाल म्हणाले, माजी पंतप्रधानांचे स्मारक बांधण्यासाठी सरकारला जमीनही मिळू शकली नाही. हा देशाच्या पहिल्या शीख पंतप्रधानांचा अपमान आहे.
मनमोहन सिंग यांचे ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यात आले त्याच ठिकाणी स्मारक बांधले जावे, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोदी-शहा यांच्याकडे केली होती. मात्र, स्मारकाचे नेमके ठिकाण ठरवण्यासाठी काही दिवस लागू शकतात, असे गृहमंत्रालयाने रात्री उशिरा सांगितले. डॉ.मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री निधन झाले.
मनमोहन सिंग २००४ मध्ये देशाचे १४ वे पंतप्रधान बनले. या पदावर त्यांनी मे २०१४ पर्यंत दोन टर्म पूर्ण केल्या होत्या. ते देशातील पहिले शीख आणि सर्वाधिक काळ सेवा करणारे चौथे पंतप्रधान होते.
त्यांच्या निधनाबद्दल केंद्राने ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. काँग्रेसने ३ जानेवारीपर्यंतचे सर्व कार्यक्रम रद्द केले आहेत.

## धसांनी माफी मागावी
### प्राजक्ता माळीचा संताप

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :**
भाजप आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका करताना अभिनेत्री प्राजक्ता माळीचा उल्लेख केला होता. यावरूनच राजकारणात कलाकारांना का खेचता? असा सवाल अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने सुरेश धस यांना केला आहे.



या प्रकरणावर शांत राहा, असे मला सर्वांनी सांगितले. या सर्व आवया येतात आणि निघून जातात. चिखलफेक होऊ नये, म्हणून मी इतके दिवस शांत बसले. परंतु, लोकप्रतिनिधी आपल्यावर चिखलफेक करतात, त्यावेळी बोलणे गरजेचे आहे, असे प्राजक्ता माळी म्हणाली.

या प्रकरणी मी महिला आयोगाकडे तक्रार केली आहे, आमचे कलाक्षेत्र बदनाम नाही, परंतु, अशा माणसांमुळे आमचे कलाक्षेत्र बदनाम होते, असेही तिने सांगितले. ती आज पत्रकार परिषदेत बोलत होती. दरम्यान आपण माफी मागणार नसल्याचे आमदार सुरेश धस यांनी स्पष्ट केले.

## हत्या प्रकरणातील फरार आरोपींची
# संपत्ती जप्त करा..
### मुख्यमंत्री फडणवीसांचे सीआयडीला आदेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :**
बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील फरार आरोपींची संपत्ती जप्त करा, असे आदेश मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सीआयडीला दिले आहे. बीड जिल्ह्यात ज्या लोकांचे बंदुकींसोबतचे फोटो समोर येत आहेत, त्यांची खातरजमा करून त्यांचा शस्त्र परवाना जप्त करा, असे आदेशही देवेंद्र फडणवीस यांनी बीड पोलिस अधीक्षकांना दिले आहेत.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर तीन आरोपी अद्यापही फरार आहेत. घटनेला जवळपास १९ दिवस उलटले, तरी अद्याप फरार आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले नाही. यामुळे विरोधकांनी सरकारला धारेवर धरले आहे.

त्यातच आता राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फरार आरोपींची संपत्ती जप्त करा, असे आदेश सीआयडीचे अतिरिक्त महासंचालक बुरडे यांना आदेश दिले आहेत. शिवाय तातडीने फेर आढावा घेण्यासही सांगण्यात आले आहे.

**४ अटकेत, मुख्य आरोपी फरार**

संतोष देशमुख हत्याकांडातील जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले आणि विष्णू चाटे या आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर मुख्य आरोपी सुदर्शन घुले आणि कृष्णा आंधळे, सुधीर सांगळे हे तिघे फरार आहेत.



जयराम चाटे आणि महेश केदार या दोन आरोपींना तांबवा या गावातून ताब्यात घेतले होते. प्रतीक घुले याला स्थानिक गुन्हे शाखेने पुणे जिल्ह्यातून ताब्यात घेतले, तर विष्णू चाटे याला बीड येथे महामार्गावर पाठलाग करून बेड्या ठोकल्या होत्या.

## देशमुख प्रकरणातील फरार आरोपींचा खून?
### दमानियांचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :**
आजचा मोर्चा म्हणजे राजकीय ड्रामा असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला आहे. त्यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. या प्रकरणातील आरोपींचा खून झाल्यासंदर्भात माहिती देणारा आपल्याला कॉल आला असल्याची माहितीही त्यांनी दिली. त्यामुळे या प्रकरणाची पोलिसांनी चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली.



पोलिस असो किंवा इतर प्रशासकीय यंत्रणा असेल, ते केवळ जी हुजुरी करत आहेत. ही सर्व यंत्रणा राजकीय लोकांनी सांगतले तेवढेच काम करत आहेत. हे आता थांबायला हवे, अशी मागणी दमानिया यांनी केली आहे.

या प्रकरणात अंजली दमानिया यांनी मोठा दावा केला आहे. आपल्याला आलेल्या कॉलचा हवाला देत या प्रकरणातील आरोपींचा खून झाल्याचे त्यांनी म्हटले आहे. या संदर्भातील माहिती आपण बीडच्या एसपींना दिली असून, पुढचे काम त्यांचे असल्याचे सांगत या प्रकरणात सखोल चौकशी करण्याची मागणी देखील त्यांनी केली.

## सलग पाचव्या दिवशी गोळीबार
# महिला व पत्रकार जखमी

■ **वृत्तसंस्था, इंफाळ, दि. २८ :**
इम्फाळ पूर्व, मणिपूर येथे सलग पाचव्या दिवशी कुकी आणि मैतेई गटांमध्ये गोळीबार सुरू आहे. शुक्रवारी रात्री उशिरा थामनपोकपी आणि सणसबी येथे झालेल्या गोळीबारात एक महिला जखमी झाली. दरम्यान, शनिवारी सकाळी झालेल्या गोळीबारात एका स्थानिक वृत्तवाहिनीचा व्हिडिओ पत्रकार जखमी झाला.

शुक्रवारीही सांसाबी भागात दहशतवाद्यांशी झालेल्या चकमकीत एक पोलीस कर्मचारी आणि एक गावकरी जखमी झाले होते. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार येथे मोर्टारही डागण्यात आले.

दुसरीकडे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह म्हणाले, मी इम्फाळ पूर्वेतील सांसाबी आणि थमनापोकपी येथे कुकी अतिरेक्यांनी केलेल्या गोळीबाराचा तीव्र निषेध करतो. निरपराधांवर हा भ्याड हल्ला म्हणजे



मणिपूरच्या शांतता आणि सौहार्दावर हल्ला आहे.

गोळीबारात जखमी झालेल्या पत्रकाराच्या पायाला गोळी लागली. त्यांना तातडीने इंफाळ पश्चिम येथील राज मेडिसिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## वाल्मीक कराड फरार, पत्नीची चौकशी



सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सीआयडीने कसून चौकशी करण्यास सुरू केले आहे. या प्रकरणात वाल्मीक कराड यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून सध्या ते फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी सीआयडीने आता त्यांची पत्नी मंजिली कराड यांची चौकशी केली आहे.

वाल्मीक कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यावर देखील आरोप केले जात आहेत.

# सामाजिक संशोधन व सर्जनशील लेखकाचा समन्वय म्हणजे डॉक्टर मिलिंद बोकील

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २८ :**
जयप्रकाश नारायण यांच्या आंदोलन व लढ्यातून प्रेरणा घेऊन ज्यांचं तारुण्य घडलं असे गाव स्तरातून ते अंतरराष्ट्रीय स्तरावर दोन्ही पटलांवर सामायिकरित्या विचार मंथन करणारे सर्जनशील लेखक डॉ. मिलिंद बोकील यांच्यात सामाजिक संशोधन व सर्जनशील लेखकाचा समतोल समन्वय आढळून येतो, असे प्रतिपादन ९० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले . मारवाडी फाउंडेशन नागपूर द्वारा आयोजित श्रद्धेय प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार सोहळ्यात सत्कारमूर्ती डॉ. मिलिंद बोकील यांच्या संदर्भात ते बोलत होते.

बाबुराव धनवटे सभागृह येथे दैनिक महासागरचे संपादक व मारवाडी फाउंडेशनचे सचिव श्रीकृष्ण चांडक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून साधना साप्ताहिकचे संपादक विनोद शिरसाठ, वनराई फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी, रमेश बंग, पुनमचंद मालू, महेश बंग, नीता बोकील उपस्थित होते. यावेळी डॉक्टर अक्षय कुमार काळे यांच्या हस्ते डॉक्टर मिलिंद बोकील यांना १ लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला.

डॉक्टर अक्षय कुमार काळे आपल्या भाषणात म्हणाले की डॉ. मिलिंद बोकील यांनी आपल्या साहित्यामध्ये जान्हवी तोडा आणि माणसं जोडा, नारीच्या सहभागाशिवाय परिवर्तन नाही, सिंहासन खाली करा या तत्त्वांचा अंमल केला. त्यांच्या साहित्यामध्ये त्यांनी आदिवासी, स्त्रिया, पर्यावरण यांचा प्राधान्याने समावेश करीत सामाजिक प्रश्नांचा शोध घेत सामाजिक संशोधनावर भर दिला.

विनोद शिरसाठ म्हणाले की, मारवाडी फाउंडेशनचे ध्येय व उद्देश व त्यांचे कार्य याला अनुसरून आजच्या सूचविलेल्या सत्कारमूतींर्चे नाव अत्यंत सुसंगत आहे. डॉ. मिलिंद बोकील यांनी ललित वैचारिक व ललित साहित्यावर दोन डझन पुस्तके लिहिली. पण या दोन्ही साहित्यामध्ये त्यांच्या विचाराची व्यापकता, खोली व त्यांच्या वैचारिक मंथनाची ताकद ही सारख्याच तोडीची दिसून येते. त्यांच्या अर्ध्या अधिक साहित्याला जेवढा ग्रामीण तेवढाच आंतरराष्ट्रीय परिघ आहे आणि मराठी साहित्यामध्ये असा समतोल साधणारा दुसरा आढळून येणार नाही.



श्रद्धेय प्रबोधनकार ठाकरे समाज प्रबोधन पुरस्कार

सत्कारमूर्ती डॉ. मिलिंद बोकील सत्काराला उत्तर देताना म्हणाले की प्रबोधनकाराचा पुरस्कार एका लेखकाला मिळणे हे खरे तर धाडसाचे पाऊल आहे. यावेळी त्यांनी प्रबोधनकार ठाकरे विषयी वैचारिक मंथन करीत सांगितले की त्यांच्यासारखे प्रबोधनकार हे जैविक वारसदाराऐवजी त्यांच्या विपरीत काम करीत असतात. तेव्हा आपल्यासारख्या सामान्यांना रानडे, तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, विनोबा, महात्मा गांधी यांचे वारसदार होणे आवश्यक आहे. आज देशाला मार्क्सची आवश्यकता आहे. देश मार्क्सला विसरला आहे पण कामगारांची अवस्था लक्षात घेता त्याच्या विचारांची रुजवणूक होणे आवश्यक आहे. आज आपल्याला प्रदेशाच्या किंवा राज्याच्या चौकटीत न राहता विश्वाची काळजी करण्याची गरज आहे.

दैनिक महासागरचे संपादक श्रीकृष्ण चांडक आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, कला ही कलेसाठी असायला पाहिजे की ती जीवनासाठी असायला पाहिजे या वादामध्ये मिलिंद बोकील यांनी सुंदर संगम साधला आहे. आज जात, धर्म, पंथ यामध्ये समाजकारण व राजकारण ढवळून निघत आहे. या जात, धर्म, वंश याच्या पलीकडे जाऊन व्यक्तीची ओळख ही त्याच्या चारित्र्यावरून व कर्तुत्वावरून व्हायला पाहिजे. आणि याच दृष्टिकोनातून हा पुरस्कार गेल्या १७-१८ वर्षापासून देऊन सामाजिक प्रबोधन घडविण्याचे कार्य मारवाडी फाउंडेशन करीत आहे.

प्रारंभी गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले. संचालन शुभदा फडणवीस यांनी केले. कार्यक्रमाला मारवाडी फाउंडेशनचे सदस्य व साहित्य कला प्रेमी उपस्थित होते.

## बीडचा बिहार करायचाय का?

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २८ :**
स्वाभिमानी शेतकरी पक्षाचे नेते संभाजीराजे भोसले यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी या प्रकरणावरून मंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांच्यावर जोरदार टीका केली. बीडचा बिहार करायचा आहे का? असा सवाल त्यांनी केला. तुमच्यात धमक असेल, तर आता काम करून दाखवा, असा इशाराही त्यांनी अजित पवारांना दिला.



संतोष देशमुखला ज्या क्रूर पद्धतीने मारले, त्याची हत्या केली. शिवाजी महाराजांच्या घरात जन्म होऊनही मला ते पाहावले नाही. हा महाराष्ट्र आहे. हा शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे का? हे संस्कार शिवाजी महाराजांनी दिले का? ज्या क्रूरपणे मारले गेले. हे दुर्दैव आहे, असे संभाजीराजे यावेळी म्हणाले.

भाषणात संभाजीराजे यांनी थेट मंत्री धनंजय मुंडे यांचे नाव घेतले. ते म्हणाले, आरोपींचा जो म्होरक्या आहे, तो धनंजय मुंडे आहे. हे मी नाव घेऊन सांगतोय. आश्रयदात्या धनंजय मुंडेंना मंत्रिपद देऊ नका, असे मी सांगितले होते. मला दहशत चालत नाही. येथे कुणी दहशत करत असेल, तर मी या ठिकाणी येईल. बीडचा बिहार करायचाय का..? असा सवाल संभाजी राजे यांनी केला.

# अभ्यास दौऱ्यावर १२ लाखांची उधळपट्टी?

■ महासागर प्रतिनिधी
पालघर, दि. २९:

पालघर जिल्हा परिषदेच्या पदाधिकारी व सदस्यांचा तामिळनाडू अभ्यास दौरा वादात सापडला आहे. सदस्यांचा कार्यकाळ दोन महिन्यांनी संपणार असताना १२ लाख रुपयांचा हा अभ्यास दौरा कशासाठी आणि याचे फलित काय, असा प्रश्न उपस्थित झाला असून हा दौरा म्हणजे करदात्यांच्या पैशाची उधळपट्टी असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

तामिळनाडू राज्यातील मत्स्य, शेती, डोंगराळ भागातील शेती, शैक्षणिक ज्ञानासाठी भेट, पर्यटन स्थळांना भेट, नारळ लागवड व मिळणारे उत्पन्न याबाबत १८ ते २३ डिसेंबर दरम्यान जिल्हा परिषद सदस्यांच्या अभ्यास दौ?याचे आयोजन करण्यात आले होते. याकरिता जिल्हा परिषद सेस फंडातून १२ लाख रुपयांची एकत्रित तरतूद सामान्य प्रशासन विभागाकडून करण्यात आली होती.

या दौऱ्यात जिल्हा परिषदेचे ५७ व आठ पंचायत समिती सभापती अशा एकूण ६५ सदस्यांपैकी ५० सदस्यांनी प्रशिक्षण दौऱ्यात सहभागी झाले होते. मात्र जिल्हा परिषदेच्या विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ १७ फेब्रुवारी २०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने या अभ्यास दौऱ्यात मिळालेल्या माहितीचा वापर कसा व कुठे करणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

विद्यमान पदाधिकारी व सदस्यांच्या उर्वरित कार्यकाळात सर्वसाधारण सभेचे आयोजन शक्य नाही. मात्र काही योजनांची व कामांच्या मंजुरीसाठी स्थगित करण्यात आलेल्या निविदा प्रकियेवर निर्णय घेण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन केले जाण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत अभ्यास दौऱ्यात अवगत केलेल्या ज्ञानाचा वापर विकास कामाच्या नियोजनात कसा व कधी होणार याबद्दल प्रश्न विचारले जाऊ लागले आहेत.

मुंबई तसेच राज्यात शीतगृह, मत्सवस्थापन केंद्र, शेती व्यवस्थापन व संशोधन केंद्र अनेक ठिकाणी अधिक प्रमाणात विकसित असताना यासाठी तामिळनाडूत अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्याची गरज का निर्माण झाली त्याबद्दल जिल्हा परिषद प्रशासन समाधानकारक उत्तर देऊ शकले नाही. भातशेती, शाळा, मासळी बाजार व नारळ उत्पादनांची ओझरती पाहणी करून सदस्यांना काय शिकायला मिळले याबद्दल देखील चर्चा सुरू आहे.

करोना काळानंतर जिल्हा परिषदेने सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात कुलुमनाली, पंजाब असा दौरा आयोजित केला होता तर सन २०२३-२४ या वर्षात केरळ राज्यात अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही दौऱ्याला प्रत्येकी १२ लाख रुपये जिल्हा परिषद कार्यालयाकडून देण्यात आले होते. उर्वरित खर्च हा जिल्हा परिषद सभापती व सदस्य यांच्यामार्फत करण्यात आल्याचे स्पष्टीकरण जिल्हा परिषदतर्फे देण्यात आले.

मात्र या दौऱ्याबाबत जिल्हा परिषदेच्या यापूर्वी झालेल्या सर्वसाधारण सभेत पाहणी केलेल्या ठिकाणांचा संदर्भ घेऊन नव्याने प्रस्ताव मांडल्याचे दिसून आले नाही. सभेदरम्यान वादविवाद, अध्यक्षांना संबोधित न करता इतर सदस्यांवर आरोप, खुर्चीवर बसून प्रश्न विचारणे व इतर बेशिस्तपणाचे वर्तनच दिसून आले. हे पाहता जिल्हा परिषदेच्या यापूर्वी आयोजित केलेल्या अभ्यास दौऱ्यातून सदस्यांनी शिस्तप्रियता अवलंबून नसल्याचे दिसून आले, असे म्हटले जाते.

एकीकडे जिल्हा परिषदेमधील निविदांचे वित्त विभागाकडून एकत्रिकरण करून निधीचे सुनियोजन करण्यासाठी झालेल्या प्रयत्नांविषयी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत प्रमुख सदस्यांनी समाचार घेतला होता. या अभ्यास दौऱ्याचे नियोजन करताना शासकीय संस्था अथवा तत्सम संस्थेकडून आयोजन करण्याऐवजी खाजगी टूर चालकाकडून दौऱ्याचे आयोजन झाल्याचे दिसून आले आहे.

अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर प्रकाश निकम यांनी सेसफंड (उत्पन्न) वाढवण्यासाठी आपण नियोजनबद्ध पद्धतीने प्रयत्न करू अशी घोषणा केली होती. नव्याने उत्पन्नाच्या माध्यमातून सेस फंडामध्ये विशेष वृद्धी झाली नसली तरीही या फंडातून अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करून खर्च होत असल्याचे म्हटले जात आहे.


### सेल्फी आणि स्टेटस्

या अभ्यास दौऱ्यादरम्यान मदुराई येथील मीनाक्षी मंदिर दर्शन, मदुराई सिल्क साड्या खरेदी, धनुष्यकोडी रामसेतू, विभीषण मंदिर, रामेश्वरम दर्शन, कोडाईकनाल अशा ठिकाणांना भेटी आयोजित करण्यात आल्या होत्या. पर्यटन दृष्टिकोनातून अभ्यासाच्या हेतूने अशा ठिकाणी सदस्याने काढलेले छायाचित्र व सेल्फी त्यांच्या समाजमाध्यमांवर झळकल्यामुळे अभ्यास दौरा वादात सापडला आहे.

दरवर्षी जिल्हा परिषद पालघर अंतर्गत कृषी, पशुसंवर्धन, शिक्षण, आरोग्य, बांधकाम, वित्त पाणीपुरवठा समाज कल्याण इत्यादी समितीच्या एकत्रित अभ्यास दौरा हा सामान्य प्रशासन विभागातर्फे करण्यात येत असतो. असे अभ्यास दौरा शासनाच्या धोरणात्मक दृष्ट्यांच्या अनुषंगाने इतर लोकप्रतिनिधी व सनदी अधिकारी दरवर्षी करीत असतात. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद पालघरने दरवर्षी एक अभ्यास दौरा करण्याचे योजिले होते.

**प्रकाश निकम**
**अध्यक्ष, जिल्हा परिषद**

## उद्धव ठाकरे यांचा परभणी आणि बीड जिल्हा दौरा



■ मुंबई, दि. २९ :
उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे परभणी आणि बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर जाणार आहेत. ते सोमनाथ सूर्यवंशी आणि संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या दोन्ही प्रकरणावरून राज्य सरकारला घेरण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीतील नेते करत आहेत.

बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात राज्य सरकारमधील काही नेत्यांची नावे देखील समोर येत आहे. या पार्श्वभूमीवर बीडमध्ये महामोर्चाचे आयोजन देखील करण्यात आले होते. या सर्व पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेणार आहेत. या आधी देखील महाविकास आघाडीतील अनेक नेत्यांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेतली होती.


## रेल्वेच्या धडकेत दोघांचा मृत्यू

**पालघर :** पालघर रेल्वे स्थानकाच्या उत्तरेला बंद असणाऱ्या फाटक ओलांडताना दोन तरुणांचा अपघाती मृत्यू झाला. या अपघातात एक सहकारी बचावला असून त्याला दुखापत झाली आहे. बोईसर पूर्वेला एका उद्योगात वेल्डिंग व इतर काम करणारे बिहार राज्यातील मोतीयारी जिल्ह्यातील तीन तरुण सुट्टी निमित गृहपयोगी वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालघर शहरात आले होते.

पूर्वेकडे जाण्यासाठी बंद असणारे फाटक ओलांडताना उपनगरीय गाडी आल्याने दोन रुळाच्या मध्ये असणाऱ्या जागेत तिघांपैकी दोघे थांबून राहिले. तेवढ्यात दुसऱ्या बाजूने भरधाव गाडी आल्याने या गाडीचा धक्का लागून दोघांचा मृत्यू झाला. रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती पालघरच्या माजी नगरसेविका लक्ष्मीदेवी हजारी यांनी दिली असून या तिघांपैकी एक तरुण लघुसंखेसाठी बाजूला गेल्याने अपघातात जखमी झाला.

सोनुराम अंदाजे (३५) आणि अनुप पंडित (२०) अशी मृतकांची नावे आहेत तर मोनुकुमार (१९) जखमी झाला. रेल्वेचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले असून मृतांचा नावाचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. काही दशकांपासून पालघर रेल्वे फाटक बंद करण्यात आले असले तरीही पर्यायी मार्ग नसल्याने रेल्वे फाटक ओलांडून शेकडो नागरिकांना पूर्व पश्चिम प्रवास करणे भाग पडत आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात बालक जखमी



**नाशिक :** नाशिकरोड येथील विहितगाव-वडनेर रोडवरील हंडोरे मळा येथे गुरूवारी संध्याकाळी दारात खेळत असलेल्या बालकावर बिबट्याने झडप घातली. आरडाओरड केल्यानंतर बालकाला सोडून बिबट्या पळून गेला. बालकाच्या मानेवर आणि डोक्यावर जखमा झाल्या असून जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

विहितगाव-वडनेर रोडवरील हंडोरे मळा वालदेवी नदीकिनारी आहे. या वस्तीतील चार वर्षीय ऋषिकेश प्रकाश चांद्रे हा आई स्वयंपाक करत असल्याने ओट्यावर खेळत होता. त्यावेळी जंगलातून आलेल्या बिबट्याने त्याच्यावर झडप घातली. बिबट्याने ऋषिकेशवर हल्ला केल्याचे आईच्या लक्षात आल्यावर त्यांनी आरडाओरड केली, तोपर्यंत बिबट्याने ऋषिकेशला काही अंतरापर्यंत फरपटत नेले होते. आरडाओरड ऐकून बिबट्याने ऋषिकेशला सोडून वालदेवी नदीकिनारी असलेल्या जंगलात पळ काढला. जखमी ऋषिकेशला प्रथम बिटको रुग्णालयात दाखल करण्यात आले. मानेवर, डोक्यावर बिबट्याचे नख आणि दात लागल्याने रक्तबंबाळ झालेल्या ऋषिकेशला त्यानंतर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

माजी नगरसेवक जगदीश पवार, राष्ट्रवादीचे पदाधिकारी विक्रम कोठुळे यांनी वनविभागाशी संपर्क साधून जखमी ऋषिकेशच्या परिवाराला आर्थिक मदत द्यावी आणि परिसरात पिंजरा लावण्यात यावा, अशी मागणी केली. वनाधिकारी अनिल अहिरराव, विजयसिंग पाटील यांनी रुग्णालयात जाऊन जखमीची विचारपूस केली. घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

## रिक्षा चालकाकडून तरुणीवर अत्याचार

**मुंबई :** बदलापूरमध्ये एका तरुणीवर रिक्षाचालकाने अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पीडितेच्या मैत्रिणीने आधी तिला बीअर पाजली आणि तिची शुद्ध हरपल्यानंतर तिला रिक्षाचालक मित्राकडे सोपवले. या प्रकरणी पोलिसांनी कारवाई करत पीडितेची मैत्रिण आणि रिक्षा चालकाला अटक करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत राहणारी ही 19 वर्षाची तरूणी शिक्षण घेत आहे. ती कुटुंबीयांसह मुंबईत राहते. या प्रकरणात बदलापूर पोलिसांनी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून दत्ता जाधव, नायर या संशयितांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पीडित तरुणी तिच्या मैत्रिणीला भेटण्यासाठी आली होती. यावेळी बदलापूरच्या मैत्रिणीने दत्ता या तिच्या रिक्षाचालक मित्राला सोबत बोलावून घेतले. यावेळी त्यांनी तिघांनी सोबत दारु पिली. दारु पिल्ल्यानंतर तरुणीची शुद्ध हरपल्यानंतर तिचा गैरफायदा घेत रिक्षाचालक दत्ता जाधव याने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडित तरुणीच्या मैत्रिणीनेही या कृत्यात त्याची साथ दिली. पोलिस रिक्षाचालक दत्ताला अटक करण्यासाठी गेले. त्यावेळी तो पोलिसांच्या भीतीने बहिणीच्या घरातील लोखंडी कपाटात लपून बसला होता. गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक राजेश गज्जल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनु शर्मा तपास करत आहेत.

# मध्य रेल्वेच्या वातानुकूलित लोकलमध्ये बिघाड

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९:



गेल्या अनेक महिन्यांपासून मध्य रेल्वेच्या ढिसाळ कारभाराचा सामना प्रवाशांना करावा लागत आहे. वातानुकूलित लोकलमधून प्रवास करण्यासाठी अतिरिक्त दर मोजून देखील प्रवाशांना सामान्य लोकलमधून प्रवास करण्यास मध्य रेल्वे प्रशासन भाग पाडत आहे. त्यामुळे संतप्त प्रतिक्रिया येत आहे.

शुक्रवारी मध्य रेल्वेच्या वातानुकूलित लोकलमध्ये बिघाड झाला. त्यामुळे या लोकलच्या अनेक फेऱ्या रद्द करून सामान्य लोकल चालवण्यात आल्या.

मध्य रेल्वेवरील अनेक सामान्य लोकल फेऱ्या रद्द करून, वातानुकूलित लोकल सुरू केल्या. बहुसंख्य प्रवाशांनी खिसा खाली करून, सामान्य लोकलच्या तुलनेत वातानुकूलित लोकलचे वाढीव रकमेचे पास, तिकीट खरेदी करण्यास सुरुवात केली. परंतु, तांत्रिक बिघाडाने वातानुकूलित लोकलच्या फेऱ्या रद्द होत आहेत. त्यामुळे वातानुकूलित लोकलच्या पासधारकांना प्रचंड मनस्तापाला सामोरे जावे लागते. वातानुकूलित लोकलच्या फेऱ्या मोजक्याच असल्याने प्रवाशांनी त्यांच्या कामाच्या वेळा सांभाळून वातानुकूलित लोकलच्या वेळेत प्रवास करतात.

मात्र, एक वातानुकूलित लोकलची फेरी रद्द केल्यानंतर बराच वेळानंतर दुसरी गाडी येतो.

त्यावेळेत प्रवाशांना सामान्य लोकलमधून प्रवास करावा लागतो. त्यामुळे प्रवाशांचे तिकीटाचे पैसे वाया जातात. तसेच दुस?या वातानुकूलित लोकल फेरीची वाट पाहत राहिल्यास प्रवाशांच्या वेळेचा अपव्यय होतो. वातानुकूलित लोकलमध्ये तांत्रिक बिघाड वारंवार होत असल्याने प्रवासी वगार्तून नाराजीचा सूर उमटत आहे. याबाबत मध्य रेल्वे प्रशासनाविरोधात लवकरच आंदोलन करण्याचा इशारा प्रवाशांनी दिला आहे.

शुक्रवारी वातानुकूलित लोकलमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ७ लोकल फेऱ्या रद्द झाल्या. रद्द झालेल्या लोकलच्या वेळेत सामान्य लोकल चालवण्यात आल्या. अंबरनाथ - सीएसएमटी, सीएसएमटी - डोंबिवली, डोंबिवली - परळ, परळ-कल्याण, कल्याण-परळ, परळ-कल्याण, रात्री ११.०४ वाजताची कल्याण-ठाणे या वातानुकूलित रद्द केल्याचे रेल्वेने सांगितले.

## सोनसाखळी चोरणारी दोन मुले ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २९:

**आठ गुन्हे उघडकीस**

एकीककडे नाकाबंदी सुरू असतांना विना क्रमांक असलेली दुचाकी भरधाव वेगात आली आणि पोलीसांनी अडवत दुचाकी व अन्य काही चौकशी केली असता वाहनचालकाची उडालेली भंबेरी पाहता पोलीसांनी खास आपला दणका दिला. उपनगर पोलीसांच्या या दणक्यामुळे दोन विधी संघर्षित चोरट्यंकडून तब्बल सात लाखांहून अधिक किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात पोलीसांना यश आले.

सोनसाखळी चोरी करणाऱ्या दोन विधीसंघर्षित मुलांना उपनगर पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यामुळे आठ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यांच्याकडून सात लाखाहून अधिक रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. उपनगर पोलीस ठाणे तसेच नाशिक शहरातील अनेकांनी दुचाकीवरून येत चोरटे सोनसाखळी हिसकावून पळून जात असल्याची तक्रार नोंदवली होती. पोलीस आयुक्तांनी केलेल्या सुचनेनुसार उपनगर पोलीस आणि गुन्हे शोध पथकाने नाकाबंदी करुन तपासणी मोहीम सुरु केली होती.

विनानंबर असलेली दुचाकी वाहने ताब्यात घेत सोनसाखळी चोरी करणाऱ्यांचा शोध घेण्यात आला. गुरूवारी उपनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक जितेंद्र सपकाळे हे स्वतः तसेच गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक प्रभाकर सोनवणे व अन्य अधिकारी नाकाबंदीदरम्यान कार्यरत असताना एका विनानंबरच्या दुचाकीवरुन दोन जण भरधाव येताना दिसले. पोलिसांनी अडवून त्यांना त्यांच्या ताब्यातील दुचाकीविषयी माहिती विचारली असता त्यांना देता आली नाही. पोलिसांनी दुचाकीसह दोन्ही संशयितांना उपनगर पोलीस ठाण्यात आणले.

चौकशीत दुचाकी सातपूर पोलीस ठाणे हद्दीतून चोरल्याचे उघड झाले. म्हसरूळ परिसरातील सोनसाखळी चोरीचे सीसीटीव्ही चित्रण तपासले असता दुचाकी आणि दुचाकीस्वार यांचे वर्णन जुळल्याने पोलीसी खाक्या दाखवताच संशयितांनी चोरीची कबुली दिली. संशयितांविरुध्द उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनगर पोलीस आणि गुन्हे शोध पथकाने केलेल्या कारवाईत सहा लाख आठ हजार ४०० रुपयांची सोन्याची लगड तसेच एक लाख १० हजार रुपयांची दुचाकी असा सात लाख १८ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## राज्य नाट्य स्पर्धेच्या नाशिक केंद्रातून आवर्तन प्रथम



■ महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. २९:
६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत नाशिक केंद्रातून लोकहितवादी मंडळ या संस्थेच्या आवर्तन या नाटकाला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक तसेच भडक दरवाजा बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या ऐश्वर्या ब्युटी पार्लर या नाटकास द्वितीय तर, अर्थनिता फाउंडेशनच्या सेलिब्रिटी या नाटकाला तृतीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केली. या तीनही नाटकांची स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

येथील परशुराम साईखेडकर नाट्यमंदिरात २८ नोव्हेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडली. दिग्दर्शनासाठी प्रथम पारितोषिक -आर्या हिरे (ऐश्वर्या ब्युटी पार्लर), आनंद कुलकर्णी (आवर्तन), प्रकाश योजना -सागर पाटील (आवर्तन), विनोद राठोड (सशक्त), नेपथ्य- शैलेंद्र गौतम (विनाशकाले), वरूण भोईर (ऐश्वर्या ब्युटी पार्लर), रंगभूषा- माणिक कानडे (ऐश्वर्या ब्युटीपार्लर आणि आवर्तन), अभिनयसाठी रौप्य पदक झ्र राहुल गवांदे, रीया राज, आर्या प्रशांत, दर्शना कर्हु, वेदिका अंभोरे, अपूर्व इंगळे, मिलिंद कुलकर्णी, सचिन रहाणे, अभिषेक गायकवाड , भरत कुलकर्णी यांना जाहीर झाले आहेत.

## कुर्ल्यात भंगार गोदामांना भीषण आग

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९:




कुर्ल्याच्या खैराणी रोड परिसरात असलेल्या काही गोदामांना शनिवारी सकाळी भीषण आग लागली. सुदैवाने या आगीत कुठल्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मात्र अनेक गोदामे जळून खाक झाली आहेत.

शनिवारी पहाटे सहाच्या सुमारास खैराणी रोड येथील वाजीदअली कंपाऊंड परिसरात ही भीषण आग लागली होती. या परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक, लाकूड, ज्वलनशील पदार्थ आणि भंगाराची गोदामे आहेत.

आगीची माहिती मिळताच तेथील कामगारांनी बाहेर पळ काढला आणि तत्काळ अग्निशमन दलाला घटनेची माहिती दिली. त्यानुसार अग्निशमन दलाच्या ११ गाड्या तेथे दाखल झाल्या होत्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी सकाळी आकाराच्या सुमारास आगीवर नियंत्रण मिळवले.

मात्र तोपर्यंत तेथील आठ ते दहा गोदामे पूर्णपणे जळून खाक झाली होती. सुदैवाने त्या आगीमध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी झालेली नाही. मात्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

खैराणी रोड परिसरात मोठ्या प्रमाणात गोदामे असल्याने तेथील रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात वाहने उभी केली जातात. त्यामुळे तेथे वाहतूक कोंडी असते. आग लागल्यानंतर अग्निशमन दलाच्या जवानांनाही वाहतूक कोंडीमुळे घटनास्थळी पोहोचण्यास उशीर झाला.

## मुलीसह आईनेही घेतला गळफास

■ वृत्तसंस्था, जळगाव, दि. २९:
जळगाव जिल्ह्यातील एरंडोल शहरात जहांगीरपुरा भागात आईने मुलीसह घरात गळफास घेतला. पतीशी घटस्फोट झाल्यानंतर सपना माळी (३३) या माहेरी मुलगी केतकी माळी (वय ९) हिच्यासह वास्तव्यास होत्या. एका खासगी शाळेची नोकरी सोडून वर्षभरापासून त्या घरीच होत्या.

दुपारी घराच्या तिसऱ्या मजल्यावर असलेल्या खोलीचा दरवाजा आतून बंद करून त्यांनी मुलीसह गळफास घेतला. सुताराच्या मदतीने दरवाजा तोडला असता सपना आणि केतकी माळी या दोघींनी छताच्या कडीला वेगवेगळ्या ठिकाणी गळफास घेतल्याचे दिसून आले.

# शेतकऱ्यांच्या हक्कासाठी राज्यभर लढा..

## महिला शेतकरी परिषदेत निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
नाशिक, दि. २९:

महिला शेतकऱ्यांचे हक्क केंद्रस्थानी आणण्यासाठी राज्यभर जिल्हावार महिला शेतकऱ्यांच्या परिषदा आयोजित करून त्यांच्या प्रश्नांवर लढे उभारण्याचा निर्णय गुरुवारी भारतीय किसान सभेच्या पुढाकाराने येथे आयोजित महिला शेतकरी परिषदेत घेण्यात आला.

परिषदेत राज्यभरातील २३ जिल्ह्यांतून महिला शेतकरी सहभागी झाल्या होत्या. परिषदेचे उद्घाटन जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे यांच्या हस्ते झाले.

यावेळी महिलांनी समान हक्कांची मागणी करीत महिला शेतकऱ्यांचे हक्क व मागण्यांची सनद मंजूर केली. ढवळे यांनी महिलांना मालमत्तेमध्ये समान वाटा मिळाला पाहिजे. महिलांच्या घरातील व बाहेरील सर्व प्रकारच्या श्रमाची नोंद श्रम म्हणून व्हायला हवी. यासाठी संघर्ष करण्याची आवश्यकता मांडली.

मकाम संघटनेच्या नेत्या सीमा कुलकर्णी यांनी, शेतीतील महिलांचे श्रम एकूण शेती श्रमापैकी ८० टक्के असताना शेतीची मालकी मात्र महिला शेतकऱ्यांच्या नावे केवळ १४ टक्के, हे विषण्ण करणारे असल्याचे नमूद केले.

महिला शेतकऱ्यांना शेतकरी म्हणून खरीखुरी मान्यता मिळण्यासाठी शासकीय पातळीवर ठोस धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली.

अखिल भारतीय किसान सभा महिला शेतकऱ्यांच्या मागण्या केंद्रस्थानी आणण्यासाठी व महिलांचे नेतृत्व नेटाने पुढे यावे, यासाठी प्राधान्याने प्रयत्न करेल, असे प्रतिपादन डॉ. अशोक ढवळे यांनी केले. खरीखुरी स्त्री मुक्ती व्हायची असेल तर व्यवस्था परिवर्तनाची लढाई करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी विविध संघटनांनी महिला शेतकऱ्यांच्या मागण्या केंद्रस्थानी आणण्याचा संकल्प केला.

**१७ कलमी ठराव**

महिला शेतकऱ्यांच्या हक्क व मागण्यांची सनद परिषदेत संमत झाली. यामध्ये शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के भावाची कायदेशीर हमी, शेतजमीन, मालमत्ता व घरांच्या मालकी हक्कात महिलांना समान वाटा देण्यासाठी आवश्यक ते कायदेशीर बदल, शेतीत श्रम करणाऱ्या महिलांना उत्पन्न व मजुरीत पुरुषांप्रमाणे समान वाटा व हक्क, महिलांना आरोग्य अधिकार, योग्य पोषण, शिक्षण, रोजगार, स्वच्छतागृहाचा हक्क, सुक्ष्म वित्तपुरवठा संस्था व बचत गटाच्या कर्जाच्या जाळ्यातून मुक्तता आदींचा समावेश आहे.

# सुट्टीच्या काळात छोट्या सहलींना पर्यटकांची पसंती

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २९:



नववर्षाची सुरुवात होण्यास अवघे काहीच दिवस उरले असून पर्यटनाचा हंगाम बहरला आहे. मात्र मोठी सुट्टी घेऊन देश-विदेशांत जाण्याऐवजी तीन ते चार दिवसांची विश्रांती घेण्याकडे पर्यटकांचा कल सध्या दिसतो आहे.

सध्या नाताळच्या सुट्टीचे आणि नवीन वषार्चे स्वागत करण्यासाठी महाराष्ट्रातील अलिबाग, लोणावळा, माथेरान, महाबळेश्वर, कोकण आदी ठिकाणी पर्यटकांनी गर्दी केली आहे.

तसेच केरळ, गोवा, राजस्थान, हिमाचल प्रदेश, जम्मू काश्मीर, अंदमान निकोबार, गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी, अयोध्येतील राम मंदिर या ठिकाणांकडे ओढा आहे. राम मंदिराचे उद्घाटन झाल्यानंतर वाराणसी, प्रयागराज याठिकाणी जाणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे.

सरत्या वर्षाला निरोप देत नववर्षाचे स्वागत करण्यासाठी ३१ डिसेंबर व १ जानेवारी या दोन दिवसांसाठी विशेषतः समुद्रकिनारे असणाऱ्या पर्यटनस्थळांना अधिक पसंती आहे.

देशांतर्गत निसर्गरम्य सौंदर्य आणि सांस्कृतिक पर्वणी अनुभवण्यासाठी राजस्थान, केरळ, गोवा आणि हिमाचल प्रदेश या ठिकाणांना पर्यटकांची सर्वाधिक पसंती आहे. तसेच संयुक्त अरब अमिराती, श्रीलंका यांसारख्या देशांसाठी ई-व्हिसाची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे शेवटच्या क्षणी सहलींचे आयोजन करणे सोयीस्कर झाले आहे.

त्यामुळे परदेशात जाणाऱ्या कौटुंबिक सहलींचे प्रमाण वाढले आहे. मालदीव, दुबई आणि दक्षिण आशियाई परिसरातील पर्यटनस्थळी जाणे नागरिक पसंत करत आहेत, असे थॉमस कूकच्या (भारत) राजीव काळे यांनी सांगितले.

एखाद्या ठिकाणी गेल्यावर आसपासच्या परिसरातील जास्तीतजास्त स्थळे बघायची, अधिकाधिक फिरायचे हा शिरस्ता आता कार्यपद्धतीमुळे बदलल्याचे दिसते आहे. विश्रांती, वातावरणातील बदल याला पर्यटकांचे प्राधान्य असल्याचे दिसते.

प्रसिद्ध पर्यटनस्थळांपेक्षा नवीन पर्यटनस्थळांना भेट देण्यासाठी उत्सुक आहेत. निकृष्ट दर्जाचे रस्ते आणि पायाभूत सुविधांच्या अभावाने पर्यटकांची निराशा होते. त्यामुळे पर्यटनाच्या दृष्टीने या सर्व गोष्टींकडे सरकारने विशेष लक्ष द्यावे. कामाचे दिवस आणि सुट्टीच्या दिवसांचे योग्य नियोजन करत नागरिक सहकुटुंब तीन ते चार दिवसांसाठी सहलीला जाणे पसंत करतात. तसेच त्रितारांकित व पंचतारांकित हॉटेल्समध्ये राहण्याकडे नागरिकांचा ओढा वाढला असल्याचे केसरी टूर्स अ‍ॅन्ड ट्रॅव्हल्सचे झेलम चौबळ म्हणाले.

# नागपूर स्मार्ट सिटीच्या उपाययोजनानंतर गुन्हेगारी दरात 14 टक्के घट:आयआयएम बंगलोरने सादर केला अहवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ :



स्मार्ट सिटी मिशनचा भाग म्हणून नागपूरने शहरी सुरक्षा आणि डिजिटल शिक्षण क्षेत्रांमध्ये विशेष प्रगती केली आहे. आयआयएम बंगलोरसारख्या प्रतिष्ठित संस्थांनी केलेल्या सखोल परिणाम मूल्यांकनांनुसार, स्मार्ट तंत्रज्ञान आणि उपाययोजनांनी नागपूरच्या नागरिकांना फायदा झाला आहे. आयआयएम बंगलोरच्या अहवालानुसार, नागपूरमध्ये टेहळणी उपाययोजनांच्या अंमलबजावणी नंतर एकूण गुन्हेगारी दरात १४ टक्के घट झाली आहे.

नागपूरच्या यशस्वी कार्यप्रणालीने इतर शहरांसाठी शहरी सुरक्षा सुधारण्याची आणि अधिक सुरक्षित, समावेशक सार्वजनिक जागांचा विकास करण्याचा एक आदर्श स्थापित केला आहे.

नागपूर स्मार्ट आणि सस्टेनेबल सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडने शहरी सुरक्षा क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे. विशेषतः गुन्हेगारी घटनांमध्ये १४ टक्क्यांची घट झाली आहे. आयआयएम बंगलोरच्या मूल्यांकन अभ्यासानुसार, ९३ स्मार्ट सिटींमध्ये ५९,८०२ सीसीटीव्ही कॅमेरे आणि आपत्कालीन कॉल बॉक्सेस स्थापित करण्यात आले आहे. यामुळे एक सुरक्षित शहरी वातावरण निर्माण झाले आहे. या निगराणी प्रणालीने पोलिस कार्यवाही सोबतच सबळ पुरावा आधारित संपूर्ण देशभरातील पोलिस यंत्रणेला मजबूत केले आहे.

नागपूरने निगराणी उपाययोजनांच्या अंमलबजावणी नंतर एकूण गुन्हेगारी दरात १४ टक्के घट झाली आहे. यामध्ये शहरात ४००० पेक्षा जास्त सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत आणि यात ह्यइंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरह्वद्वारे रिअल-टाइम मॉनिटरिंग सिस्टमचा समावेश आहे.

या योजनेमुळे कायदा अंमलबजावणीला गुन्हे प्रतिबंधित करण्यासाठी मदत झाली आहे. या प्रयत्नांमुळे गेल्या पाच वर्षांत ७००० पेक्षा जास्त गुन्ह्यांचे निराकरण करण्यात मदत झाली आहे. या योजनेमुळे नागपूरमध्ये महिलांमध्ये अधिक सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

स्मार्ट क्लासरूम आणि डिजिटल लायब्ररीचा प्रभाव

नागपूरने आपल्या शैक्षणिक पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी स्मार्ट क्लासरूम आणि डिजिटल लायब्ररीच्या स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. आयआयएम बंगलोरच्या अहवालानुसार, नागपूरने ६ स्मार्ट शाळांमध्ये ६० स्मार्ट क्लासरूमची स्थापना केली आहे. या शाळांमध्ये शिक्षण साहित्य मराठी, इंग्रजी, हिंदी आणि उर्दू या चार विविध भाषांमध्ये उपलब्ध आहे.

राष्ट्रीय स्तरावरील अभ्यासानुसार, ७१ शहरांनी ९,४३३ स्मार्ट क्लासरूमची स्थापना केली आहे. यामुळे सरकारी शाळांमध्ये २२ टक्के पटसंख्या वाढ झाली आहे. स्मार्ट क्लासरूम व्यतिरिक्त, डिजिटल लायब्ररी विद्यार्थ्यांसाठी एक महत्वाचे साधन ठरले आहे. नागपूरमध्ये स्मार्ट कार्डमुळे लायब्ररीचा वापर अधिक सुलभ झाला आहे. नागपूर स्मार्ट सिटीने तीन लायब्ररींमध्ये स्मार्ट कार्ड प्रणाली लागू केली आहे.

# "भास्कर केदारे यांचा सामाजिक कार्योंबद्दल सत्कार"

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ :
हलबा जमात मैरेज ब्यूरो, तर्फे नागपूरचे अध्यक्ष भास्कर सदाशिवराव केदारे यांचा सामाजिक कार्योंबद्दल सुभाष कोटेचा, सदस्य, राष्ट्रीय परिषद, न्यू दिल्ली तसेच संस्थापक अध्यक्ष, सर्व मानव सेवा संघ, नागपूर यांचे तर्फे भारत मातेचि प्रतिमा देवुन दि.27.12.2024 ला त्यांच्या गुरुदेव नगर, नवीन नंदनवन, नागपूर येथील कार्यालयात सामाजिक कार्योंबद्दल सत्कार करन्यात आला.



या वेळी उपस्थित हेमंत केदारे, वर्षा केदारे ,शुभम केदारे व कार्यालयातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

# बीएसएनएल अभियंत्यासह दोघांवर गुन्हा

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ : वेगवेगळ्या प्रकरणांमध्ये विना परवानगी झाडे तोडल्यावरून भारतीय संचार निगम लिमिटेड (बीएसएनएल)च्या उपविभागीय अभियंत्यासह दोघांविरुद्ध प्रतापनगर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. महानगर पालिकेचे वृक्ष संवर्धक अमोल चौरपगार यांच्या तक्रारीवरून एफआयआर नोंदविण्यात आली आहे.खामलाच्या बीएसएनएल एक्सचेंज परिसरातील अनेक झाडे जमिनीपासून कापण्यात आल्याची तक्रार परिसरातच राहणा?या सचिन खोब्रागडे यांनी मनपाच्या पोर्टलवर केली होती. तक्रारीनुसार, अमोल यांनी तेथे जाऊन पाहिले असता वेगवेगळ्या प्रजातीची 4 मोठी झाडे जमिनीपासून तोडण्यात आली होती. त्यासाठी मनपाकडून कोणतीही परवानगी घेण्यात आली नव्हती. चौकशीत उपविभागीय अभियंत्याच्या देखरेखीत ही झाडे तोडण्यात आल्याची माहिती मिळाली. दुसरा गुन्हा गुरूदेवनगरात राहणा?या मंगेश जेठेविरुद्ध नोंदविण्यात आला.

# वृंदावनची श्री कृष्ण चरित्र रासलीला आजपासून नागपुरात

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ : लोटस कल्चरल अँड सपोर्टिंग असोसिएशन यांच्या वतीने आणि नागपूर महानगरपालिकेच्या सहकार्याने, माजी महापौर दयाशंकर तिवारी यांच्या संयोजनात वृंदावन येथील जगप्रसिद्ध स्वामी कृष्ण मुरारी जी यांच्या श्री गौर कृष्ण रासलीला संस्थान, वृंदावन द्वारे रविवारी 29 डिसेंबर 2024 पासून 12 जानेवारी 2025 पर्यंत गांधीबाग उद्यानात दररोज सायंकाळी 6 ते रात्री 9.30 वाजेपर्यंत 15 दिवसीय श्री कृष्ण चरित्र महा रासलीला महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूर शहरात चार वर्षांनी हे आयोजन होत आहे.

यापूर्वी दरवर्षी दयाशंकर तिवारी यांच्या नेतृत्वात दरवर्षी या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत होते परंतू कोरोना महामारीमुळे या कार्यक्रमाचे आयोजन काही काळ थांबवावे लागले होते.

कार्यक्रमाचे संयोजक दयाशंकर तिवारी यांनी सांगितले की, 'आपली संस्कृती, इतिहास आणि धर्म तथा अध्यात्माशी नव्या पिढीला जोडण्यासाठी तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून भगवान श्री कृष्ण यांच्या चरित्राबाबत निर्माण करण्यात येत असलेल्या भ्रमाचे निराकरण करून शाश्वत चरित्र स्थापित करण्याच्या उद्देशाने हे आयोजन असल्याचे दयाशंकर तिवारी म्हणाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी दयाशंकर तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक कार्यकर्ते आणि सहयोगी परिश्रम घेत आहेत. गिरधारी मंत्री, विपुल मिश्रा, सुनील काबरा, अतुल मशरू, पवन जालान, रतन मदान, कल्यान चौबे, राजेश तिवारी, अविनाश साहू, प्रशांत गुप्ता, जीतू बाथो, रमाकांत गुप्ता, विवेक ठाकुर, उमेश ओझा, रेखा साहू, ज्योती वर्मा, मालती बाथो आणि अन्नू यादव आदी सर्व कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सहकार्य करीत आहेत.

# तालुका आणि विभागीय क्रीडा स्पर्धेत नंदापुरी शाळेचा दबदबा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक,दि. २८ डिसेंबर :
मौदा येथील क्रीडा संकुलात पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदापूरी च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. सांस्कृतिक महोत्सवात कनिष्ठ गटात नृत्य प्रथम क्रमांक, समूहगीत, वेशभूषा, नक्कल, वक्तृत्व स्पर्धा यात नंदापूरी शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.तसेच पारशिवनी येथे पार पडलेल्या विभागीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंदापुरी यांनी समूहगीत प्रथम, आरोही रवींद्र पडोळे वेशभूषा प्रथम, स्वयंम धर्मराज मचाळे नक्कल प्रथम, रुचिका रमेश पडोळे वक्तृत्व स्पर्धा प्रथम आणि समूह नृत्य कनिष्ठ गट द्वितीय क्रमांक पटकाविला. विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक आनंदराव नंदनवार, शुभांगी राऊत आणि ज्योती नंदनवार यांनी मार्गदर्शन केले. या यशा बद्दल तालुक्याचे उपसभापती खेमराजजी चाफले, गट शिक्षण अधिकारी कुमारी किरण चीनकुरे, केंद्रप्रमुख राजू आंबिलकर, सरपंच वनिता नौकरकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मनोहर नागपुरे यांनी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे कौतुक केले.

## बजाज फायनस कंपनीचा नागरिकावर वसुलीचा दबाव

नरखेड : बजाज फायनस कंपनी कर्जाच्या स्वरूपात काही व्याज टक्के लावून नागरिकांना कर्ज देत असते पैशाचे आमिष पाहून व्याजाची टक्केवारी कमी असल्याने नागरीक ही कर्ज घेतात अशाच प्रकारचे कर्ज मोवाड येथील पुरुषोत्तम संतोष राऊत वय ५२ रा. मोवाड ता. नरखेड यांनी बजाज फायनस कंपनी कडून मुलाच्या शिक्षणासाठी दोन वर्षांपूर्वी कर्ज घेतले होते. परंतु मागच्या वर्षी त्यांचा मुलगा गौरव पुरुषोत्तम राऊत वय २३ हा नागपूर येथे शिक्षण घेत असताना आकस्मित घटना घडवून दिवाळीच्या दिवशी स्कार्पिओ टू व्हीलर ला धडक देवून त्यांचा जागीच मृत्यू झाला पुरुषोत्तम राऊत यांनी मुलाच्या शिक्षणासाठी कंपनीकडून घेतलेले कर्ज त्यातले काही कर्ज त्यांनी परतफेड केले परंतु काही रक्कम त्यांचे देण्याचे बाकी आहे आता त्यांची आर्थिक परिस्थिती ढासळलेली असल्याने कर्जाची रक्कम परतफेड करणे शक्य नाही.

# एसटी महामंडळाला निधी नाही.. पंचसूत्रीबाबत शंका कायमच

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २६ :राज्यातील ७६ वर्षे पूर्ण झालेल्या एसटी महामंडळात दर वर्षी स्वच्छता अभियानासह इतरही उपक्रम राबवले जातात. परंतु सरकारकडून अद्यापही पुरेसा निधी मिळत नाही. त्यामुळे पंचसूत्रीसह इतरही उपक्रम जाहिर केल्यास फायदा काय ?सह इतर गंभीर प्रश्न महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी उपस्थित केले.



एसटीच्या ताफ्यात नवीन गाड्या येत नाहीत. सुटे भाग घ्यायला पुरेसा निधी मिळत नाही. स्वच्छतेसाठी पुरेसे कर्मचारी नाही.

त्यामुळे स्वच्छता अभियानासह इतर परिपत्रकांचा लाभ नाही. सरकारकडे निधी मागण्याचे धाडस नसल्याने पंचसूत्री सारखी परिपत्रके एसटीला वारंवार काढावी लागतात. यातून प्रशासनाची हतबलता दिसते. एसटी गाड्यांची स्वच्छता व आगार परिसरातील स्वच्छता तसेच चालक वाहक विश्रांती गृहातील स्वच्छता याची दुरवस्था असून दरवर्षी स्वच्छता अभियान राबविण्यात येऊनही त्यात सुधारणा नाही.एसटीच्या या दुरावस्थेला पुरेसे कर्मचारी नाहीत, हेच मुख्य कारण असून तांत्रिक अडचणीमुळे अनुकंपाच्या प्रतीक्षा यादीतील सफाई कामगार व स्वच्छक यांना वर्षानुवर्षे कामावर घेण्यात आलेले नाही. या वर एक वेळचा पर्याय म्हणून मार्ग काढला पाहिजे.

गाड्या मार्गस्थ बिघाड होण्याचे प्रमाण वाढलेले दिसण्याचे मुख्य कारण म्हणजे ८० टक्के गाड्या ह्या जुन्या झाल्या आहेत. त्यांचे वारंवार काम निघते व नवीन सुटे भाग घ्यायला निधी अपुरा पडत असल्याने दुरूस्ती केलेल्या जुन्या सामानावर गाड्या चालवाव्या लागतात. परिणामी मार्गस्थ बिघाड वाढत आहेत. २ हजार ४७५ स्व मालकीच्या नवीन गाड्या घेण्याची घोषणा दोन वर्षापूर्वी करण्यात आली. पण अजून त्यातील एकही गाडी ताफ्यात दाखल झालेली नाही. विजेवरील गाड्या अजूनही पुरेशा प्रमाणात आलेल्या नाहीत. त्या मुळे गाड्या अपु?या पडत असतील तर मग प्रवाशी संख्या कशी वाढेल? व उत्पन्न कसे वाढेल? असा प्रश्न पडत आहे. या शिवाय पंचसुत्रित दिवसाला दोन कोटी रुपयांचे उत्पन्न वाढल्यास तोटा भरून काढता येईल असा सल्लाही दिला आहे. पण एसटीचे हे पण हे सर्व प्रश्न सरकार दरबारी रेंगाळत पडल्याने व कुठलाही निर्णय लगेच घेतल्यानेच जखम बळावली आहे. असेच म्हणावे लागेल असेही श्रीरंग बरगे यांनी म्हटले आहे.भाडेवाढीला मंजूरी द्या, अथवा शासनाने निधी द्यावा..गेली चार वर्षे भाडेवाढीचा प्रस्ताव सरकार दरबारी पडून आहे. इंधन दरवाढ, सुट्या भागांच्या किमती वाढल्यावर व्यवहाराचा भाग म्हणून भाडेवाढ करायला हवी. अगदी दहा टक्के इतकी वाढ केली तरी दिवसाला तीन कोटीने उत्पन्न वाढले असते. पण त्या प्रस्तावाला मंजुरी दिली जात नाही. प्रवाशाना भुर्दंड बसायला नको असेल तर त्या बदल्यात सरकारने निधी उपलब्ध करून दिला पाहिजे, असेही श्रीरंग बरगे म्हणाले.

# पोलीस पाटील संघटनेच्या विभागीय अध्यक्षपदी मनोज मेहुणे यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर ,दि. २८ डिसेंबर :
कळमेश्वर पोलीस पाटील संघटनेच्या वतीने सत्कार. महाराष्ट्र राज्य पोलीस पाटील संघटनेचे राज्य कार्यकारिणी सदस्य व कळमेश्वर तालुक्यातील उबाळी या गावाचे पोलीस पाटील मनोज मेहुणे यांची संघटनेच्या विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. संघटनेचे राज्य अध्यक्ष दीपक पालीवाल यांनीही नियुक्ती केली यांच्या नियुक्ती बद्दल कळमेश्वर पोलीस पाटील संघटनेच्या वतीने मनोज मेहुणे यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी उपस्थित मान्यवरांमध्ये कळमेश्वर पोलीस पाटील संघटनेचे अध्यक्ष शंकर झाडे. उपाध्यक्ष प्रदीप गावंडे सुवर्णा गोतमारे सचिव सचिन बेलेकर परमेश्वर युवनाते पिंटू निंबाळकर दिलीप प्रधान ओम प्रकाश मोहोळ अतुल बागडे सचिन बैस भालेराव पाटील संजय मस्के रवी पवार. जयस्वाल मारुती पेंदाम व कळमेश्वर तालुक्यातील पोलीस पाटील उपस्थित होते.

# नववर्षात आप्तजनांना अनोख्या वस्तूंची भेट देण्याकडे नागपूरकरांचा कल

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ : नववर्ष हे नव्या प्रारंभाचे प्रतीक मानले जाते. या निमित्ताने लोक आपल्या जवळच्या व्यक्तींना खास भेट देऊन आनंद साजरा करतात. नागपूरकरही नववर्ष उत्साहात साजरा करण्याच्या तयारीत असून पारंपरिक भेटवस्तूंपेक्षा अनोख्या भेटवस्तूंची मागणी लक्षणीयरित्या वाढली आहे.




भेटवस्तूंऐवजी आता वैयक्तिक अनुभव देणा?या भेटवस्तूंना प्राधान्य दिले जात आहे. यामध्ये कस्टमाइज्ड फोटोज, नावासह डायरी, आणि वैयक्तिक संदेश असलेल्या भेटवस्तूंचा समावेश आहे. तसेच, पर्यावरणपूरक भेटवस्तूस-ुद्धा दिल्या जाणार आहेत. पुनर्वापर करता येणा?या वस्तू, रोपांच्या कुंड्या, आणि बायोडिग्रेडेबल वस्तू या गोष्टींना अधिक पसंती मिळत आहे. याशिवाय नववर्षाच्या निमित्ताने आरोग्याला केंद्रस्थानी ठेवत फिटनेस आणि वेलनेस उत्पादने गिफ्ट म्हणून देण्याची प्रवृत्तीही दिसून येत आहे. योगा किट्स, ऑर्गेनिक फूड हॅम्पर्स आणि होम वर्कआउट उपकरणे या भेटवस्तूंना मागणी आहे. याशिवाय, डिजिटल भेटवस्तू जसे की ऑनलाईन सबस्क्रिप्शन्स, ई-बुक्स, किंवा ऑनलाईन कोर्सेस हे देखील दिले जात आहेत.

इलेक्ट्रॉनिक गॅझेट्सची लोकप्रियता देखील टिकून आहे. स्मार्ट वॉचेस, फिटनेस बँड्स, आणि वायफाय-सहायक उपकरणे यासोबतच काहीजण ट्रेंडिंग गॅझेट्स जसे की पोर्टेबल प्रोजेक्टर, वायरलेस चार्जर यासारख्या वस्तूंना पसंती देत आहेत. वैयक्तिक भेटवस्तूंमुळे नाती अधिक घट्ट होतात, आणि यामुळेच तरुणाई या भेटवस्तूंना अधिक पसंती देत आहे.

हस्तकला उत्पादनांनाही मागणीशहरी तसेच ग्रामीण भागांमध्ये आता स्वनिर्मित वस्तू भेट देण्याचा नवीन ट्रेंड आला आहे. हस्तकला उत्पादने आणि स्थानिक कलाकारांच्या कलेला प्रोत्साहन देणा?या भेटवस्तू बाजारात मोठ्या संख्येत उपलब्ध आहेत. याचा बाजारपेठेतील विक्रेत्यांना मोठा फायदा होत आहे. ही मागणी येत्या काही वर्षांत आणखी वाढण्याची शक्यता आहे, कारण लोक आपल्या भेटवस्तूंमधून भावना व्यक्त करायला अधिक प्राधान्य देत आहेत, अशी माहिती सीताबडीर्तील एका भेटवस्तू विक्रेत्याने दिली.

# छातीत चाकू भोसकून मारले ठार

## ऑटोतून आले होते आरोपी

■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ :



सरत्या वर्षाच्या शेवटच्या आठवड्यात शहरात पुन्हा एकदा हत्यासत्र सुरू झालेले दिसून येत आहे. गत चार दिवसात खुनाच्या चार घटनांनी शहर हादरले आहे. यशोधरानगर ठाण्यांतर्गत वहिनीशी अवैध संबंधाच्या संशयातून मित्राची हत्यापासून या हत्यासत्राला सुरूवात झाली. त्यानंतर अजनी ठाण्यांतर्गत बापलेकाचा खून करण्यात आला. खुनाचा तिसरी घटनाही अजनीमध्येच घडली.

पैशांच्या वादातून मित्रानेच मित्राची हत्या केली आणि आता धंतोली ठाण्यांतर्गत ऑटोस्वार तिघांनी छातीत चाकू भोसकून एका व्यक्तीची हत्या केली. लुटपाटच्या उद्देशातून ही हत्या करण्यात आल्याचा संशय आहे, कारण हत्येनंतर आरोपी त्याचे सर्व सामान घेऊन पसार झाले. या घटनेने पोलिसातही खळबळ उडाली आहे. मरणा?याची ओळख अद्याप पटू शकली नाही. वय अंदाजे 40 ते 45 वर्षे आहे. मृताजवळ पोलिसांना पुणे म्युनिसिपल ट्रांस्पोर्टचे बस तिकीट मिळाले आहे. यावरून तो काहीतरी कामाने नागपूरला आला होता, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतक मुंजे चौकातून पायदळ जात होता. या दरम्यान एक ऑटो त्याच्याजवळ येऊन थांबला.

काही वेळ दोघांमध्ये बोलणे झाले आणि मृतक ऑटोमध्ये बसला. ऑटोत मागच्या सीटवर आधीच दोनजण बसलेले होते. आनंद टॉकीजमार्गे ऑटो सीताबर्डीच्या कुर्वेज न्यू मॉडेल शाळेकडे जात होता. लोहारकर हॉटेलसमोर ऑटोस्वार आरोपींनी मृतकाची बॅग हिसकावण्याचा प्रयत्न केला. मृतकाने विरोध केला असता आरोपींनी चाकू काढला. जबर मारहाण करून चाकू त्याच्या छातीत भोसकला आणि धावत्या ऑटोतून त्याला बाहेर फेकले. मृतक सीमेंट रोडवर जाऊन पडला. त्याने उठण्याचा प्रयत्न केला, मात्र 4-5 पाऊले चालताच खाली कोसळला. ऑटोस्वार आरोपी त्याचे सर्व सामान लुटून पसार झाले. रस्त्याने ये-जा करणा?या नागरिकांनी एक व्यक्ती रस्त्यावर रक्ताच्या थारोळ्यात पडून असल्याची माहिती पोलिसांना दिली. धंतोली पोलिस घटनास्थळी पोहोचले.

तोपर्यंत त्या व्यक्तीचा मृत्यू झाला होता.या घटनेची माहिती मिळताच झोन एकचे डीसीपी लोहित मतानी आणि झोन 2चे राहुल मदनेही घटनास्थळी पोहोचले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रवाना करण्यात आला. धंतोलीच्या ठाणेदार मनीषा काशिद यांनी सांगितले की, मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. त्याची उंची जवळपास साडेपाच फुट आहे. अंगात पिवळ्या रंगाची टी-शर्ट आणि निळ्या रंगाचा चेक्स शर्ट आहे. जर कोणाला या वर्णनाच्या व्यक्तीबाबत कोणतीही माहिती असेल तर त्याने धंतोली पोलिसांशी संपर्क साधावा. आरोपी ज्या आटोत होते त्याचा नंबर स्पष्ट दिसत नाही. पोलिस वेगवेगळ्या ठिकाणच्या कॅमे?यांची फुटेज तपासत आहेत. ऑटोचा नंबर मिळाला तर आरोपींचा सुगावा लागू शकतो. लुटपाटच्या उद्देशानेच हा खून करण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ज्यावेळी मृतक ऑटोत बसला होता त्याच्याजवळ एक बॅग होती.

मात्र घटनास्थळावर कोणतेही सामान किंवा ओळख पटविणारी वस्तू मिळाली नाही. पुणेच्या बसच्या तिकीट मिळाल्याने कदाचित तो पुणे येथील रहिवासी असल्याचा अंदाज आहे.

# चारचाकीच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

## काटोल मार्गावरील अपघात, 1 गंभीर




■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ : भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकी वाहनाला जबर धडक दिली. यात दुचाकीस्वार वृद्धाचा उपचार मिळण्यापूर्वीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. ही घटना गिट्टीखदान ठाण्यांतर्गत काटोल मार्गावर घडली. जब्बार रहमतुल्ला शेख (60) रा. गौतमनगर, गिट्टीखदान असे मृताचे नाव आहे. जखमी नूर मोहम्मद नसीम शेख (50) रा. बाजार फाटा, अमरावती रोड यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मृतक जब्बार आणि नूर हे सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास एमएच-31/बीएस-8695 क्रमांकाच्या दुचाकी वाहनाने काटोल रोडने जात होते. नवीन काटोल नाका चौकातून गोरवाडा प्राणी संग्रहालयाकडे जाताना भरधाव असलेल्या अज्ञात चारचाकी वाहनाच्या चालकाने जब्बार यांच्या दुचाकीला मागून जबर धडक दिली आणि पळून गेला. जब्बार आणि नूर दुचाकीसह ब?याच दूरपर्यंत फरफटत जाऊन गंभीर जखमी झाले. रस्त्याने ये-जा करणा?या लोकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. गिट्टीखदान पोलिस घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही जखमींना उपचारार्थ जवळच्या खासगी रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून जब्बार यांना मृत घोषित केले. नूर यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी जब्बार यांचा भाचा आरिफ शेखच्या तक्रारीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. काटोल नाक्यावर लागलेल्या सीसीटीव्ही कॅमे?यांची फुटेज तपासून आरोपीचा शोध घेतला जात आहे.

# इमारतीवरून पडल्याने मजुराचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी
नागपुर दि. २८ : निमार्णाधिन इमारतीच्या पहिल्या माळ्यावरून पडल्याने एका मजुराचा मृत्यू झाला. ही घटना अंबाझरी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. विश्वास पुरूषोत्तम नारकवाडे (40) रा. हिवरीनगर असे मृताचे नाव आहे. विश्वास हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. शुक्रवारी दुपारी ते अमरावती मार्गावरील एलआयटी कॉलेज परिसरातील एका इमारतीच्या बांधकामावर मजूर म्हणून काम करीत होते. सळाखी पहिल्या माळ्यावर ओढत असताना अचानक त्यांचा तोल गेला आणि ते थेट खाली पडले. डोक्याला गंभीर मार लागल्यामुळे सोबत काम करणा?या सहका?यांनी त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# स्व.अटलबिहारी वाजपेयी यांना विनम्र अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
आपल्या बहुमोल विचार, कार्यक्षम नेतृत्व आणि उत्कृष्ट राजकीय धोरणांनी भारतात विकास आणि सुशासनाची सुरुवात करणारे भारत सरकारचे माजी पंतप्रधान आदरणीय भारतरत्न, स्व. अटलबिहारी वाजपेयी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त निषाद समाज व मध्य नागपूर भाजप कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.



कार्यक्रमात मध्य नागपूर उपाध्यक्ष प्रल्हाद नायक शहर उपाध्यक्ष विजयंत कृष्णा गौर झोन सरचिटणीस नीरज टेंभूर, मध्य नागपूर सरचिटणीस नितीन मंथनकर भोई समाज. सेना नागपूर शहर अध्यक्ष शुभम करतार मच्छीमार सेलचे अध्यक्ष राजेश गौर,कहार समाज संघटन सचिव लक्ष्मी नायक, रीना नायक, योगिता नायक, राधिका गौर, कौशल गौर उपस्थित होते.

# योग्य उद्योजक जोखीम घेण्यामुळे जन्माला येतात



रतन नवल टाटा हे एक भारतीय उद्योगपती आणि टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. १९९० ते २०१२ या काळात ते टाटा समूहाचे अध्यक्ष होते आणि ऑक्टोबर २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीत ते समूहाचे अंतरिम अध्यक्ष होते, तसेच त्यांच्या चॅरिटेबल ट्रस्टचे नेतृत्व करत होते. ते पद्मविभूषण (२००८) आणि पद्मभूषण (२०००) या भारतातील दोन सर्वोच्च नागरी पुरस्कारांचे प्राप्तकर्ते आहेत.

१९३७ मध्ये जन्मलेले रतन हे टाटा कुटुंबातील वंशज आणि नवल टाटा यांचे पुत्र आहेत, ज्यांना नंतर टाटा समूहाचे संस्थापक जमशेटजी टाटा यांचे पुत्र रतनजी टाटा यांनी दत्तक घेतले होते. ते कॉर्नेल युनिव्हर्सिटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि हार्वर्ड बिझनेस स्कूलचे व्यवस्थापन कार्यक्रमाचे माजी विद्यार्थी आहेत जेथे त्यांनी १९७५ मध्ये शिक्षण पूर्ण केले.

१९६१ मध्ये ते त्यांच्या कंपनीत रुजू झाले. तेव्हा ते टाटा स्टीलच्या शॉप फ्लोअरवर काम करायचे आणि १९९१ मध्ये जेआरडी टाटा यांच्या निवृत्तीनंतर ते त्यांचे उत्तराधिकारी होते. त्यांनी टाटा टी मिळवून टेटली विकत घेतली, टाटा मोटर्स घेऊन जग्वार लँड रोव्हर विकत घेतली आणि टाटा स्टील घेऊन कोरस कंपनीचे अधिग्रहण केले. त्यांनी मोठ्या प्रमाणावर भारत-केंद्री गटातील टाटा समूहाला जागतिक व्यवसायात रूपांतरित करण्याच्या प्रयत्न केला.

रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी ब्रिटिश राजवटीत मुंबई येथे झाला होता. टाटा 10 वर्षांचे असताना, त्यांचे आई-वडील विभक्त झाले तेव्हा, आणि त्यानंतर त्यांचे संगोपन केले आणि रतनजी टाटा यांच्या आजी आणि विधवा नवजबाई टाटा यांनी त्यांना दत्तक घेतले.

मुंबईच्या कॅम्पियन स्कूलमध्ये त्यांनी आठवीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर, त्यांनी मुंबईतील कॅथेड्रल आणि जॉन कॉनन स्कूल, शिमला येथील बिशप कॉटन स्कूलमध्ये शिक्षण घेतले. नंतर त्यांनी १९५५ मध्ये न्यू यॉर्क येथील रिव्हरडेल कंट्री स्कूलमध्ये पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

पदवी घेतल्यानंतर, टाटा यांनी कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला, ज्यामधून त्यांनी १९५९ साली वास्तुशास्त्र मध्ये पदवी प्राप्त केली.

टाटा समूहाचे संस्थापक असलेल्या जमशेदजी टाटांचा नातू अशा पद्धतीने धडपड करतो आहे हे पाहून जे. आर. डी. प्रभावित झाले. आजीची तब्येत बिघडल्यामुळे तिला भेटायला भारतात आलेल्या रतन यांना जे. आर. डी. यांनी टाटा उद्योगसमूहामध्ये येण्याचे निमंत्रण दिले. १९६२ च्या डिसेंबर महिन्यात रतन टाटा समूहात दाखल झाले; मात्र समूहाच्या परंपरेनुसार ६२ ते ७१ पर्यंत त्यांना विविध कंपन्यांमध्ये काम करण्यास सांगण्यात आले.

जमशेदपूरच्या टाटा स्टीलमध्ये अगदी कोळसा उचलण्यापासून ते भट्टीपाशी काम करण्यापर्यंतचे सर्व अनुभव घेतल्यानंतरच १९७१ मध्ये त्यांच्याकडे टाटा समूहातील नेल्को या कंपनीची धुरा सोपविण्यात आली. नेल्को ही तोट्यात चालणारी कंपनी होती. पुढे ही कंपनी बंद पडली. रतन टाटा यांना अनुभवाला आलेले ते पहिले अपयश होते.

१९७७ मध्ये रतन टाटांवर एम्प्रेस मिल या टाटा समूहातील बंद पडावयास आलेल्या मिलची जबाबदारी सोपविण्यात आली. पन्नास लाख रुपयांच्या गुंतवणूकीस इतर संचालकांनी त्याला विरोध केल्याने अखेर ही मिलही बंद करण्यात आली. रतन टाटांच्या नावावर दुसरे अपयश जमा झाले.

या सर्व प्रकारामुळे रतन टाटा चांगलेच दुखावले गेले होते; पण त्याचबरोबर अनुभवाच्या शाळेमध्ये बरेच काही शिकले होते. १९८१ मध्ये जे. आर. डी. टाटा यांनी त्यांच्याकडे टाटा इंडस्टीजची सूत्रे सोपविली. १९९१ मध्ये जे. आर. डी. यांनी स्वतःच उद्योगसमूहाची सर्व सूत्रे रतन टाटांकडे सोपवून निवृत्ती पत्करली. रतन टाटा यांनी अनेक उपक्रम राबवून टाटा समूहाला विश्वव्यापी केले. जेआरडी यांनी रतन टाटा यांना प्रमुख नेमल्यावर ते कधीच जेआरडी यांच्या आसनावर बसले नाहीत. उलट त्यांनी बॉम्बे हाऊसमध्ये स्वतःसाठी एक साधारण खोली पसंत केली आणि तेथूनच त्यांनी आपला कारभार चालवला.

रतन टाटा यांनी श्रीमंतीचा तोरा कधीच मिरवला नाही. कंपनीच्या साधारण ऑफिसर किंवा कर्मचाऱ्यांसोबत ते अगदी आत्मीयतेने बोलत. केवळ भारतात नाही. तर जगातील ज्या ज्या देशात टाटा साम्राज्य गेले तेथील उपभोक्त्यांना टाटांवर पूर्ण विश्वास होता. टाटाच्या चहापासून इतर सर्व उत्पादने आणि व्यवसायात शंभर नंबरी कामाचे प्रदर्शन नेहमीच होत होते. टाटांनी कधीही सरकारी कंपनी कवडीमोल भावात खरेदी करण्याची इच्छा वर्तवली नाही.

पण भारत सरकारने जंग जंग पछाडूनही एअर इंडिया नफ्यात येत नव्हती. दिवसेंदिवस तोटाच तोटा सहन करावा लागत होता. एअर इंडियाला ग्राहक मिळत नव्हते. त्यामुळे अखेर आपणच स्थापन केलेली एअर इंडिया ही कंपनी तोट्यात असतानाही ती कंपनी टाटा यांनी विकत घेतली.

अगदी सुरुवातीला टाटा कंपनी स्थापन झाल्यावर तत्कालीन कंपनीचे सर्वेसर्वा जमशेदजी टाटा डिनरसाठी एका इंग्रज मित्राबरोबर गेले होते. त्या हॉटेलचा दरबान म्हणाला की, इंग्रजांचे आम्ही स्वागत करतो, पण भारतीय टाटाला इथे प्रवेश नाही.

त्याच संध्याकाळी जमशेदजी टाटा यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या हॉटेलची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आणि ताजमहाल हॉटेलची मुहूर्तमेढ रोवली गेली. हॉटेल ताजची शृंखला संपूर्ण जगभरात अत्यंत सुप्रसिद्ध झालेली आहे.


रतन टाटा यांनी आपली नैतिकता कधीच सोडली नाही. तडजोडीही केल्या नाहीत. कोणत्याही राजकीय पुढाऱ्याला विनाकारण आपल्यासाठी काही करण्याचा आग्रह सुद्धा केला नाही. तरीही टाटा समूह आजही त्याच दिमाखाने उभा आहे. या सर्व साम्राज्याचे प्रमुख म्हणून रतन टाटा असले. तरी त्या संपत्तीचे त्यांनी कधी ना प्रदर्शन केले, ना उपभोग घेतला.

अत्यंत साधी राहणी म्हणजे, छोट्याशा फ्लॅटमध्ये निवास करणारा हा टाटा साम्राज्याचा सर्वेसर्वा तितकाच दानशूर होता. त्यांनी मुंबईच्या बॉम्बस्फोटात ताज हॉटेलच्या परिसरात जे जे मृत्युमुखी पडले होते. त्यांच्या त्यांच्या घरी जाऊन त्यांना मदत केली. वस्तुतः त्याची काहीच गरज नव्हती.

अशी माणुसकी सांभाळणारा थोर माणूस दोन महिन्यांपूर्वी हे जग सोडून निघून गेला. सध्या व्यवसायाची आणि कॉर्पोरेट व्यावसायिकांची तत्व आणि निष्ठा बदलली आहे. पण आपण आपल्या तत्त्वांना चिकटून राहिलो, तर यश आपोआपच मिळते. हे ज्याच्या आयुष्यातील अनुभवातून दिसून येते.

••••••••••

**भारताचे माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचे गुरूवारी रात्री निधन झाले आणि शुक्रवारी सर्वत्र त्यांच्या कार्यकर्तृत्वाचीच चर्चा सुरू होती. यात देशातील दोन महान उद्योजकांचे विस्मरण झाले. रतन टाटा आणि धिरूभाई अंबानी या दोन उद्योजकांनी स्वतःच्या मेहनतीच्या बळावर विश्व उभे केले. २८ डिसेंबर हा या दोन्ही महान उद्योजकांचा जन्मदिन . त्यांचे आयुष्य, संघर्ष आणि उभारलेल्या वैभवाचा थोडक्यात घेतलेला आढावा.**



धीरजलाल हिराचंद अंबाणी उर्फ धीरूभाई हिराचंद अंबाणी हे गुजराती व भारतीय उद्योजक होते. व्यावसायिक हुशारीने गरिबीतून वर येऊन त्यांनी आपल्या चुलतभावासोबत रिलायन्स उद्योग समूह स्थापला. १९७७ साली सार्वजनिक घोषित केलेली रिलायन्स कंपनी विस्तारत जाऊन इ.स. २००७ साली अंबाणी कुटुंबीयांची मालमत्ता ६० अब्ज डॉलर, म्हणजे वॉल्टन कुटुंबीयांपाठोपाठ दुसऱ्या क्रमांकाचे श्रीमंत कुटुंब ठरण्याइतपत हा उद्योग वाढला.

धीरूभाई यांचा जन्म गुजरात राज्यातील सौराष्ट्रच्या जुनागढ जिल्ह्यातील चोरवाड या गावी २८ डिसेंबर १९३२ रोजी झाला. त्यांचे वडील हिराचंद गोवर्धनदास अंबाणी हे प्राथमिक शाळेत शिक्षक होते तर आई जमनाबेन या गृहिणी होत्या. धीरूभाई हे आपल्या पाच भावंडातले मधले अपत्य.

धीरूभाई शिक्षणात सर्वसामान्य विद्यार्थी होते. त्यांचे इंग्रजीचे ज्ञान चांगले तर गणित कच्चे होते. १९४९ साली आपले १० वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करून धीरूभाई नोकरीच्या शोधात एडन येथे गेले. तेथे बर्मा शेल कंपनीची उपकंपनी म्हणून काम करणाऱ्या ए. बेस नावाच्या कंपनीत धीरूभाई मासिक ३०० रुपये पगारावर पेट्रोल पंपावर नोकरी करू लागले.

ही कंपनी लहान मोठ्या अनेक उद्योगांमध्ये कार्यरत होती. आंतरराष्ट्रीय कंपनीचा भाग असल्याने तेथे अनेक देशांचे व्यापारी येत असत. तेथेच धीरूभाई यांनी स्वतःची रिफायनरी स्थापन करावी असे स्वप्न पाहण्यास सुरुवात केली.

धीरूभाई त्यांचे वडीलबंधू रमणिकलाल यांच्यासह एडनमध्ये राहत. गुजराती लोकांची आवडनिवड या दोघा भावांना माहीत असल्याने त्यांनी गुजराती खाद्यपदार्थ भारतातून मागवून ते पदार्थ एडनला विकण्यास सुरू केले. थोड्याच दिवसात अंबाणी बंधू लोकप्रिय होऊ लागले. यामुळे ओळखी तर वाढत गेल्या पण व्यापारी धीरूभाईंना प्रत्येकाकडून काहीतरी माहिती मिळत गेली. त्यामुळे त्यांना धंद्याचे गणित मांडता येऊ लागले.

आपल्या हुशारी, मेहनत, चिकाटी या गुणांच्या जोरावर धीरूभाई ए. बेस मध्ये कारकून ते सेल्स मॅनेजर या पायऱ्या ओलांडून गेले. आपल्या कामापुरते अरबी भाषेवर प्रभुत्वही धीरूभाईंनी मिळविले होतेच, अनेक मित्रही जोडले. या मित्र परिवारात भारतीय आणि परदेशी असे सगळेच होते. त्यातील सुशीलभाई कोठारी, नटुभाई संघवी आणि हरकिसन पारेख हे पुढे रिलायन्सचे मुख्य मार्गदर्शक, आधारस्तंभच बनले.

१९५१ साली धीरूभाई यांचे वडील हिराचंद अंबाणी यांचे निधन झाले. आई जमनाबेन यांच्या पुढाकाराने धीरूभाईंचा विवाह जामनगरच्या कोकिलाबेन पटेल यांच्याशी मार्च १९५४ मध्ये झाला. विवाहानंतर धीरूभाई आणि कोकिलाबेन यांनी एडनला संसार थाटला. लग्नानंतर तीन वर्षांनी मुकेश यांचा जन्म झाला. धीरूभाईंना आधीपासूनच दुसऱ्याची नोकरी करण्यापेक्षा स्वतःचा व्यवसाय असावा असे वाटत होते. आपला स्वतंत्र व्यवसाय भारतातच उभा करावा हेही धीरूभाईंनी पक्के केले. शेवटी ३१ डिसेंबर १९५८ला धीरूभाईंनी एडन कायमचे सोडून दिले आणि ते आपल्या कुटुंबीयांसह भारतात परतले.

१९५९ साली धीरूभाई यांनी १५,०००/- रुपयांची गुंतवणूक करून मशीद बंदर मुंबई येथे त्र्यंबकलाल चंदरजी दामाणी (नात्याने दूरचे मामा) यांच्यासह ६५:३५ अशी भागीदारी करून रिलायन्स कमर्शियल कॉर्पोरेशनची स्थापना केली आणि ते मसाले (मिरी, लवंग, सुपारी, सुंठ, तमालपत्र, हळद, काजू इ.) आणि रेयॉन कापडाचा व्यवसाय करू लागले. मामा त्र्यंबकभाई हे स्लीपिंग पार्टनर होते. खरे काम भारतात धीरुभाई आणि एडनमध्ये ज्येष्ठ बंधू कारभार सांभाळू लागले.

मुंबईला आल्यावर धीरूभाई सर्व कुटंबीयांसह भुलेश्वर येथे एका चाळीत राहू लागले. या चाळीत सुमारे ५०० कुटुंबे रहात होती. पहिले अपत्य मुकेश अंबानी याचा जन्म एप्रिल १९५७ मध्ये, धीरूभाई यांचे दुसरे अपत्य अनिल याचा जन्म जून १९५९ मध्ये, थोरली मुलगी दीप्ति हिचा जानेवारी १९६२ मध्ये तर धाकटी मुलगी नीना हिचा जन्म १ नोव्हेंबर १९६४ रोजी झाला. मोठे भाऊ रमणिकभाई यांनी १९६१ पर्यंत एडनचा धंदा आणि स्वतःची नोकरी दोन्ही सांभाळले. मग मात्र धीरूभाईंचा वाढता व्याप बघता तेही भारतात परतले आणि धीरूभाईंसह धंद्यातच रमले. शिवाय लहान भाऊ नटुभाई यांचे शिक्षण पूर्ण झाल्यामुळे तेही कामास मदत करू लागले.

१९६६ साली धीरूभाई अंबाणी यांनी अमदावाद जवळच्या नरोडा येथे अत्याधुनिक टेक्स्टाईल मिलची सुरुवात केली. हे पाऊल त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. १९७१ साल धीरूभाईंसाठी प्रगतीचे वर्ष ठरले. भारत सरकारचे निर्यात धोरण अनुकूल होते, त्याचा फायदा उचलत धीरूभाईंनी आपले कापड रशिया, सौदी अरेबिया, पोलंड, झांबिया, युगांडा इ. देशांमध्ये निर्यात करण्यास सुरुवात केली. दर्जेदार माल आणि वाढती बाजारपेठ यामुळे धीरूभाई यशाच्या पायऱ्या चढू लागले. १९७५ साली जागतिक बँकेने 'विकसनशील देशांमधील सर्वोत्कृष्ट प्रकल्प' म्हणून नरोडाच्या प्रकल्पाची निवड केली.

१९७७ साली धीरूभाईंनी रिलायन्सचे रूपांतर पब्लिक लिमिटेड कंपनीत केले. लहान लहान गुंतवणूकदारांकडून भागभांडवल पैसा गोळा करणारे धीरूभाई भारतातील पहिले उद्योगपती ठरले. त्यांच्या पहिल्याच प्रयत्नासाठी सुमारे ५८,००० लोकांनी आपले पैसे गुंतविले. १९७८ साली धीरूभाई कापड व्यवसायात पूर्णपणे उतरले. त्यांनी विमल या नावाने कापड विक्रीस सुरुवात केली. साधारणपणे दिवसाला एक या सरासरीने धीरूभाईंनी १९७७ ते १९८० या काळात देशभरात विमलची शोरूम थाटली.

१९८१ साली मुकेश अंबाणी अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठातून शिक्षण संपवून भारतात परतले तर १९८३ साली अनिल अंबाणी अमेरिकेतील वॉर्टन स्कूल येथून आपले शिक्षण पूर्ण करून भारतात आले.

१९९९-२००० मध्ये रिलायन्सने २५,००० कोटींची गुंतवणूक करून जामनगर, गुजरात येथे जगातील सर्वात मोठी रिफायनरी सुरू केली तसेच २००० मध्ये २५,००० कोटींची गुंतवणूक करून इन्फोकॉम क्षेत्रातही प्रवेश केला.

धीरूभाईंचा दबदबा सर्वत्र जाणवू लागला. फिक्कीने २० व्या शतकातील साहसी पुरुष म्हणून धीरूभाईंचा गौरव केला.

२४ जून २००२ या दिवशी धीरूभाईंना मेंदूत रक्ताची गाठ झाल्याने पक्षाघाताचा तीव्र झटका आला. त्यांना दवाखान्यात दाखल करण्यात आले. पण उपचारांना यश आले नाही. अखेर ६ जुलै २००२ या दिवशी धीरूभाई अंबाणींचे निधन झाले.

माझ्या यशाचे रहस्य म्हणजे माझी महत्त्वाकांक्षा आणि इतर लोकांचे मन जाणून घेणे आहे... संकटातही आपले ध्येय गाठण्यासाठी प्रयत्न करा... अडचणींना संधींमध्ये रूपांतर करा. शेवटी तुम्हाला यश मिळेल... हे विचार होते धीरूभाई अंबानी यांचे.

••••••••••

# पाहिला सुपरस्टार राजेश खन्ना



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांचा आज जन्मदिन.

राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते.

त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते.

राजेश खन्ना हे सेंट साबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले.

मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले.

१९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली.

या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या.

त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही.

शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले.

त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला. बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, ..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....

राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!

••••••••••

## लाडकी बहीण योजना..

दीड हजार दिले, ताई
आता काही मागू नको

नसेल नोकरी तुझ्या लेकाला
नवरा कुठेही राबत असेल
फाटक्या तझ्या संसारात
आशा काही जागत नसेल
विसरून जा नोकरी बिकरी
आमच्यावर रागाऊ नको
दीड हजार दिले ताई
आता काही मागू नको.

फुकट सिलेंडर दिले तुला
धान्य सुध्दा फुकट दिले
तेल मीठ मिरचीला
दीड हजार रोख दिले
उगाच आणखी हट्ट करत
माझ्या मागे लागू नको
दीड हजार दिले, ताई
आता काही मागू नको.

धुणी भांडी करत फिरतेस
पावसात झोपडी गळते आहे
दिवस रात्र राब राबून
काय पदरात पडते आहे...?
निवडून आल्यावर सारे मिळेल
स्वप्न बघत जागू नको
दीड हजार दिले, ताई
आता काही मागू नको.

दारुडा नवरा तुला मारायला
रोज पिऊन येतो आहे
त्याच दारूच्या करातून ताई
योजना तुला देतो आहे
दारूबंदी अगं ताई
आता काही होणार नाही
कळतय मला संसार तुझा
धडपणे होणार नाही...
अडचण आमची समजून घे
दारूबंदी साठी रागाऊ नको....
दीड हजार दिले, ताई
आता काही मागू नको.

फक्त ताई फॉर्म भर
दीड हजार घरपोच येतील
पुन्हा आमचे सरकार निवड
प्रश्न सारे संपून जातील
सारखे सारखे प्रश्न विचारून
विरोधी पक्षासारखी वागू नको
दीड हजार दिले, ताई
आता काही मागू नको

**हेरंब कुलकर्णी**

## हिवाळ्यात अळशीच्या बिया खाण्याचे फायदे



हिवाळ्यात योग्य आहार घेतल्याने शरीर उबदार आणि ऊर्जावन राहण्यास मदत होते. हिवाळ्यामध्ये अळशीच्या बियांचा आहारात समावेश करणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानल्या जाते.

अळशीच्या बियांमध्ये भरपूर पोषक घटक असतात. अळशी केवळ थंडीपासूनच शरीराचे संरक्षण करत नाही तर हृदय, त्वचा, केस आणि पचनसंस्थेसाठी देखील फायदेशीर आहे.

हिवाळा शरीराला आतून उबदार ठेवण्यासाठी अळशी फायदेशीर आहे. अळशीमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड आणि प्रथिने हिवाळ्यात शरीराला ऊर्जा देतात.

हिवाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती मजबूत ठेवणे आवश्यक असते. अळशीमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट आणि लिग्नान रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. त्यामुळे सर्दी खोकल्यासारख्या सामान्य आजारापासून बचाव होतो.

अळशीमध्ये ओमेगा फॅटी ॲसिड आणि पोटॅशियम असते ज्यामुळे हृदयाच्या धमन्या निरोगी राहतात. हे कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आणि रक्तदाब संतुलित करण्यास मदत करते.

हिवाळ्यात पचनक्रिया मंदावते ज्यामुळे बद्धकोष्ठता आणि अपचन सारख्या समस्या होऊ शकतात. अळशीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर असते. जे पचनक्रिया सुधारण्यास आणि पोट साफ करण्यास मदत करते.

हिवाळ्यात त्वचा कोरडी होते आणि केस निर्जीव होतात. अळशीमध्ये असलेले फॅटी ?सिड त्वचेला आद्रता देतात आणि केसांचे पोषण करतात. त्याची चमक आणि ताकद टिकवून ठेवतात.

अळशीमध्ये भरपूर प्रमाणात फायबर आणि प्रथिने असतात ज्यामुळे पोट दीर्घकाळ भरल्यासारखे वाटते. हिवाळ्यात जास्त भूक लागत नाही आणि त्यामुळे वजन नियंत्रणात राहते.

तथापि, याचे काही तोटेही आहेत. अळशी मध्ये मोठ्या प्रमाणात फायबर असते जास्त प्रमाणात ते खाल्ल्याने पोटदुखी, पोट फुगणे किंवा गॅसची समस्या होऊ शकते. त्यामुळे त्याचे अतिसेवन हानिकारक ठरू शकते शक्य असल्यास दररोज एक ते दोन चमचे पेक्षा जास्त जवस खाऊ नये. •••

# शेतीच्या भागीदारीपासून मिळालेला मोबदला तथा व्याजावर टॅक्स लागतो का?

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**

सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा
सीए. आकाश जी. मुंदडा
जालना




गेल्या अनेक आठवड्यापासून आपण शेतीच्या उत्पन्नाबद्दल बघत आहोत. आज आपण याच विषयावर नवीन माहिती बघणार आहोत, नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात राहणार आहे.

**प्रश्न :** शेती व्यवसायाच्या भागीदाराला मोबदला मिळत असेल ते शेतीचे उत्पन्न म्हणून धरले जाईल का?

■ प्रश्न असा आहे की एक पार्टनरशीप फर्म आहे. ही फर्म शेतीचे व्यवसाय करते. या फर्म मध्ये भागीदार आहेत. त्या भागीदारांना शेतीच्या उत्पन्ना व्यतिरिक्त त्या भागीदारांना शेतीत काम करण्याचा मोबदला ही मिळतो. या मिळालेल्या व्याज व मोबदल्यावर इन्कमटॅक्स लागेल का? याचे उत्तर सुप्रीम कोर्ट यांनी कमिश्नर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध आर. एम. चिदंबरम पिलाई या केस मध्ये दिले आहे. हे केस (१९७७) १०६ ITR २९२ मध्ये आलेले आहे.

या केस मध्ये भागीदार यांना शेतीच्या धंद्यापासून मिळालेल्या पैशावर नफा मिळत होता. या नफ्या व्यतिरिक्त त्यांना वेगळा मोबदला ही मिळत होता. कोटार्ने असा दृष्टीकोन घेतला की मोबदला हा सुद्धा भागीदारांचे शेतीचेच उत्पन्न असुन यावर इन्कमटॅक्स लावण्यात येऊ नये. या विषयावर निर्णय देताना कोर्टाने सांगितले की मालक व कर्मचारी यामध्ये EMPLOYEMENT CONTRACT असते व मालक व कर्मचारी असे दोन व्यक्ती वेगळे असतात. परंतु भागीदारीमध्ये मालक व कर्मचारी यांची स्पष्ट विभाजनी करणे अवघड आहे. यामुळे भागीदारास मिळणारा मोबदला हा शेतीचाच धरला जाईल.

**प्रश्न :** शेतीच्या व्यवसाय भागीदाराने गुंतवलेल्या पैशावर मिळणाऱ्या व्याजाचे उत्पन्न शेतीचे धरले जाते का?

■ सोप्या भाषेत असे आहे की भागीदारासाठी फर्म शेतीचा व्यवसाय करते. त्यात भागीदाराचे भांडवल गुंतलेले असते.त्या भांडवलावर भागीदारास व्याज मिळते तर त्या व्याजावर इन्कमटॅक्स लागतो की नाही.

याचे स्पष्ट उत्तर कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुध्द एम. एल. महिंद्र (1978) 112 ITR 323 या केसमध्ये गौहटी हायकोटार्ने दिले आहे.त्यात कोटार्ने असे स्पष्ट सांगितले आहे की शेतीच्या व्यवसायात गुंतलेल्या फर्मच्या भागीदारास व्याज मिळत असेल तर ते व्याज शेतीचेच उत्पन्न म्हणून धरले जाईल व अशा मिळालेल्या व्याजास शेतीचेच उत्पन्न म्हणून धरले जाईल पर्यायाने अशा मिळालेल्या व्याजावर भागीदारास इन्कमटॅक्स भरण्याची गरज पडणार नाही.

आपण कायद्यात शेतीचे उत्पन्न कोणते व कोणत्या उत्पन्नावर इन्कमटॅक्स लागत नाही. यावर सखोल चर्चा करीत आहोत. पुढील आठवड्यात आपण बघणार आहोत की फार्म हाऊसचे उत्पन्न शेतीचे उत्पन्न असते की नसते. तसेच शुटींग साठी शेती दिली असेल तर त्यावर टॅक्स लागतो का? या विषयावर चर्चा करणार आहोत.

■ ■ ■

## अशोकायन

### शॉकप्रुफ बना

लोक काय म्हणतील चा
करत राहिले विचार
तर जीवनातील स्वप्ने
कधीच होणार नाही साकार

धेय्य निश्चीत करुन
प्रयत्नांची करा पराकाष्ठा
लोक काय म्हणतात
याकडे दुर्लक्ष करा बाप्पा ..

असामान्य यश
तुमच्या पदरात पडो
हेच लोक तुमचा उद्या
करतील उदो उदो!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# आयसीआयसीआय प्रू विश - आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफकडून महिलांसाठी खास जीवन विमा उद्योगातील पहिली योजना

**नागपूर, २८ डिसेंबर :** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सने महिलांसाठी डिझाइन केलेली 'आयसीआयसीआय प्रू विश' ही योजना लाँच केली आहे. जीवन विमा उद्योगातील आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सची ही योजना क्रांतीकारी पाऊल मानले जात आहे. आयसीआयसीआय प्रु विश योजनेतून महिलांना स्तन, गर्भाशय, गर्भाशयाचे कर्करोग आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांच्या निदानासाठी आरोग्य विमा कवच रकमेच्या १००% पर्यंत त्वरित परतावा दिला जाईल.

महत्त्वाचे म्हणजे, प्रीमियमची रक्कम ३० वर्षांच्या कालावधीसाठी स्थिर राहणार आहे. ज्यामुळे विमा धारकाला त्यांच्या निधीचे अधिक चांगल्या पद्धतीने नियोजन करता येईल. या उत्पादनाचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे प्रीमियम हॉलिडे. यातून वीमा धारकाला प्रीमियम भरण्याच्या कालावधीत कधीही १२ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रीमियम भरण्याचा पर्याय मिळणार आहे. विशेष म्हणजे, यात विमा धारक महिलेला मातृत्वाशी संबंधित गुंतागुंत आणि नवजात बाळाच्या जन्मजात आजारांशी संबंधित विमा संरक्षण घेण्याचा पर्याय देखील मिळेल.

याबाबत श्री अमित पल्टा, चीफ प्रॉडक्ट अँड डिस्ट्रीब्यूशन ऑफिसर, आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स म्हणाले, आयसीआयसीआय प्रू विश हे आयुर्विमा उद्योगातील पहिले आरोग्य उत्पादन आहे जे विशेषतः महिलांच्या आरोग्यविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. यातून गंभीर आजाराच्या निदानाच्या वेळी महिलांना अशा कठीण प्रसंगांत आर्थिक परिस्थितीला तोंड देण्यासाठी एकरकमी रक्कमेचे पाठबळ मिळेल.

यात ३० वर्षांसाठी प्रीमियम गॅरंटी प्रदान करण्यासोबतच, उत्पादनाची रचना अशा पद्धतीने केली आहे, ज्यामुळे विमा धारक महिलेला विशिष्ट वैद्यकीय परिस्थितींसाठी अनेक दावे करता येतात. विमाधारकाला मिळालेले अतिरिक्त पेआउट त्यांना पुनर्वसन खर्च उचलण्यास मदत करू शकते.

# 'महा' राज्याला २ लाख कोटींचा 'बूस्टर डोस' हवा : हेमंत पाटील



**पंतप्रधान, गृहमंत्र्यांसह अर्थमंत्र्यांची भेट घेणार**

**मुंबई, २८ डिसेंबर :** देशातील सर्वाधिक श्रीमंत राज्यावरील कर्जाचे डोंगर वाढत आहे. राज्य सरकारच्या 'लाडकी बहिण योजने'सह इतर योजनांमुळे तिजोरीवरील ताण वाढतोय. विकास कामांसाठी निधींची चणचण भासत असल्याने विकास गतीला खिळ बसली आहे. केंद्र आणि राज्यात असलेल्या भाजपच्या 'डबल इंजिन' सरकारने यावर तात्काळ तोडगा काढण्याची आवश्यता आहे. केंद्राने त्यामुळे राज्य सरकारला २ लाख कोटींच्या मदतीचा 'बुस्टर डोस' द्यावा, अशी मागणी इंडिया अगेन्स्ट करप्शनचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी शनिवारी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांची यासंदर्भात लवकरच भेट घेणार असून राज्यावरील कर्जाचे डोंगर कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यासाठी त्यांच्याकडे साकडे घालणार असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले. केंद्राच्या आर्थिक मदतीशिवाय राज्याचा खोळंबलेल्या विकासाला गती मिळणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. दिवासगणिक सरकारवरील कर्जाचे डोंगर वाढत आहे. अनेक योजनांमध्ये निधी वळता केल्याने ही स्थिती निर्माण झाली आहे. अनेक कंत्राटदारांचे देयके प्रलंबित आहेत. काही कंत्राटदारांनी यासंदर्भात आंदोलन देखील सुरू केले आहे. शिवाय अनेक कंत्राटदार कर्जबाजारी झाले असल्याचे देखील समोर आले आहे. ही स्थिती समोर असतांना देखील विकास कामांऐवजी 'फ्री बी' योजनांकडे निधी वळता केला जात असेल तर विकास कसा होणार? असा सवाल पाटील यांनी व्यक्त केला.

केंद्रात भेटी घेण्यापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच एकनाथ शिंदे यांची भेट घेणार असून कर्जमुक्तीसाठी एक प्रस्ताव तयार करणार असल्याचे देखील पाटील म्हणाले. मागील दहा वर्षांपासून राज्य सरकारकडून घेण्यात आलेल्या कर्जाचा डोंगर आता ७ लाख ८२ हजार ९९१ कोटींवर पोहोचला आहे. महाराष्ट्राचा जीडीपी ४२ लाख कोटींवर गेला आहे. परंतु, जीडीपीच्या तुलनेत कर्ज आणि कर्जाचे प्रमाण १८.३५ टक्क्यांवर पोहोचले आहे. भविष्यात त्यामुळे अडचणी उद्भवण्याची शक्यता असल्याचे पाटील म्हणाले.

# मुंबई महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे गटाची रणनीती काय ?

**मुंबई :** इंडि अलाईन्स आणि महाविकास आघाडीचे (एमव्हीए) नाव न घेता, आता शिवसेना ऊबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. २०१७ मध्ये मुंबई पालिकेची सत्ता काबीज करण्यात अगदीच चुकलेला भाजप मुंबई पालिकेत सत्ता काबीज करण्यासाठी प्रत्येक पद्धतीचा अवलंब करू शकतो याची उद्धव ठाकरेंना जाणीव आहे. अनेकदा विधानसभा निवडणुका हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा ट्रेलर मानला जातो. अशा स्थितीत उद्धव ठाकरेंची पक्ष पदाधिकाऱ्यांकडून तयारी करून घेतली जात आहे. शिवसेना ऊबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मातोश्रीवर मॅरेथॉन सभा सुरू केली आहे. कोणत्या भागातील नेत्यांची सभा कधी होणार, याचे योग्य नियोजन करण्यात आले आहे. पदाधिकाऱ्यांना रिपोर्टकार्ड देण्यासही सांगण्यात आले आहे. २०२० च्या हैदराबाद महापालिका निवडणुकीची रणनीती भाजप मुंबईतही अवलंबू शकते, असे जाणकारांचे मत आहे. भाजपच्या हैदराबाद रणनीतीने भाजपला ४ जागांवरून थेट ४८ जागांवर नेले. हैदराबाद महानगरपालिका निवडणुकीत भाजपला सत्ता काबीज करता आली नाही, पण हैदराबादमधील त्यांच्या होम पिचवर असदुद्दीन ओवेसी यांना दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर ढकलले.

# वी महाराष्ट्रामध्ये ४जी डाउनलोड स्पीड, गेम्स आणि व्हॉइस ऍप अनुभव देणारी टॉप कंपनी, ओपनसिग्नल रिपोर्ट

**पुणे, २८ डिसेंबर :** देशातील आघाडीची टेलिकॉम ऑपरेटर, वोडाफोन आयडियाने आज घोषणा केली की, ४जी युजर्सच्या ४जी अनुभवाचे परीक्षण करणाऱ्या, ओपनसिग्नलच्या ४जी नेटवर्क एक्स्पीरियंस रिपोर्ट नोव्हेंबर २०२४ मध्ये त्यांची विशेष दखल घेण्यात आली आहे. या अहवालानुसार, महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त डाउनलोड स्पीड्स, व्हॉइस ऍप आणि गेमिंगच्या ग्राहक अनुभवाच्या निकषांमध्ये वीचा पहिला क्रमांक आहे.

प्रदेशात सर्वत्र नेटवर्कची कामगिरी वाढवण्यासाठी वी कडून सातत्याने केल्या जात असलेल्या प्रयत्नांचे हे फळ आहे. या वर्षीच्या एप्रिल महिन्यात वी ने FPO मार्फत १८००० कोटी रुपये उभारले, संपूर्ण देशभरात ४जी नेटवर्क वाढवण्यासाठी वी वचनबद्ध आहे.

याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून वी ने या क्षेत्रातील जवळपास ६५०० ४जी लोकेशन्स अपग्रेड केली आहेत. ४१०० पेक्षा जास्त लोकेशन्सना L900 MHz आणि २१०० MHz स्पेक्ट्रम बँड्सवर अतिरिक्त लेयर्स तैनात करून कनेक्टिविटीमध्ये सुधारणा घडवून आणली आहे. त्यामुळे इनडोअर कव्हरेज उत्तम मिळत आहे आणि डेटा स्पीड देखील सुधारला आहे. याखेरीज वी ने २००० पेक्षा जास्त लोकेशन्सना २१०० MHz स्पेक्ट्रम बँडवर १० MHz ते १५ MHz नेटवर्क बँडविड्थचा विस्तार करण्यात आला आहे. या सुधारणांमुळे एकंदरीत नेटवर्क क्षमता १२% नी वाढली आहे.

वोडाफोन आयडियाचे महाराष्ट्र आणि गोवा सर्कलचे क्लस्टर बिझनेस हेड रोहित टंडन यांनी सांगितले, महाराष्ट्र आणि गोव्यामध्ये लक्षणीय कामगिरीसाठी आमची विशेष दखल घेण्यात आली आहे आणि ही आमच्यासाठी अतिशय अभिमानास्पद बाब आहे. आमचे नेटवर्क मजबूत करण्यासाठी आणि आमच्या ग्राहकांसाठी अखंडित कनेक्टिविटी सुनिश्चित करण्यासाठी आम्ही करत असलेल्या सातत्यपूर्ण गुंतवणुकीचे हे फळ आहे. कनेक्टिविटीमध्ये उत्कृष्टता साध्य करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

## राशीभविष्य

**मेष :** सहका-यांसोबत अधिक समन्वय निर्माण करावा लागेल राजकारणात नवे मित्र बनतील. नोकरीतील संबंध फायदेशीर ठरतील. खाद्य व्यवसायाशी संबंधित लोकांना विशेष लाभ मिळेल.

**वृषभ :** कुटुंबातील सदस्यांसोबत फिरायला जाऊ शकता. आजचा दिवस सुखाचा असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुमच्याबद्दल वाईट वाटू शकते. तब्येतीत काही चढ-उतारांमुळे तुम्ही अस्वस्थ राहाल.

**मिथुन :** नोकरी मिळण्याची शक्यता आहे. कामाची पातळी चांगली राहील. कार्य व्यवसायात उत्साह दाखवाल. सहका-यांचे सहकार्य मिळेल. न्यायालयीन प्रकरणे निकाली निघतील.

**कर्क :** कामाच्या ठिकाणी तुमच्यावर जबाबदा-यांचे ओझे अधिक असेल, परंतु आपण त्या सहजपणे पार पाडाल. एखादा मित्र तुमच्याकडे पैशांशी संबंधित काही मदत मागू शकतो.

**सिंह :** आजचा दिवस कठोर परिश्रम करण्याचा असेल. व्यवसायात इच्छित लाभ मिळाल्याने आनंदी व्हाल. आपल्या आजूबाजूला काही वाद विवाद होत असतील तर त्यात गप्प बसले पाहिजे.

**कन्या :** निर्णय तुमच्या बाजूने होईल, व्यावसायिक सहलीला जावं लागेल. आज प्रेमसंबंधांमध्ये उत्साह राहील. नात्यात सहजता वाढेल. एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीचे सहकार्य मिळेल.

**तुळ :** आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने चांगला नसणार. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये बदल करावे लागतील. कुटुंबातील एखाद्या सदस्याला नवीन नोकरी मिळाल्यास कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल.

**वृश्चिक :** एखादी कायदेशीर बाब तुम्हाला बराच काळ त्रास देत असेल तर तीही दूर होईल. आजचा दिवस शहाणपणा आणि विवेकाने काम करण्याचा असेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**धनु :** आजचा दिवस लाभदायक ठरणार आहे. बिझनेसमध्ये कोणतेही काम तुमच्या पार्टनरवर सोडू नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुमचा कोणताही करार रखडला असेल तर तो अंतिम असेल.

मकर : कामाच्या ठिकाणी सहका-याशी जवळीक वाढेल. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. व्यवसायात लोकांचे सहकार्य मिळेल. सतर्कता आणि सावधगिरी बाळगा. तुमच्या ध्येयांवर परिणाम होऊ देऊ नका.

**कुंभ :** कामाच्या ठिकाणी तुम्ही तुमच्या चांगल्या विचारसरणीचा फायदा घ्याल. कुटुंबातील एखाद्या सदस्यासोबत तुमचे भांडण होऊ शकते, परंतु आपल्या पैशांबाबत निष्काळजीपणा करू नका.

**मीन :** कामाच्या गतीवर परिणाम होऊ शकतो. तुम्हाला परिचित आणि कुटुंबातील सदस्यांचे सहकार्य मिळेल. व्यवसायात कठोर परिश्रम करावे लागतील. नोकरीत अधीनस्थांशी विनाकारण मतभेद होतील.


## चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

क्रमांक :- चंशमनपा/अग्निशमन विभाग /२०२४/४४२७ दिनांक : २७/१२/२०२४

**निविदा सुचना**

मा. आयुक्त, चंद्रपूर शहर महानगरपालिका जि. चंद्रपूर यांचे वतीने खालील कामासाठी बि १ दोन लिफापा पध्दतीने कंत्राटदाराकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशिल | निविदे सोबत भरावयाची इसारा रक्कम | कोरे निविदा प्रपत्राची किंमत |
|---|---|---|---|
| 01 | महानगरपालिका अधिनिस्त इमारती, शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्र करीता AFE Fireball खरेदी करण्याबाबत | रु.९८९९/- | रु.५६०/- |

| | |
|---|---|
| निविदा विक्री | दिनांक ३०/१२/२०२४ ते १३/०१/२०२५ ला दु.५:00 वाजेपर्यंत |
| निविदा सादर करावयाची दिनांक | दिनांक १३/०१/२०२५ ला दुपारी ५:00 वाजेपर्यंत |
| निविदा उघडणी दिनांक | दिनांक १४/०१/२०२५ ला दु.१२:00 वाजता शक्य झाल्यास |

अटी व शर्ती ०१:- वरील कामाच्या अटी व शर्ती अग्निशमन विभाग, चंशमनपा, येथे कार्यालयीन दिवसी पाहावयास मिळेल

अति. आयुक्त
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर


# लग्न पत्रिकांची विल्हेवाट लावताना...



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई
मो.क्र. ९६६४५५९७८०

सध्या सर्वत्र लगीन सराई सुरु आहे. प्रतिदिन कुठे ना कुठे विवाहाची गाणी, बेण्डबाजाचे स्वर ऐकू येत आहेत. विवाह हा जीवनातील अत्यंत महत्वाचा क्षण मानला जातो. तो क्षण अधिक आनंददायी आणि यादगार व्हावा यासाठी प्रत्येक जण आपापल्या ऐपतीनुसार प्रयत्न करत असतो. विवाह निश्चित झाला कि सर्वात प्रथम कृती केली जाते ती म्हणजे पत्रिका छापण्याची आणि कोणाकोणाला निमंत्रण द्यायचे त्याची यादी तयार करण्याची. पत्रिकेसाठी मजकूर तयार करणे, पत्रिकेत नमूद करायची नावे काढणे, पत्रिकेचे नमुने पाहणे या गोष्टी एकामागोमाग सुरु होतात.


कोकणात पूर्वी विवाहाचे निमंत्रण द्यायला जाताना नारळ घेऊन जात असत. घरातील जेष्ठ मंडळींच्या हातात आदराने श्रीफळ देऊन त्यांचा आशीर्वाद घेतला जात असे. घरातील शुभकार्याला कुटुंबातील सर्वांना उपस्थित राहण्याचे तोंडी निमंत्रण दिले जात असे. पुढे प्रिंटेड पत्रिकांचा जमाना आला. कोणाकोणाला पत्रिका द्यायच्या याची यादी तयार करून कोणाला कोणी आणि कधी पत्रिका द्यायला जायचे याचे नियोजन केले जाते. या संपूर्ण निमंत्रण प्रक्रियेसाठी किमान १५ दिवस राखून ठेवावे लागतात. आता तर सोशल मीडियाचा जमाना आहे. सर्वच कार्यक्रमांचे निमंत्रण व्हाट्सअप च्या माध्यमातून एका सेकंदात एका क्लिकमध्ये सर्वांना पाठवले जाते. हल्ली तर पत्रिकेच्या फोटोसह निमंत्रणाचा व्हिडीओ तयार करून तो पोस्ट केला जातो. फेसबुक, ट्विटर आणि इंस्टाग्रामवर पत्रिकेची इमेज अपलोड करून सर्वांना लग्नाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले जाते. जमाना बदलला असला, निमंत्रण पद्धतीत सोशल मीडियाने अतिक्रमण केले असले, तरी निमंत्रण पत्रिकेचे महत्व अद्याप कमी झालेले नाही हेही खरे. थोड्या का होईना जवळच्या नातेवाईकांना आणि प्रतिष्ठित मंडळींना देण्यासाठी पत्रिका छापल्या जातातच. कुटुंबाच्या ऐपतीनुसार निमंत्रण पत्रिकेचे मूल्य ठरवले जाते. ज्याला बडेजाव दाखवायचा आहे अशी मंडळी एकेका पत्रिकेसाठी १०० ते २०० रुपयेसुद्धा खर्च करतात. अर्थात पत्रिका पाहणारा केवळ लग्नाची तारिख आणि मुहूर्त पाहतो त्यामुळे बाकीच्या शोबाजीला काही अर्थ उरत नाही. सध्या लगीनसराई सुरु असल्याने घरोघरी लग्नाच्या पत्रिका वाटल्या जात आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या घरात पत्रिकांचा खच येऊन पडला आहे.

दरवर्षी विवाहाच्या मोसमात घरी येऊन पडणाऱ्या पत्रिकांचे पुढे करायचे काय हा प्रश्न प्रत्येकालाच पडतो. काहीजण त्या रद्दीत देतात तर काही थेट केराच्या डब्यात टाकतात. हिंदू धर्मात लग्नपत्रीकेवर श्री गणेशाचे चित्र छापण्याची किंवा मुखपृष्ठावर गणेशाचे चित्र असलेली पत्रिका विकत घेण्याची प्रथा आहे. गणपतीचे चित्र असलेल्या अशा पत्रिका केराच्या डब्यात टाकल्याने श्री गणेशाचा अवमान होतो. ज्या गणेशाच्या स्मरणाने आणि पूजनाने आपण कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करतो. ज्या गणेशाला गणेश चतुर्थीच्या काळात मूर्तिरूपाने आपण सन्मानाने घरी आणून त्याची मनोभावे पूजा करतो, ज्याला आपल्या देवघरात अग्रभागी स्थान देतो. त्याच्या कृपेसाठी उपास तापास करतो त्या गणेशाचा अशाप्रकारे होणारा अवमान आपण कधी लक्षातच घेत नाही. रद्दीत दिल्या जाणाऱ्या पत्रिकांचे पुढे काय होते हेही आपणास ठाऊक नसते. देवतेचे नाम अथवा देवतेचे चित्र ज्या ठिकाणी असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप आणि शक्ती कार्यरत असते असे शास्त्र सांगते. त्यामुळे पत्रिकेवरील देवतेच्या चित्राचा सन्मान राखणे आवश्यक आहे. मात्र या पत्रिका साठवून तरी काय करायचे हाही प्रश्न आहेच. अशावेळी पत्रिकेवरील देवतेचे चित्र व्यवस्थित कापून ठेवावे आणि त्या चित्राचे देवघरातील निर्माल्यासोबत वाहत्या पाण्यात विसर्जन करावे, जेणेकरून आपल्या हातून देवतेचा अवमान होणार नाही आणि मनाचेही समाधान होईल. घरी येणाऱ्या श्री सत्यनारायण महापूजेच्या, वास्तुशांतीच्या पत्रिकांचा बाबतीतही आपण वरील प्रमाणे कृती करू शकतो. वर्ष संपत आले आहे, त्यामुळे नवीन कॅलेंडर आपल्या घरी आलेच असेल. जुने कॅलेंडर रद्दीत देताना, त्यांतील देवतांच्या छायाचित्रांची कात्रणे काढून तीसुद्धा निर्माल्यासोबत विसर्जित करूया !

# पल्लवी गुर्जरचा मॅच फिक्सिंग- द नेशन अ‍ॅट स्टेक सोबत सिनेमा निर्मितीमध्ये प्रवेश

**मुंबई, २८ डिसेंबर :** पल्लवी गुर्जर, २० + वर्षे मनोरंजन उद्योग आणि नाट्य क्षेत्रातील दिग्गज, राजकारणाच्या परिणामी संपूर्ण भारतात झालेल्या बॉम्बस्फोटांच्या मालिकेदरम्यान घडलेल्या घटनांच्या पुनरावृत्तीमध्ये निर्माती म्हणून पदार्पण करते. ती २ दशकांहून अधिक काळ मनोरंजन उद्योगात आहे आणि तिने हेमा मालिनी, लिलेट दुबे आणि अनुपम खेर यांसारख्या प्रसिद्ध सेलिब्रिटींसोबत काम केले आहे. शिवाय, ती आता मॅच फिक्सिंग- द नेशन अ‍ॅट स्टेक सह सिनेमाच्या निर्मितीच्या जगात ठळकपणे एंट्री करण्यासाठी सज्ज आहे. १० जानेवारी २०२५ रोजी 'मॅच फिक्सिंग- द नेशन अ‍ॅट स्टेक ' च्या प्रीमियरला उपस्थित राहण्यासाठी आम्ही तुम्हा सर्वांना आमंत्रित करतो.


ती आर्ट अरिना या थिएटर आणि मनोरंजन उद्योगासाठी सल्लागार कंपनीच्या संस्थापक संचालक आहेत आणि तिच्या नावावर 'मेरा वो मतलब नही था', 'डिनर विथ फ्रेंड्स' इत्यादीसारखे अनेक प्रशंसित प्रकल्प आहेत. २००३ मध्ये ही कंपनी सुरू केल्यापासून, तिच्या कामाबद्दलची तिची आवड आणि प्रबळ झुकाव आणि ती ज्यांच्यासोबत काम करते त्यांच्याप्रती तिच्या समर्पणामुळे ती झपाट्याने वाढली आहे.




पल्लवी गुर्जर 'द गेम बिहाइंड सेफ्रॉन टेरर' या पुस्तकाने प्रेरित होती, जे के.एस. खटाणा यांनी परिस्थिती आणि राजकारण, वैयक्तिक लाभ, धर्म आणि विनाश यांच्यातील रेषा कशा पुसट झाल्या आहेत यावर त्यांचे विश्लेषण केले आहे. तिला असे वाटले की भारतीय प्रेक्षकांना आजच्या जगात पाहण्याची गरज आहे, पडद्यामागे काय घडले आहे याचे अस्पष्ट सत्य सामान्य माणसाच्या डोळ्यांसमोर आहे. पल्लवी म्हणते, राजनीती आणि सुरक्षितता यांच्यातील धोकादायक छेदनबिंदू देशाचे कल्याण कसे धोक्यात आणू शकतात यावर हा चित्रपट छेद देणारे टीका करतो. हा चित्रपट शेल्फ 'चे अव रुप ठेवण्यासाठी पल्लवीला खूप प्रयत्न करावे लागले. शिवाय, या चित्रपटामुळे सध्या सुरू असलेल्या खटल्याच्या निष्पक्षतेवर परिणाम होईल, असा दावा करणाऱ्या एका याचिकेमुळे तिला हस्तक्षेप करावा लागला. अनेक वृत्तपत्रांनी त्यांच्या लेखांमध्ये हा प्रश्न कव्हर केला, चित्रपटाला रिलीजची परवानगी मिळेल की नाही याबद्दल अनिश्चित दृष्टीकोन आहे. प्रकरणाबाबत काही दिवसांच्या संदिग्धतेनंतर, टाईम्स वृत्तपत्रात एनआयए फाइल्सचे उत्तर, निर्माता ऐकू इच्छितो अशा मथळ्या दिसल्या. एनआयए प्रकरणात पल्लवीच्या हस्तक्षेपानंतर, तिच्या प्रयत्नांचा अंतिम सुनावणीवर महत्त्वपूर्ण सकारात्मक परिणाम झाला, ज्यामुळे अखेरीस मुंबई उच्च न्यायालयाकडून चित्रपट प्रदर्शित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पल्लवी गुर्जर. चित्रपटाचे दिग्दर्शक, केदार गायकवाड, तसेच विनीत कुमार सिंग, मनोज जोशी, राज अर्जुन आणि अनेक प्रतिभावान कलाकारांचा समावेश असलेल्या कलाकारांनी चित्रपटाच्या यशाची खात्री करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले आहेत. हे यश स्पष्ट होते कारण चित्रपटाचा ट्रेलर यूट्यूबवर प्रदर्शित झाला तेव्हा प्रेक्षकांकडून खूप प्रेमळ प्रतिसाद मिळाला आणि रिलीजच्या तारखेपासून त्याला ८.७ दशलक्ष पेक्षा जास्त दृश्ये मिळाली आहेत.

## शब्दकोडे क्रमांक २००३



**आडवे शब्द :-**
१) साहित्यातील नऊ भावना
४) चांगल्या कामाप्रित्यर्थ दिलेली अल्प रक्कम
७) संतापी
१०) तरच्या बरोबरचा शब्द
११) स्तुतीस्तोत्र
१२) पाठवणी
१५) मांडणी
१६) गावाखालची जमीन
१८) जल
१९) स्वच्छ
२०) कापसाची बी
२३) देवकीचा भाऊ म्हणजे श्रीकृष्णाचा ****
२५) वल्लरी
२८) उंबरठा
३०) एक फळ
३२) लुबाडणारा, फसविणारा
३४) रतिचा पती
३७) उदा चे संपूर्ण रूप
३८) खटला
३९) जमिनीखाली येणारे फळ
४०) माझा
४२) साडीचा शेवटचा भाग
४४) गिरणीत काम करणारा
४६) शर्करा
४८) लोकसंख्येची मोजणी
५०) पराभव
५२) आपल्या राष्ट्रात तयार झालेले
५४) हिंदीत केस
५५) शाब्दिक भांडण, चर्चा
५८) राक्षस
५९) हाणामारी
६०) जोराचा शिडकावा, हबका
६१) मंदिर
६३) कट्टा
६४) पत्र
६६) फुरसत
६७) भेग, चीर
७०) नाकावरील एक छोटा दागिना
७२) देह धारण करणारा
७३) नवाकोरा
७६) नवरदेव
७७) सरसकट
७८) चिवट व कडक

**उभे शब्द :-**
१) दृष्टी
२) अधिक योग्यतेचा, श्रेष्ठ प्रतीचा
३) स्वस्त(ग्रा.)
४) गळ्यामागचा प्रतिष्ठेचा अवयव
५) भूकंप
६) नूतन
७) नाचणी
८) फळाचे साल
९) पोरका
१२) बारा महिन्याचा काळ
१४) मवाळ धोरण
१७) पोते
२१) पोपट
२२) लहानच्या विरुद्ध
२४) पचपचीत, बेचव
२६) न नरमण्याचा स्वभाव
२७) विधानसभा आणि लोकसभा येथील लोकप्रतिनिधी
२९) गुरुचे काम, चातुर्य
३१) उंटाच्या पाठीवरील उंचवटा
३३) मजबूत, भक्कम
३५) औषध
३६) रम्य
३७) पोट
४१) कणीसाला येणारे एक धान्य
४२) वेतन
४३) श्रीकृष्णाच्या वडिलांचे व आईचे नाव
४५) राजवाडा, मोठे घर
४७) लाकडी पादत्राण
४९) रोग पसरविणारा किटक
५१) ओवाळून टाकलेली वस्तू
५३) श्रीविष्णूचे एक नाव
५४) लहानसहान
५५) उपयोग
५६) प्रचंड, भव्य
५७) अडत्या
५९) सामान
६०) समतल
६२) उसाचे पीक, रिकामपण
६५) रसाच्या आंब्याची एक जात
६६) युद्ध
६८) रजक
६९) हिंदुस्थान
७०) स्वाद, रुची
७१) श्वसनेंद्रिय
७२) साडेसातीचा ग्रह
७३) केव्हा
७४) बाजू, कांठ
७५) वृक्ष

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# भटक्या कुत्र्यांनी जन्म झालेल्या वासराच्या पिलांच्या शरीराचे तोडले लचके

● तीनही वासरांचा तडपडून मृत्यू ● हिंस्त्र भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर ● तालुक्यातील सिंगोरी गावातील प्रकार

■ महासागर प्रतिनिधी
**मौदा,दि. २८ डिसेंबर :**



मोकाट भटक्या कुत्र्यांचा वावरच नव्हे याचा प्रचंड हैदोस तालुक्यातील सींगोरी येथे सुरू असून गावातील रस्त्यावरील सडके अन्न, मृत पशु-पक्षांचे भक्ष्य विशेषतः टाकावू मांसाहाराच्या आहारामुळे हिंस्त्र बनलेल्या मोकाट कुत्र्यांनी मुक्या जनावरांचे व नागरिकांचे जीवन असह्य केले आहे. रस्त्यावरून जाणे-येणे विशेषतः लहान बालके व विद्यार्थ्यांना तर मुस्किलच झाले आहे. सिंगोरीत भटक्या कुत्र्यांनी जन्म झालेल्या तीन वारसांच्या पिलांच्या शरीराचे लचके तोडल्यानंतर त्यांचा तडपडून मृत्यू झाल्याची घटना घडल्याने गावात भटक्या कुत्र्यांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गावोगावी रोजच कुत्रे चावण्याच्या घटना नेहमीच घडत असतात. त्या चर्चेत किंवा कागदावर येत नसले तरी त्याचा आकडा चिंताजनक आहे. सिंगोरी येथे गंभीर घटना घडल्यानंतर तरी संबंधित यंत्रणा भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करतील काय? किंवा दूरगामी उपाययोजनांना तथाकथित पशु-पक्षीप्रेमींचे प्रेम अडवे येईल? हा खरा प्रश्न आहे.

मागील वर्षी मौदा शहरात भटक्या कुत्र्यांचा हैदोस होता. अनेकांना चावासुद्धा घेतला. त्याच एका चिमुकल्या बालकाचा जीव सुद्धा गेला. आता ग्रामीण भागात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून पाळीव जनावरांना लक्ष्य बनविले आहे. दहा दिवसांत तीन वासरांचा बळी या कुत्र्यांनी घेतल्याने पशुपालक भयभीत झाले आहेत. तालुक्यातील सिंगोरी येथील सचिन ढोबळे, सूरज ढोबळे, मुकरू मसराम यांच्या जन्म झालेल्या कोवळ्या वासराचा भटक्या कुत्र्यांनी लचके तोडत यात तिन्ही वासरांचा बळी घेतला. कुत्र्याने केलेला हल्ला एवढा भीषण होता की त्यांच्या पायाच्या हाडाचे व काहींच्या पोटांचे लचके तोडत यावेळी त्यांच्या पायातून पोटातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

> आम्ही लवकरच कुत्रे पकडणारी टीम मौदा नगरपंचायत ला मागितली आहे.लवकरच भटक्या कुत्राच ना पकडून नसबंदी करण्यात येईल.
>
> **विनोद गावंडे**
> **सरपंच मारोडी**

तालुक्यात सिंगोरी येथे गल्लोगल्ली मोकाट कुत्र्यांच्या संख्येत प्रचंड बाढ झाली असून, हे कुत्रे पाळीव प्राणी व नागरिकांवर हल्ले करत आहेत. यामुळे नागरिकांना जीव मुठीत घेऊन रस्त्याने. ये जा करावी लागते. कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी रोज नागरिक कुत्रे आपल्या किंव्हा मुक्या जनावरावर हल्ले करणार नाही म्हणून हातात काठी घेऊन फिरत आहेत. स्थानिक प्रशासनाने या मोकाट कुत्र्यांचा त्वरित बंदोवस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# नेहरू मैदान, राखी तलाव सौंदर्गीकरणाचे काम वेळेत पूर्ण करा

## राज्यमंत्री जयस्वाल यांनी केली पाहणी

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक,दि. २८ डिसेंबर :**



रामटेक येथील नेहरू मैदान, राखी तलाव परिसरातील सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केली. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून कामाबाबतची तांत्रिक अडचणीची माहिती समजून घेत दर्जेदार काम व वेळेत पूर्ण करण्याकरिता अधिकाऱ्यांना सूचना देण्यात सुचना देण्यात आल्या.

रामटेक येथे नेहरू मैदानात सुसज्ज असे इनडोअर स्टेडियमचे काम पूर्ण झाले आहे. तेथे रामटेकच्या खेळाडूंना विविध खेळांचे प्रशिक्षण घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. नेहरू मैदान येथील काम पूर्ण झाल्यावर येथेही अनेक खेळांचे प्रशिक्षण उपलब्ध होईल. त्यामुळे खेळाडूंना विविध प्रकारच्या खेळात आपली कला सादर करण्याची संधी मिळणार आहे. तालुका क्रीडा अधिकारी मात्र पूर्णवेळ येथे आपली सेवा देतील, अशी अपेक्षा खेळाडूंनी व्यक्त केली आहे.

# ग्राहकांच्या समस्यांना प्राधान्य देणार: सुजाता गावंडे



■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा,दि. २८ डिसेंबर :**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या पदाधिकारी यांनी आणलेल्या समस्याग्रस्त ग्राहकांच्या समस्यांना प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करणार.असे आश्वासन नायब तहसीलदार श्रीमती सुजाता गावंडे यांनी दिले. अ. भा. ग्राहक-पंचायतव हिंगणा तहसील कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहकदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन त्या बोलत होत्या. याप्रसंगी डा.सरिता कडु,ग्राहक पंचायतचे विदर्भप्रांत सदस्य विनायक इंगळे गुरुजी,जिल्हा उपाध्यक्ष बब्बुभाई शेख, डा. अतुल लामसोंगे ,प्रा.दिपक रामटेके ,अड.अर्चना सोनारे व पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती रागीनी गायकवाड उपस्थित होते.सर्वप्रथम ग्राहक हा कसाकसा आणि कुठेकुठे फसवल्या जात आहे.पेट्रोल भरताना कशी फसवणूक करतात. सिलींडर घेताना वजन करुन घेणे गरजेचे आहे.तसेच कोणतीही वस्तू खरेदीनंतर पक्की पावती घेणे काळाची गरज आहे.अशी माहीती इतर पाहुण्यांनी दिली. प्रास्तविक डा. अतुल लामसोंगे यांनी तर संचालन रागीनी गायकवाड व आभार पांडुरंग काळे यांनी मानले.यावेळी निलिमा गोबाडे, आशाताई बुरनुरे, नामदेव आमनेरकर , वसंता राडे, बाबुलाल तामगाडगे, प्रज्ञाताई रामटेके , जयवंता कैकाडे, अनिल चावरे, प्राची लांजेवार, अरुण गव्हाळे, शंकर मुन, विनय सोनडवले , अस्पाक पठाण, विजय मसराम , किरण घवघवे, विशाल मसराम , विशाल बांदरे , विलास जेमती, भगवान बालपांडे, नरहरी रामटेककर व माजी सरपंच संतोष कटरे उपस्थित होते.

# विधान भवन चे मुंबई सचिव यांची नॅशनल फूड प्रोडॉक्ट्ला भेट




■ महासागर प्रतिनिधी
**भिवापूर,दि. २८ डिसेंबर :**

भिवापूर एमआयडीसी परिसरात विधानभवन सचिव असलेली बेकरी प्रॉडक्ट ला डॉ. विलास आठवले यांनी सदिच्छा भेट देवून येथे विविध बेकरी प्रॉडक्टची माहिती घेतली. अतिशय लहान जागेत चांगली दर्जेदार बेकरी प्रॉडक्ट तयार करण्यात येत असल्याने बेकरी मालक हाजी नासीर यांचे कौतुक केले. यावेळी उद्योग भवन नागपूर केंद्र प्रमुख व विभागीय अधिकारी एच. आर. वाघमारे

एच .आर .वाघमारे, मिरची व्यापारी रफीक शेख उपस्थित होते. भिवापूर शहरात रोजगाराची समस्या असून बेकरी उद्योगाच्या माध्यमातून काही जणांना रोजगार उपलब्ध करून त्याचे यावेळी कौतुक करण्यात आले.

# सेवा समाप्त केलेल्या शिक्षिकेला न्याय दया

## शिक्षणाधिकारी यांना विमाशी संघाचे निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी,दि. २८ डिसेंबर :**



दिघोरी येथील सर्वश्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील शिक्षिका किरण पुरूषोत्तम भुजाडे यांची मुख्याध्यापकांनी २३ फेब्रुवारी २०२२ रोजी सेवा समाप्त केली. त्या शिक्षिकेला न्यायालयात न्याय मिळूनसुध्दा संचालक व मुख्याध्यापक शाळेत रुजू करून घेत नाही. त्या शिक्षिकेला न्याय दया अशा मागणीचे निवेदन शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) रोहीणी कुंभार यांना विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे नागपूर शहर कार्यवाह अविनाश बडे यांच्या नेतृत्वात शहर कार्याध्यक्ष अरुण कराळे, उपाध्यक्ष यशवंत कातरे, उपाध्यक्ष विजय पेटकर, महिला आघाडी प्रमुख प्रा. सरीता मिर्झापूरे, प्रा.जयश्री नागपूरे, दाक्षिण विभाग प्रमुख रजंना पेटकर, प्रेरणा हटवार यांच्या उपस्थितीत दिले. शिक्षिकेने या विरोधात शाळा न्यायाधिकरण, नागपूर येथे अपील दाखल केले होते. त्यानुसार २१ मार्च २०२४ रोजी शाळा न्यायाधिकरणमध्ये शिक्षिकेच्या बाजुने निर्णय दिला व शाळेत रुजू करण्याचे आदेश दिले. शिक्षिकेला मुख्याध्यापकांनी रुजू करून न घेतल्यामुळे शिक्षण उपसंचालक नागपूर व शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांच्याकडे तक्रार दाखल केली. त्या तक्रारीच्या आधारावर शिक्षण उपसंचालक नागपूर व शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) यांनी १४ ऑगस्ट २०२४ रोजी सुनावणी घेतली. सुनावणीद्वारे मुख्याध्यापक यांनी शिक्षिकेला शाळेत रूजू करून घ्यावे असे आदेश दिले. रूजु करून न घेतल्यास मुख्याध्यापक राजेश मासुरकर यांचे माहे सप्टेंबर, २०२४ पासून पुढील आदेशापर्यंत वेतन बँक स्तरावर स्थगित करण्यात येईल असे सुध्दा आदेशात स्पष्ट केले होते तरी सुद्धा आजपर्यंत शिक्षिकेला रुजू करून घेतले नाही. त्यामुळे संस्थाचालक व मुख्याध्यापक राजेश मासुरकर यांच्या विरोधात शिक्षिकेने आंदोलनाचा पवित्रा हाती घेतला आहे. असेही निवेदनातुन स्पष्ट केले.

# शिवसेना (शिंदे) पक्षात शैकडो युवकांचा प्रवेश




■ महासागर प्रतिनिधी
**कन्हान,दि. २८ डिसेंबर :**

कन्हान शहरात व लागतच्या क्षेत्रात शिंदेसेना बळकट करण्याचे कार्य शिवसेनेचे नेते वर्धराज पिल्ले यांनी केले आहे . स्थानिक आमदार व राज्यमंत्री ड आशीष जयस्वाल यांनी जनतेच्या समस्या जाणून घेण्याची व निराकरण करण्याची उत्कृष्ठ शैलीवर विश्वास ठेवून वर्धराज पिल्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवार (दि.२७ डिसेंबरला कन्हान येथील शिंदे शिवसेना जनसंपर्क कार्यालयात शिवसेना पक्षावर विश्वास ठेऊन कन्हान येथील स्थानिय युवकांनी कुठल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता पक्षात प्रवेश घेतला आहे .

यावेळी कन्हान पिपरी न.प उपाध्यक्ष डॅनियल शेंडे, शिंदे शिवसेना शहर प्रमुख गजानन गोरले, प्रदीप गायकवाड, प्रशांत स्वामी, इनेश पुरवले प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रवेश घेणाऱ्या मध्ये अतुल यादव, सागर हुमने, प्रदीप मोहोड, ऋषभ बागडे, चेतन हुमने, अभिषेक डहारे, रुजल मेश्राम, जितेंद्र मोहनकर, रमेश बावणे, बंकु बागडे, कुणाल श्रीवास्तव, श्लोक सोमकुवर, मारोती गोंडाणे, राजेश सरोदे, अमोल भुसारी, निकेश पात्रे, सुखराम इंचुरकर, करण सोमकुवर, अंकित बागडे, अभय बैठवार, अनिकेत डोंगरे, निकेश वासनिक, रोहित गजभिये, विशाल इंगळे, करण ढोबळे, अमित बोरकर, अविनाश सर्पमित्र, संदीप गुप्ता, गौरव दुबे, आर्यन मेश्राम, सूरज यादव, नितीन इळपात्रे, शुभम सहारे, अमोल भुसारी, राजहंस बागडे, प्राणहंस बागडे, निलेश यादव, रविंद्र कैकाडे, मुकेश उके, मधुकर उके, सागर हूमने यांचा समावेश होता.

## इमारतीवरून पडल्याने मजुराचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर,दि. २८ डिसेंबर :**

निर्माणाधिन इमारतीच्या पहिल्या माळ्यावरून पडल्याने एका मजुराचा मृत्यू झाला. ही घटना अंबाझरी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. विश्वास पुरूषोत्तम नारकवाडे (४०) रा. हिवरीनगर असे मृताचे नाव आहे. विश्वास हे मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. शुक्रवारी दुपारी ते अमरावती मार्गावरील एलआयटी कॉलेज परिसरातील एका इमारतीच्या बांधकामावर मजूर म्हणून काम करीत होते. सळाखी पहिल्या माळ्यावर ओढत असताना अचानक त्यांचा तोल गेला आणि ते थेट खाली पडले. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

# माहुली येथे नागदिवाळी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा

■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक,दि. २८ डिसेंबर :**



नागपूर जिल्ह्यातील पारशिवनी तालुक्यातील माहुली येथे आदिवासी माना जमात विद्यार्थी युवा संघटनेच्या वतीने अखिलेश हायस्कूलच्या प्रांगणात दोन दिवसीय नागदिवाळी महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महोत्सवाची सुरुवात सकाळी गावात मिरवणूक काढून खन व मूठ पूजनाने करण्यात आली.

या विशेष कार्यक्रमात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे कलामंचाच्या कलाकारांनी विविध गाण्यांवर नृत्य सार करत उपस्थितांचे मनोरंजन केले. विदर्भातील विविध गावांमध्ये नागदिवाळी महोत्सवानिमित्त समाज प्रबोधनाचे कार्यक्रम सादर करण्याची परंपरा या कलामंचाने जोपासली आहे, अशी माहिती संचालक विलास चौधरी यांनी दिली.

आदिवासी माना समाजाच्या चालीरीती, संस्कृती जतन करण्याबरोबरच समाजाला संघटित करणे, इतिहासाची जाण वाढवणे आणि सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकणे, हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश आहे. तसेच, फुले, शाहू, आंबेडकर, बिरसा मुंडा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार करून बहुजन हिताय, बहुजन सुखाय या तत्त्वानुसार समाज प्रबोधन घडवण्याचा प्रयत्न केला जातो.

सध्याच्या परिस्थितीत आदिवासींचे घटनात्मक हक्क, अधिकार, आणि समाजातील महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा करत लोकगीते, लोकनृत्य व पथनाट्याच्या माध्यमातून संदेश दिला जात आहे. या कार्यक्रमात विलास चौधरी यांच्या नेतृत्वाखाली कमलाकर कापटे, शालिनी सहारे, आकाश नन्नावरे, प्रतीक्षा चौधरी, पायल श्रीरामे, सलोनी चौधरी आणि सौरभ दडमल यांनी उत्कृष्ट सादरीकरण केले.

# कळमेश्वर येथे विदर्भ स्तरीय मॅरेथॉन स्पर्धा २९ डिसेंबरला

■ महासागर प्रतिनिधी
**कळमेश्वर,दि. २८ डिसेंबर :**

सातपुडा क्रीडा व सांस्कृतिक मंडळ कळमेश्वर च्या वतीने संकल्प वेध २०२५ अंतर्गत रविवार दि २९ डिसेंबरला विदर्भ स्तरीय मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे ही स्पर्धा सकाळी ७ वाजता क्रीडा संकुल कळमेश्वर ब्राह्मणी सावनेर बायपास रोड येथून सुरुवात होईल. ही स्पर्धा. १८ वर्षावरील जिल्हास्तरीय खुला गट पुरुष १० किमी १८ वर्षावरील जिल्हास्तरीय खुला गट महिला १० किमी १८ वर्षाखालील जिल्हास्तरीय. गट मुले मुली ५ किमी अठरा वर्षाखालील जिल्हास्तरीय गट मुली ५ किमी १४ वर्षाखाली जिल्हास्तरीय गट मुले ३ किमी १४ वर्षाखालील जिल्हास्तरीय गट मुली ३ किमी. वरील गटासाठी स्पर्धा असून स्पर्धेमधील विजेत्यांना १ लाख २५ हजार चे बक्षिसे वाटप करण्यात येईल स्पर्धा पूर्ण करणाऱ्या स्पर्धकांना विदर्भ स्तरीय सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल तसेच शनिवार दिनांक ४ जानेवारी २०२५ ला सायं ६ वाजता संकल्प वेध २०२५ या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या सत्कार मार्गदर्शन सांस्कृतिक कार्यक्रम नादब्रह्म सप्तसुरांची मैफिल सुप्रसिद्ध कलाकारांचा संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन शुभारंभ सेलिब्रेशन लोन कळमेश्वर येथे करण्यात आले आहे वरील मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या स्पर्धकांनी मंडळाचे कार्यालय नगरपरिषद कॉम्प्लेक्स तळ्याची पाल शिवाजी पुतळ्याजवळ कळमेश्वर येथे संपर्क साधावा असे आवाहन सातपुडा क्रीडा सांस्कृतिक मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे.


**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्य. श्रीमती अपेक्षा रैच, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (श.) यांचे कोर्ट, तहसिलदार, नागपूर शहर यांचे कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर पिनकोड-४४०००१
E-mail ID-www.tahsildarngpcity@gmail.com
Ph No. 0712-2561975
क्र.प्रस्तु-२/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र ११९/कावि-८१३/२०२४
दिनांक ०१/१०/२०२४

वाचाः-१) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ दि.१५.१०.२०२४ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२४ दि. ११.०५.२०२४ ६) प्रकाश कस्तुरचंद सोनी, वय ५९ वर्षे राह. १०५ प्रभा कुंज ओस्वाल भवन जवळ, भाजी मंडी इतवारी नागपूर, मो. न. ९७६६३५४३९८ यांचा अर्ज दिनांक १७.९.२०२४

ज्याअर्थी अर्जदार प्रकाश कस्तुरचंद सोनी, वय ५९ वर्षे राह. १०५ प्रभा कुंज ओस्वाल भवन जवळ, भाजी मंडी इतवारी नागपूर. यांनी मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी आई सोनी निर्मलाबेन कस्तुराभाई पदनी, यांचा मृत्यू दिनांक ०६/०३/२००८ रोजी घरी इतवारी भाजी मंडी, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कार्म कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्थःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांक पासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यूबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

स्वा/-
(श्रीमती अपेक्षा रैच)
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर)



**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्य. श्रीमती अपेक्षा रैच, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (श.) यांचे कोर्ट, तहसिलदार, नागपूर शहर यांचे कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर पिनकोड-४४०००१
E-mail ID-www.tahsildarngpcity@gmail.com
Ph No. 0712-2561975
क्र.प्रस्तु-२/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र १२२/कावि-८१९/२०२४
दिनांक ०१/१०/२०२४

वाचाः-१) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ दि.१५.१०.२०२४ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२४ दि. ११.०५.२०२४ ६) अर्जदार प्रतिक अशोक शंभरकर, वय ३० वर्षे, राह. लकडगंज पोलीस स्टेशनजवळ बुध्द पूरा नागपूर मो. नं. ८६६८६५६८७९ यांचा अर्ज दिनांक १७-०९-२०२४

ज्याअर्थी अर्जदार प्रतिक अशोक शंभरकर, वय ३० वर्षे, राह. लकडगंज पोलीस स्टेशनजवळ बुध्द पूरा नागपूर यांनी मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी भाऊ अमोल उर्फ अल्पेश अशोक शंभरकर, यांचा मृत्यू दिनांक २४/०७/२०२१ रोजी इंदिरा गांधी मेडीकल कॉलेज, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कार्म कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्थःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांक पासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यूबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

स्वा/-
(श्रीमती अपेक्षा रैच)
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर)



**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्य. श्रीमती अपेक्षा रैच, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (श.) यांचे कोर्ट, तहसिलदार, नागपूर शहर यांचे कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर पिनकोड-४४०००१
E-mail ID-www.tahsildarngpcity@gmail.com
Ph No. 0712-2561975
क्र.प्रस्तु-३/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र १२३/कावि-८२१/२०२४
दिनांक ०१/१०/२०२४

वाचाः-१) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ दि.१५.१०.२०२४ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२४ दि. ११.०५.२०२४ ६) अर्जदार जावेद अख्तर मोहम्मद सागिर, वय ३१ वर्षे, राह. पोलीस स्टेशन मागे सलिम लिडर रोड मोमिनपूरा नागपूर यांचे अर्ज दिनांक १७/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार जावेद अख्तर मोहम्मद सागिर, वय ३९ वर्षे, राह. पोलीस स्टेशन मागे सलिम लिडर रोड मोमिनपूरा नागपूर, यांनी जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी स्वतःचा जन्म दिनांक २०/०५/१९९० रोजी घरी पोलीस स्टेशन मागे सलिम लिडर रोड मोमिनपूरा, नागपूर येथे झाला असा अर्जदार निवेदक यांचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कार्म कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्थःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांक पासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

स्वा/-
(श्रीमती अपेक्षा रैच)
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर)



**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्य. श्रीमती अपेक्षा रैच, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (श.) यांचे कोर्ट, तहसिलदार, नागपूर शहर यांचे कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर पिनकोड-४४०००१
E-mail ID-www.tahsildarngpcity@gmail.com
Ph No. 0712-2561975
क्र.प्रस्तु-३/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र १२१/कावि-८१७/२०२४
दिनांक ०१/१०/२०२४

वाचाः-१) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ दि.१५.१०.२०२४ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२४ दि. ११.०५.२०२४ ६) अर्जदार अनिकेत रमेश पाटील, वय ३१ वर्षे राह. घर क्र. ७४०, न्यु खदान लष्करीबाग अवळे बाबु चौक नागपूर. मो. नं. ८१४९९१६१८६ यांचे अर्ज दिनांक १७/०९/२०२४

ज्याअर्थी अर्जदार अनिकेत रमेश पाटील, वय ३१ वर्षे राह. घर क्र. ७४०, न्यु खदान लष्करीबाग अवळे बाबु चौक नागपूर. यांनी जन्माची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार वडील रमेश मोतीराम पाटील, यांचा जन्म दिनांक ०५/०१/१९५३ रोजी घरी न्यु खदान लष्करीबाग आवळे बाबु चौक नागपूर येथे झाला असा अर्जदार निवेदक यांचा दावा आहे. त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे जन्म प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा जन्म बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कार्म कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्थःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांक पासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास जन्मबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित जन्म नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

स्वा/-
(श्रीमती अपेक्षा रैच)
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर)



**-: जाहिरनामा :-**

कोर्ट विद्य. श्रीमती अपेक्षा रैच, नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी नागपूर (श.) यांचे कोर्ट, तहसिलदार, नागपूर शहर यांचे कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर पिनकोड-४४०००१
E-mail ID-www.tahsildarngpcity@gmail.com
Ph No. 0712-2561975
क्र.प्रस्तु-२/नाय.तह./तह.नाग. (श.)/प्र.क्र १२०/कावि-८१५/२०२४
दिनांक ०१/१०/२०२४

वाचाः-१) जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ चे कलम १३ २) जन्म मृत्यू नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ चा २० ३) भारत सरकार विधी व न्याय विभाग यांचेकडील दिनांक ११/०८/२०२३ रोजीचे राजपत्र ४) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-५३५/२०२३ दि.१५.१०.२०२४ ५) मा. जिल्हादंडाधिकारी, नागपूर यांचे आदेश क्र. अका/डी-१/जन्म-मृत्यू आदेश/कावि-१५८/२०२४ दि. ११.०५.२०२४ ६) संगिता नरेन्द्र सिरमवार, वय ५२ वर्षे, राह. सहकार नगर गजानन मंदीर जवळ वर्धा रोड नागपूर मो.नं. ९३७३११०९४७ यांचा अर्ज दिनांक १७-०९-२०२४

ज्याअर्थी अर्जदार संगिता नरेन्द्र सिरमवार, वय ५२ वर्षे, राह. सहकार नगर गजानन मंदीर जवळ वर्धा रोड नागपूर. यांनी मृत्यूची नोंद महानगर पालिका दप्तरी घेणेकरिता निर्देशित करणे कामी अर्ज दाखल केला आहे.

सदरहू अर्जदार यांनी सासू सुमनबाई राजेश्वर सिरमवार, यांचा मृत्यू दिनांक ११/०६/२०११ रोजी गव्हेंमेंट मेडीकल हॉस्पीटल, नागपूर येथे झाला असा अर्जदाराचा दावा आहे त्याचप्रमाणे सदरहू अर्जदार यांना त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र शासकीय तथा खाजगी कामाकरिता आवश्यक असल्याने त्याची नोंद घेणे कामी आदेश होणे आवश्यक असल्याबाबत त्यांनी अर्जात नमूद केले आहे.

त्याअर्थी मी कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) उपरोक्त वाचा क्र. १ आणि २ नुसार व ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मला प्राप्त अधिकारान्वये असे कळविण्यात येते की, सदर व्यक्तीचा मृत्यू बाबत नोंद घेणे कामीचा आदेश देणे करिता व गृह चौकशी करणे कार्म कार्यवाही प्रस्तावित आहे. याबाबत कोणास काही सांगावयाचे किंवा काही आक्षेप असल्यास त्यांनी योग्य ते पुरावे किंवा साक्षीदारांसह कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर) यांचे न्यायालयात स्थःत जातीने / वकीलामार्फत अथवा अन्य मार्गाने या जाहीरनामाच्या दिनांक पासून पंधरा दिवसाच्या आत सादर करावे.

उक्त मुदतीत कुठलाही आक्षेप / उजर / विपरित पुरावा प्राप्त न झाल्यास मृत्यूबाबतची नोंद घेणे कामीचा आदेश देणेबाबत कोणालाही काही सांगावयाचे नाही गृहीत धरुन प्रस्तावित मृत्यू नोंदीबाबतचा आदेश निर्गमित करण्यात येईल.

स्वा/-
(श्रीमती अपेक्षा रैच)
कार्यकारी दंडाधिकारी, नागपूर (शहर)



**Change Of Name**

MY OLD NAME WAS **MAHESH-KUMAR RAMANLAL CHANDAK.** NOW MY NEW NAME IS **MAHESH RAMANLAL CHANDAK.**
**ADD :** DR.HADGEWAR ROAD, NEAR RILAINCE TAWAR, NANDURA, BULDHANA - 443404

MY OLD NAME WAS **SAJJAD MUSANI.** NOW MY NEW NAME IS **SAJJAD ABDUL RAUF MOOSANI.**
**ADD :** H NO 138 MUSANI MANZIL NAL SAHAB CHOWK GANJAKHET NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **PREM KANAHAIYAL CHAWLA / PREM CHAWLA.** NOW MY NEW NAME IS **PREM PRAKASH CHAWLA.**
**ADD :** B N 13 HB TOWN OLD PARDI NAKA SQUARE PARDI NAGPUR 440035

MY OLD NAME WAS **POOJA GANGWANI.** NOW MY NEW NAME IS **JEEVIKA PREM PRAKASH CHAWLA.**
**ADD :** H B 13 HB TOWN OLD PARDI NAKA SQUARE PARDI NAGPUR 440035

MY OLD NAME WAS **JEEVIKA PREM CHAWLA / JEEVIKA CHAWLA.** NOW MY NEW NAME IS **JEEVIKA PREM PRAKASH CHAWLA .**
**ADD :** H B 13 HB TOWN OLD PARDI NAKA SQUARE PARDI NAGPUR 440035

MY OLD NAME WAS **SEEMA ROBERTSON MARTIN.** NOW MY NEW NAME IS **SEEMA SUNIL PARKER.**
**ADD :** H NO 296 - A VEDAKRUTI PANCHAM ESTATE DIXIT NAGAR NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **SONALI SANDIP BUTALE.** NOW MY NEW NAME IS **VAISHALI SANDIP BUTALE.**
**ADD :** PLOT NO 14,15 MANISH NAGAR NAGPUR 440015

MY OLD NAME WAS **FARHAD BEGUM.** NOW MY NEW NAME IS **FARHAT BEGUM JAMILUDDIN.**
**ADD :** BEHIND RAZZAK SETH BANGALA, BADA TAJBAG UMRED ROAD, AYODHYA NAGAR, NAGPUR, 440024.

MY OLD NAME WAS **AHTESHAM ALI ABID ALI.** NOW MY NEW NAME IS **SYED AHTESHAM SYED ABID ALI.**
**ADD :** PRESTIGE TULIP APPT, JAFAR NAGAR, TEACHER COLONY, NAGPUR, 440013.

MY OLD NAME WAS **RUBINA PARVIN.** NOW MY NEW NAME IS **RUBINA BEE MOHAMMAD HARIS.**
**ADD :** DR,AMBEDKAR WARD UMARKHED DISTRICT. YAVATMAL 445206.

MY OLD NAME WAS **SHAIKH MAHOMMADGAUS SHAIKH KHAJA.** NOW MY NEW NAME IS **SHAIKH MOHAMMAD GAUS SHAIKH KHAJA.**
**ADD :** ATPOST. DHANKI UMARKHED DIST. YAVATMAL, 445207.


RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३




# वर्षअखेर विशेष २०२४




**२०२४ हे वर्ष आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीने मोठ्या बदलांचे वर्ष राहिले. निवडणुका, शिखर परिषदा आणि भू-राजकीय घडामोडी आदींनी जागतिक राजकारणाला नवी दिशा दिली. यातूनच जगभरातील देशांमध्ये सहकार्य, स्थैर्य आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी अधिक ठोस संवादाची आवश्यकता प्रकर्षाने जाणवली. आता नूतन वर्षामध्ये यावर उचित कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत सरत्या वर्षाला निरोप देऊ या.**

## नानाविध घटनांनी चर्चेत राहिलेले वर्ष

वर्षअखेर विशेष २०२४

**जयसिंग यादव**

जागतिक राजकारणात उथलापालथ घडवून आणणारे वर्ष अशीच मावळत्या २०२४ ची ओळख सांगितली जाईल. हे वर्ष नानाविध घडामोडींनी भरले होते. युक्रेन, पॅलेस्टाईन, सुदान कवा येमेनमध्ये शत्रुत्व असताना, आपण सरत्या वर्षात दुसरे महायुद्ध संपल्यानंतर प्रथमच सर्वात मोठा जागतिक संघर्ष अनुभवला. त्यामुळेच विविध सशस्त्र संघर्षांबरोबरच कॅलेंडरवर चिन्हांकित झालेल्या ७० पेक्षा अधिक निवडणुकांचे एकमेकांवर परिणाम कसे झाले हे दाखवणारे हे वर्ष होते, असे म्हणता येईल. सर्वप्रथम भूराजकीय तणाव आणि संघर्षाचा विचार करायचा तर रशियाने २०२२ मध्ये सुरू केलेल्या यूक्रेनवरील आक्रमणाची नोंद घ्यावी लागेल जे २०२४ मध्येही सुरू राहिले. अर्थातच या युद्धामुळे युरोपमध्ये संपूर्ण वर्षभर तणाव वाढला आणि जागतिक अर्थव्यवस्थेवरही त्याचा परिणाम झाला. सरत्या वर्षामध्ये चीनने तैवान जलसंधीमध्ये आक्रमकता वाढवल्यामुळे अमेरिका आणि त्याच्या सहयोगी देशांमधील








तणाव वाढला. सैन्यदलाचे सराव आणि राजनैतिक तणाव यामुळे या प्रदेशात मोठ्या संघर्षाची शक्यता वाढल्याचे पहायला मिळाले. हे संपूर्ण वर्ष मध्य पूर्वेत अस्थिरता देऊन गेले. येमेन, सीरिया आणि इतर देशांमध्ये सुरू असणाऱ्या संघर्षांमुळे मध्य पूर्व प्रदेश अस्थिर राहिला. प्रादेशिक स्पर्धा आणि संप्रदायवादी तणावामुळे स्थैर्य आणि सुरक्षेला निर्माण झालेला धोका आपण पाहिला.

या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर २०२४ मध्ये अनेक देशांना पुरवठा साखळीतील अडथळे, वाढता ऊर्जा खर्च आणि भूराजकीय तणावाने उद्भवलेल्या उच्च दरवाढीचा सामना करावा लागला. मध्यवर्ती बँकांनी दरवाढ करून चलनवाढ नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला, परंतु यामुळे आर्थिक वाढ मंदावण्याचे धोके होते. त्यामुळेच तज्ज्ञांनी जागतिक मंदीची भीती व्यक्त केली. उच्च व्याजदर, भूराजकीय अनिश्चितता आणि कोविड-१९ महामारीच्या दीर्घकालीन परिणाम या सर्वांच्या एकत्रित परिणामामुळे पुढील काळही ही भीती राहणार आहे. विस्ताराने बघायचे तर २०२४ हे वर्ष आर्थिक आणि तंत्रज्ञान घटकांच्या संयोगामुळे जटिल आणि आव्हानात्मक काळ समोर आणणारे होते, असे म्हणता येईल. त्यामुळेच जग अशा नानाविध आव्हानांना सामोरे जात असताना आंतरराष्ट्रीय सहकार्य, राजनय आणि मजबूत उपाययोजनांची गरज अधिक स्पष्ट झाली.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे यंदा ७० पेक्षा अधिक देशांमध्ये जवळपास चार अब्जपेक्षा अधिक लोकांनी मतदान केले. त्यामध्ये अमेरिका, भारत, पाकिस्तान, इंडोनेशिया, तैवान, मेक्सिको, व्हेनेझुएला, सेनेगल आदींचा उल्लेख करावा लागेल. मात्र अधिक निवडणुकांचा अर्थ अधिक लोकशाहीवाद पसरणे हा नव्हता. आज आपण कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अत्याधुनिक शस्त्रे हाताळणीच्या युगात राहत असलो तरी मतपट्यांच्या सुरक्षेला असणारा धोका संपलेला वा कमी झालेला दिसला नाही. त्यामुळेच हायब्रीड सिस्टीमचा फायदा होत असला तरी २०२४ मधील निवडणुकांचे चक्र लोकशाहीच्या अध:पतनाचा आणि प्रतिकाराचा क्षण दर्शवून गेले आहे. सरत्या वर्षातही आंतरराष्ट्रीय नियमांची धूप अधिक स्पष्ट झाली आणि ती करणाऱ्या घटना प्रकर्षाने दिसल्या. एकाच वेळी अनेक ठिकाणी संघर्ष सुरू असल्यामुळे जग अधिकाधिक विकेंद्रित होत असल्याचे तीव्रतेने जाणवले.

२०२४ मध्ये राजकीय हिंसाचारात २७ टक्के वाढ झाली. त्याची तीव्रता आणि वारंवारताही वाढली. गाझामधील युद्धामध्ये आतापर्यंत १७,००० हून अधिकजण मृत झाले आहेत. गाझापट्टीमध्ये अडकलेल्या पॅलेस्टिनी लोकसंख्येच्या नरसंहाराच्या धोक्याबद्दल संयुक्त राष्ट्रांनी दिलेले इशारे किती पाळले गेले, हा देखील महत्त्वाचा प्रश्न आहे. या संकटात आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या वैधतेवरील चर्चेच्या दरम्यान इस्रायलने संयुक्त राष्ट्रांच्या विश्वासार्हतेलाच मोठा धक्का दिला. यावेळी सुरक्षा परिषद पक्षाघाताचे साधन बनली असल्याचे मतही व्यक्त केले गेले.

२०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय कायदा दडपशाहीने डावलण्याची वा त्याकडे दुर्लक्ष करण्याची भावना वाढलेली दिसली. गाझामध्येच नाही तर युक्रेनमध्ये युद्धाचा प्रवेश, नागोर्नो काराबाखमधून जातीय आर्मेनियन लोकसंख्येची हकालपट्टी कवा गेल्या ३६ महिन्यांमध्ये सहा आफ्रिकन देशांमध्ये झालेले सत्तापालट हे शक्तीच्या वापराचे नियंत्रणमुक्त पर्व सरत्या वर्षाने दाखवून दिले. ते आंतरराष्ट्रीय नियमांच्या ऱ्हासाचे द्योतक ठरले. गृहयुद्ध, वांशिक मतभेद आणि उपासमारीच्या परिस्थितीत मोठ्या प्रमाणात अत्याचार झाले आणि अत्याचाराचा धोका दाखवणाऱ्या या वर्षाने जगभरातील तब्बल सात दशलक्षाहून अधिक लोकांना आपापली घरे सोडून पळून जाण्यास भाग पाडले. या वर्षी सुदान हा जगातील सर्वाधिक अंतर्गत विस्थापिताचा देश बनल्याची इतिहास नोंद घेईल.

सरत्या वर्षामध्ये रशिया, ट्युनिशिया, अल्जेरिया, बेलारूस, रवांडा आणि इराण यासारख्या देशांमधील नेतृत्वाने निवडणुकांचा वापर करून सत्तेवर आपली पकड घट्ट करण्यासाठी तसेच नागरिकांच्या नजरेत वैधता मिळवण्याचा प्रयत्न केला. या पार्श्वभूमीवर अमेरिका कवा भारतासारख्या देशांमध्ये अलिकडच्या वर्षांमध्ये लोकशाही क्षीण झाल्याचीही चर्चा होत राहिली.

दुसरीकडे, या वर्षी युरोपमध्ये एकीकडे पोलिश विरोधकांचा विजय आणि दुसरीकडे नेदरलँड्समधील इस्लामोफोबिक गीर्ट वाइल्डर्सच्या विजयासह मतदानात संमिश्र परिणाम दिसून आले. एकूणच २०२४ मध्ये घेतल्या गेलेल्या विविध देशांमधील लोकशाहीच्या कसोटीत महिला आणि तरुणांची मते महत्त्वाची ठरल्याचेही तीव्रतेने जाणवते. भारतातील निवडणुकीमध्ये ही चर्चा राहिलीच, पण ब्राझील कवा ऑस्ट्रियामध्ये, अतिउजव्या शक्तीना स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांचा पाठबा १६ टक्के जास्त राहिलेला दिसला. जून २०२४ मधील घटनाक्रमानंतर मेक्सिकोमध्ये इतिहासात प्रथमच एका महिलेची राष्ट्राध्यक्ष म्हणून निवड झाली.

यंदा भारतात पंतप्रधानपदाच्या शर्यतीत तिसऱ्यांदा उभ्या ठाकलेल्या नरेंद्र मोदींच्या विरोधात विरोधी पक्ष पूर्वीपेक्षा अधिक ताकदीने आणि एकजुटीने निवडणुकांना सामोरा गेलेला दिसला. जगातील तिसरी मोठी महासत्ता बनू पाहणाऱ्या आणि जागतिक अर्थकारणामध्ये दबदबा निर्माण करणाऱ्या भारतातील या बदलत्या स्थितीकडेही जगाचे लक्ष होते. राष्ट्रवाद, ध्रुवीकरण आणि विसंगतीमुळे भारतातील या निवडणुकांकडे जगाचे लक्ष वेधले गेले. २०२३ मध्येच भारत चीनला मागे टाकून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश बनला. त्यामुळे आता या सर्वाधिक विकासदर, सर्वाधिक लोकसंख्या आणि सर्वात मोठा उपभोक्तावर्ग असणाऱ्या देशातील घडामोडींकडे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासकांचे लक्ष राहणार आहे, हे नक्की.

२०२४ मध्ये जगभर काही प्रमुख शिखर परिषदा आयोजित केल्या गेल्या. आंतरराष्ट्रीय राजकारण आणि जागतिक घडामोडींमध्ये त्यांचीही दखल घ्यावी लागेल. जसे की, १३ ते १५ जून २०२४ दरम्यान इटलीमध्ये आयोजित झालेल्या परिषदेचा मुख्य भर कृत्रिम बुद्धिमत्ता, हवामानबदल, जागतिक अन्नसुरक्षा आणि आर्थिक पुनर्बांधणी यावर राहिलेला दिसला. त्यामुळेच येत्या काळात चीन आणि रशिया यांच्या वाढत्या प्रभावाला सामोरे जाण्यासाठी जी ७ देशांचे एकत्रित प्रयत्न पहायला मिळण्याची अपेक्षा आहे. सरत्या वर्षात नाटोच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेली परिषद ९ ते ११ जुलै दरम्यान वॉशग्टन डीसी येथे पार पडली. रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर नाटो देशांमधील संरक्षण आणि सामरिक धोरणांवर यावेळी चर्चा झाली. त्यामध्ये युक्रेनला दिल्या जाणाऱ्या मदतीसंबंधी महत्त्वाचे निर्णय घेतले गेल्याचे आपण पाहिले. त्याचप्रमाणे सरत्या वर्षात संयुक्त राष्ट्रांचीही शिखर परिषद झाली. २२-२३ सप्टेंबर दरम्यान पार पडलेल्या या परिषदेचा उद्देश जागतिक समस्यांवर एकत्रित उपाय शोधणे हा होता. हवामानबदल, पाणीटंचाई आणि जागतिक शांती प्रस्थापित करण्यासारख्या मुद्द्यांवरही परिषदेमध्ये भर देण्यात आला. यंदा ११ ते २२ नोव्हेंबर दरम्यान पार पडलेल्या 'सीओपी २९' हवामान परिषदेमध्ये जागतिक हवामान संकटावर तोडगा काढण्यासाठी विविध देशांदरम्यान नवीन धोरणे आखण्याबाबतची चर्चाही लक्षवेधी ठरली. हरित ऊर्जा वापरासाठी निधीचे नियोजन आणि पर्यावरण संवर्धनाचे उपाय हे या परिषदेचे मुख्य मुद्दे होते.

एकंदर पाहता २०२४ हे आंतरराष्ट्रीय संबंधांच्या दृष्टीने मोठ्या बदलांचे वर्ष राहिले, असे म्हणावे लागेल. निवडणुका, शिखर परिषदा आणि भू-राजकीय घडामोडी आदींनी जागतिक राजकारणाला नवी दिशा दिली. यातूनच जगभरातील देशांमध्ये सहकार्य, स्थैर्य आणि शांती प्रस्थापित करण्यासाठी अधिक ठोस संवादाची आवश्यकता भासली. आता नूतन वर्षामध्ये यावर उचित कारवाई होईल अशी अपेक्षा व्यक्त करत सरत्या वर्षाला निरोप देऊ या.

✦✦✦



**महिलाविषयक प्रश्नांवर सरकारने सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. यामध्ये कायदेशीर सुधारणा, सामाजिक बदल आणि तंत्रज्ञानाचा उपयोग याला महत्त्व दिले गेले तरच महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्याकडे महत्त्वाचे पाऊल पडेल. महिलांना सुरक्षित आणि समानतेची भावना देणारा समाज भारतात निर्माण करणे आवश्यक आहे. ही भावना ठेवूनच सरत्या वर्षाला निरोप देत आत्मविश्वासाने नव्या वर्षात पाऊल ठेऊ या.**

## २०२४... महिलांच्या परिप्रेक्षातून

वर्षअखेर विशेष २०२४

**वैष्णवी कुलकर्णी**

सरते २०२४ हे वर्ष महिलांसाठी परिवर्तनकारी घटनांचे साक्षीदार ठरले आहे. समाजाचा निम्मा भाग व्यापणाऱ्या, आपले स्वतंत्र स्थान निर्माण करणाऱ्या, स्वत:ला सिद्ध करणाऱ्या महिलावर्गाने हे संपूर्ण वर्ष मिश्र भावभावनांमध्ये घालवले असेही म्हणता येईल. एकीकडे महिलांवरील वाढत्या आणि दिवसागणती रासवट, निर्घृण होत जाणाऱ्या पुरुषी अत्याचाराच्या घटनांनी समाजात खळबळ उडवून दिली तर दुसरीकडे महिलांनी गाजवलेल्या यशोगाथांनी काळाच्या भाळी काही सुवर्णक्षरेही रेखली. तेव्हा वर्षाला निरोप देताना अशा ठळक घटनांची आणि त्यायोगे बदललेल्या काही निर्णय आणि ध्येयधोरणांची चर्चा करणे क्रमप्राप्त ठरते.

सरते वर्ष महिलांचे अधिकार, महिला सक्षमीकरण, सामाजिक-आर्थिक प्रगती आणि जागतिक तसेच स्थानिक पातळीवरील महिलांच्या स्थितीचा आढावा घेणारे ठरले. समाजातील त्यांचे स्थान आणि मान उंचावण्याच्या हेतूने महिला आरक्षण विधेयकावर चर्चा रंगली. या विधेयकाद्वारे लोकसभा आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण दिले गेले. स्वाभाविकच त्यानंतरच्या पहिल्याच लोकसभा निवडणुकीमध्ये संसदेत महिलांचा टक्का वाढणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात २०१९ च्या तुलनेत तो कमी झाल्याचे दिसले. त्यामुळे राजकारणातील निर्णयप्रक्रियेत महिलांचा सहभाग आणि त्यांच्या भूमिकेची चर्चा ऐकायला मिळाली.

२०२४ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी खास योजनांची आखणी झाली. त्याअंतर्गत मुलींच्या शिक्षणासाठी विशेष अनुदान योजना आणि ग्रामीण भागातील शिक्षण सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात आले. मुख्य म्हणजे मुलींच्या शाळागळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी यंदा विशेष प्रयत्न करण्यात आले. खेरीज विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित यासारख्या क्षेत्रात महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रमही राबवलेले बघायला मिळाले. त्यामुळेच येत्या काळात या जागराचा परिणाम बघायला मिळण्याची आशा आहे. सरत्या वर्षामध्ये महिला आरोग्याच्या दृष्टीने 'मातृत्व आरोग्य योजना' अधिक व्यापक केली गेली. बालमृत्यू आणि माता मृत्यू दर कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले. महिला आरोग्य सेवांमध्ये सुधारणा, ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांचा विकास आणि कुपोषणाविरुद्धच्या लढ्यासाठी नवी धोरणे आखली गेली. त्याचबरोबर महिलांच्या मानसिक आरोग्याच्या समस्यांना प्राधान्य देत प्रसूतीनंतरचे नैराश्य आणि तणावाचा सामना करण्यासाठी जनजागृती मोहीमही राबवण्यात आली. मात्र यापुढेही या योजना आणि मोहिमा पूर्ण क्षमतेने राबवल्या जातात का, हे पहावे लागणार आहे.

२०२४ मध्ये महिलांसाठी डिजिटल साक्षरता आणि तंत्रज्ञानाचा उपयोग वाढवण्यावर भर दिला गेलेला दिसला. 'डिजिटल इंडिया' मोहिमेअंतर्गत महिलांना ई-शिक्षण, ऑनलाईन व्यवसाय संधी आणि डिजिटल तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून दिले गेले. त्यामध्ये महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी सरकारने नवीन योजना आणल्या. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि कौशल्यांचा विकास होण्याच्या रुपात याचा फायदा दिसण्याची शक्यता आहे.

महिला आणि मुलींवरील अत्याचारांची यादी खूप मोठी आहे. हाथरस, कोलकाता, बदलापूर, मणिपूर आदींपासून पुण्यातील बोपदेव घाटातील घटनांपर्यंतची सरत्या वर्षातील यादी समाजातील वाढती हसक प्रवृत्ती दाखवणारी ठरली. वेगवेगळ्या प्रकारे स्त्रिया अत्याचारी प्रवृत्तींच्या जाळ्यामध्ये अडकण्याचे प्रमाणही लक्षणीयरित्या वाढलेले दिसले. अशा वेळी समाजाची मदत आणि सहानुभूती मिळत असली तरी पीडित आणि बाधितांचे जगणे कष्टप्रदच होऊन जाते. हे लक्षात घेता या वर्षी अत्याचार करणाऱ्यांना कठोर शासन करण्याबरोबरच डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांमध्ये अडकणाऱ्या, ऑनलाईन छळ सहन करणाऱ्या महिलांची मोठी संख्या बघता त्यांच्या सुरक्षेसाठी सायबर क्राइमविरोधी कडक कायदे आणि उपाययोजना राबवण्यात आल्या. यामध्ये महिलांना सुरक्षित डिजिटल वातावरण प्रदान करण्यासाठी हेल्पलाईन्स आणि जागरूकता कार्यक्रम राबवण्यात आले. त्याचबरोबर निर्भया निधीअंतर्गत नवीन प्रकल्पही राबवण्यात आले. सरत्या वर्षात महिला सुरक्षा हेल्पलाइन (११२) अधिक सक्षम झालेली दिसली तसेच त्वरित प्रतिसाद देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यात आला. अर्थातच अनेक महिलांनी याचा लाभ घेतला. महिला आणि मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करून स्वावलंबी बनवण्यावरही सरकारचा भर दिसत आहे.

सरत्या वर्षामध्ये भारतातील काही राज्यांमध्ये महिलांसाठी खास पोलीस स्टेशन सुरू करण्यात आले. या पोलिस स्टेशनमध्ये महिलांना सुरक्षित वातावरणात तक्रार नोंदवता येते. तसेच काही राज्यांमध्ये महिलांसाठी विशेष पथकांची स्थापनाही करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महिलांसाठी १०९१ ही २४ तास आपत्कालीन सेवा पुरवणारी हेल्पलाइन सुरू केली गेली. खेरीज महिलांसाठी विविध मोबाइल प्सदेखील तयार करण्यात आली असून त्यामुळे तात्काळ मदत मिळवता येत आहे. या सगळ्याच्या बरोबरीने महिला सुरक्षेसाठी विविध शैक्षणिक आणि जनजागृती मोहीमदेखील राबवण्यात आल्या. या सर्वांमुळे महिलांमध्ये आपल्या हक्कांविषयी जागरूकता वाढली असून अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. मात्र अशा काही कायदेशीर आणि संस्थात्मक सुधारणा झाल्या असल्या तरी महिलांच्या सुरक्षेसमोरील अनेक आव्हाने अद्यापही कायम आहेत. बरेचदा हसाचाराच्या घटना पोलिसांना सांगायला महिलांना भीती वाटते. सामाजिक कलंक, पतीचा दबाव कवा कुटुंबीयांचा विरोध यामुळे महिलांना तक्रारी दाखल करण्यास संकोच वाटतो. मात्र तो कमी करुन महिलांना अधिकाधिक भयमुक्त वातावरण देणे, ही समाजाची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे, हे आता यंत्रणेने मान्य केल्याचे दिसते.

अर्थातच हे साधायचे तर येत्या वर्षामध्ये कायदेशीर अंमलबजावणीत सुधारणा गरजेची आहे. त्याचाच एक भाग म्हणून पोलिस आणि न्यायालयीन यंत्रणांना महिलांविरोधी गुन्ह्यांसाठी विशेष प्रशिक्षण देणे तसेच गुन्ह्यांच्या तात्काळ आणि प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रोत्साहित करणे गरजेचे ठरेल. दुसरीकडे, महिलांविषयी समाजाची मानसिकता बदलणेदेखील अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी शालेय आणि शैक्षणिक संस्थांमध्ये लैंगिक समानता आणि महिलांच्या अधिकारांची जागरूकता वाढवणे आवश्यक आहे. नूतन वर्षामध्ये महिलांसाठी सार्वजनिक ठिकाणी अधिक सुरक्षा उपाय योजणे आवश्यक ठरेल. महिलांना तात्काळ मदत मिळवून देण्यासाठी फास्ट ट्रॅकग, व्हिडिओ सर्विलन्स आणि आपत्कालीन प्स यांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. या सगळ्याबरोबर महिलांसाठी समुपदेशन, कायदेशीर मदत आणि आर्थिक मदतीसाठी विशेष पद्धती विकसित करणे आवश्यक आहे. अशा सर्व पातळ्यांवर काम झाल्यास पीडितांचे चांगल्या प्रकारे पुनर्वसन होऊ शकेल.

एकंदरच महिला सक्षमीकरणाच्या बाबतीत भारत जागतिक स्तरावर पुढाकार घेत असल्याचे आश्वासक चित्र २०२४ मध्ये बघायला मिळाले. यंदाच्या जी २० परिषदेतील भारताच्या अध्यक्षपदावेळी महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने जागतिक चर्चासत्रांचे आयोजन केले गेले. त्यामुळे नूतन वर्षामध्ये महिला सक्षमीकरणाच्या मोहिमेला नवे बळ मिळण्याची आशा वाटते. ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी महिला बचत गटांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. या गटांना आर्थिक अनुदान, प्रशिक्षण आणि बाजारपेठेमध्ये प्रवेश मिळवून देण्यासाठी सरकार विशेष योजना राबवत आहे. शेतीकाम करणाऱ्या महिलांनाही विशेष प्रोत्साहन दिले जात असून त्यांच्यासाठीही अनुदान आणि तंत्रज्ञान प्रशिक्षणाबरोबर जल व्यवस्थापन कार्यक्रम राबवण्यावर यंदा भर दिला गेला. ग्रामीण भागातील महिलांकडून चालवल्या जाणाऱ्या लघुउद्योगांना उत्तम सरकारी मदत दिली गेली.

सरते वर्ष महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुकीने आणि त्यातील 'गुलाबी' रंगाने विशेष गाजवले. राज्याचा विचार केला तर निकषांमध्ये बसणाऱ्या लाडक्या बहिणींच्या खात्यामध्ये जमा होणाऱ्या ठराविक रकमेने जादू केली. हा लाभ लक्षात घेऊन महिला मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडल्या आणि महायुतीच्या झोळीत भरघोस मते टाकली. आता ही रक्कम वाढण्याची अपेक्षा आहे. मात्र हे सगळे करताना सरकारने एक सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. यामध्ये कायदेशीर सुधारणा, सामाजिक बदल आणि तंत्रज्ञानाचा उपयोग याला महत्त्व दिले गेले तरच महिलांची सुरक्षा सुनिश्चित करण्याकडे महत्त्वाचे पाऊल पडेल. महिलांना सुरक्षित आणि समानतेची भावना देणारा समाज भारतात निर्माण करणे आवश्यक आहे. ही भावना ठेवूनच सरत्या वर्षाला निरोप देत आत्मविश्वासाने नव्या वर्षात पाऊल ठेऊ या.

✦✦✦

# विमानतळाची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर विमानतळावरील धावपट्टीच्या रिकार्पेटिंगला विलंब होत असल्याने संताप व्यक्त केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे.

महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे अध्यक्ष असलेल्या मुख्यमंत्र्यांनी नागपूर विमानतळाची जबाबदारी एमएडीसीच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांच्याकडून काढून घेतली आहे. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडे नागपूर विमानतळाची जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एमएडीसीच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून स्वाती पांडे कार्यरत आहेत. एमएडीसी आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या संयुक्त उपक्रम मिहान इंडिया लि. (एमआयएल) ही कंपनी नागपूर विमानतळाचे व्यवस्थापन पाहते. सध्या एमआयएलचे अध्यक्ष स्वाती पांडे आहेत.

परंतु विमानतळावरील धावपट्टीचे रिकार्पेटिंग अनेक दिवसांपासून रखडले आहे. त्यामुळे येथील उड्डाणाच्या वेळांवर मयार्दा आल्या आहेत. परिणामी काही विशिष्ट वेळातील विमानांचे तिकीट महागले आहे. त्यावरून नितीन गडकरी यांनी एमआयएल आणि एएआय अधिकाऱ्यांना तसेच हे काम करीत असलेल्या कंत्राटदारवर नाराजी व्यक्त केली.

गेल्या सोमवारी गडकरी यांनी नागपूर विमानतळाला भेट दिली आणि




संथ गतीने होत असलेल्या कामाबाबत संताप व्यक्त केल्या. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वाती पांडे कडून एमआयएलचे अध्यक्षपद काढून जिल्हाधिकारी डॉ. इटनकरकडे दिले आहे. शिवाय या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक समिती देखील स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये केंद्रीय मंत्री निती गडकरी, मुख्यमंत्री फडणवीस, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीचे रिकार्पेटिंग अनेक दिवसांपासून रखडले आहे. परिणामी, विमान वाहतूक प्रभावित झाली आहे. प्रवाशांना याचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. २०२४ मे महिन्यात के जी गुप्ता कंपनीला रनवे रिकार्पेटिंगचं काम दिलं. रनवे रिकार्पेटिंगच्या कामामुळे विमान कंपन्यांनी शेड्युल बदलले, त्यामुळे विमान तिकिटांचेच दर वाढले .

त्यामुळे लवकरात लवकर धावपट्टीचे काम पूर्ण करण्याचे निर्देश गडकरी यांनी पाहणीनंतर अधिकाऱ्यांना दिले होते. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत याबाबत चर्चा केली होती. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली विमानतळाच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीत दिलीप जाधव, चंदन गोस्वामी, प्रकाश भोयर, गिरीधारी मंत्री, संजय पेशने आणि उदय आंबुलकर यांचा समावेश आहे. ही समिती लवकरच आढावा बैठक आयोजित करणार आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी इटनकर यांच्याकडे एमआयएलचे अध्यक्ष म्हणून नागपूर विमानतळाची जबाबदारी आली आहे. ते आता धावपट्टीचे रिकार्पेटिंगच्या कामावर लक्ष ठेवणार आहेत.

## दुभाजकाना ऑटो धडकून मायलेकाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २८ :
भरधाव ऑटो दुभाजकावर धडकून उलटल्याने त्यात स्वार चालक व त्याच्या आईचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना गुरुवारी (२६) मध्यरात्री १२ वाजता एमआयडीसी-वाडी मार्गावर वर प्लास्टो कंपनी समोर घडली.





रोहित गोपाल साखरे (वय २५) व करुणा गोपाल साखरे (वय ४९), रा. राजीवनगर, हिंगणा रोड नागपूर अशी मृतकांची नावे आहेत. रोहित हा ऑटो चालवण्याचा व्यवसाय करायचा तर त्याची आई अरुणा ही अंगणवाडी सेविका होती. गुरुवारी सायंकाळी दोघेही त्यांच्या ऑटो क्र. एम एच ३१ एफ बी ४११० ने रोहितची चुलत बहीण प्रणाली दमगाये रा. शंभू नगर, नारा रोड, जरीपटका नागपूर हिच्याकडे मुलाच्या वाढदिवसाला गेले होते. रात्री कार्यक्रम आटपून ऑटोने परत येत असताना प्लास्टो कंपनी समोर सेंट्रल एमआयडीसी रोडवर चालक रोहितचे ऑटो वरील नियंत्रण सुटले.

भरधाव ऑटो आधी दुभाजकावर आदळला व उलटला. यात चालक रोहित व मागच्या प्रवासी सिटवर बसलेली त्याची आई करुणा दोघांनाही डोक्याला व हातापायाला मार लागल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या मार्गाने जाणाऱ्या काही वाहन चालकांनी याची माहिती एमआयडीसी पोलिसांना दिली. ठाणेदार महेश चव्हाण व स्टाफ घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी एम्स रुग्णालयात पाठविण्यात आले. एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# शॉर्टसर्किटमुळे आग, घराची राखरांगोळी





■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
शहरातील सदर परिसरात एका इमारतीला पहिल्या मजल्यावर शॉर्टसर्किटमुळे आग लागून सिलेंडरचा स्फोट झाला. परिणामी, संपूर्ण घराची राखरांगोळी झाली असून, संपूर्ण कुटूंब उघड्यावर आले आहे .

बलराज गटलेवार, सुशीला बाई बलराज, रा. धंतोली, सुशीलाबाई बलराज यांच्या मालकीचे घर सदर परिसरात असून, येथे तृप्ती नितीन गटलेवार, मनोज गटलेवार, राकेश गटलेवार आणि इतरांचे वास्तव्य आहे.

शुक्रवारी सायंकाळी शॉटसर्किटमुळे आग लागली. आग स्वयंपाक घरापर्यंत पोहचली आणि आगीमुळे सिलेंडरचा स्फोट होवून आग अधिकच भडकली.



या आगील घरातील सर्व साहित्य, कपडेलत्ते आणि धन्य जळून खाक झाले.

दरम्यान, आज शनिवारी पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी घटनास्थळी भेट दिली . जगदंबा फाऊंडेशनच्यावतीने पीडित कुटुंबातील चार सदस्यांना प्रत्येकी १ लाख रूपये याप्रमाणे ४ लाख रूपयांची मदत त्यांनी दिली. पीडित कुटुंबाला शासनाकडून सर्वतोपरी आर्थिक सहकार्य मिळवून देण्यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ. ठाकरे यांनी सांगितले . यावेळी मुमताज शेख, टिळकराज नायडू, कोढूरवार, कमलनारायण नामपल्लीवार यांच्यासह पीडित तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

## मलकापूर पांग्रा येथे कडकडीत बंद

■ महासागर प्रतिनिधी
मलकापूर, दि. २८ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व परभणीतील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ शुक्रवारी २७ डिसेंबर रोजी मलकापूर पांग्रा येथे कडकडीत बंद पाळण्यात आला.

या बंद काळात गावातील आणि बसस्थानक परिसरातील सर्व दुकाने बंद ठेवण्यात आली. या बंदला गावातील सर्व समाजबांधवांनी प्रतिसाद दिला.

या बंददरम्यान बस स्थानकावर निदर्शने करण्यात आली. संतोष देशमुख व सोमनाथ सुर्यवंशी यांच्या हत्येसंदर्भात सखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या वेळी करण्यात आली. बंद यशस्वी करण्यासाठी यादव टाले, अमोल देशमुख, शरद आटोळे, तंटामुक्ती अध्यक्ष महादेव गवई, ग्रामपंचायत सदस्य राजू साळवे, बंडू उगले, सुदाम देशमुख, रवी वायाळ, प्रल्हाद देशमुख, कैलास देशमुख, अंकुश देशमुख, गजानन देशमुख, रमेश देशमुख, राजू शेळके, निलेश काकडे, विजय आटोळे, अरुण टाले, सुनील बनसोडे आदींनी पुढाकार घेतला.

## ग्रामसभेत एकमताने दारूबंदीचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी, बुलढाणा, दि. २८ :
देऊळगाव घुबे येथील ग्रामपंचायतीच्या वतीने शुक्रवारी आयोजित ग्रामसभेत तरुणांनी उपस्थित केलेल्या विविध मुद्द्यांवर तोडगा काढण्याची तयारी दर्शवण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने गावात दारूबंदी करण्याचा ठराव घेण्यात आला. येथील ग्रामसभा विविध मुद्द्यांवरून नेहमीच गाजत असते. यापूर्वी, आचारसंहिता संपुष्टात आल्यानंतर १७ डिसेंबर रोजी ग्रामसभेचे आयोजन केले होते. मात्र, ती ग्रामसभा तहकूब करण्याची वेळ आली होती.

त्यानंतर शुक्रवारी सकाळी ग्रामसभा घेण्यात आली. या वेळी सरपंच मालता जोहरे आणि ग्रामसभा अध्यक्ष म्हणून भास्कर घुबे यांची प्रमुख उपस्थिती होती. गावात कोणकोणती कामे करायची आणि कोणत्या योजना राबवण्यात येणार आहेत, अशी विचारणा तरुणांनी या वेळी केली. त्यावर सरपंच मालता जोहरे आणि ग्रामसेवक ननकर यांनी उत्तरे दिली. या वेळी गावातील अवैध देशी दारूची दुकाने बंद करून गावाबाहेर काढावीत, पाणीपुरवठा सुरळीत करावा, ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेळापत्रक लावावे अशा मागण्या तरुणांनी केल्या. या वेळी दारूबंदीचा ठराव पारित करण्यात आला.

## अकोल्यात बसपचे धरणे आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २८ :
परभणी येथील घटनेच्या विरोधातही आंदोलन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा बहुजन समाज पक्षाने निषेध केला असून, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. याबाबत बसपने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनही सादर केले.

दरम्यान बहुजन समाज पार्टीने धरणे आंदोलन करीत अमित शाह यांनी केलेल्या विधानाचा निषेध नोंदवला. जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाची प्रत राष्ट्रपती, पंतप्रधान व महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनाही पाठवण्यात आली आहे.
आंदोलनात जिल्हाध्यक्ष रमेश इंगळे, प्रा. व्ही. आर. इंगळे, जी. एन. खडसे, विनायकराव वानडखे, डॉ. धनंजय नालट आदी सहभागी झाले. परभणी येथील घटनेविरोधातही आंदोलन करण्यात आले.

## अवैध सावकारांच्या घरांवर छापे

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २८ :
अवैधरित्या सावकारी करणाऱ्या दोघांच्या घरी सहकार विभागाने छापे टाकून व्यवहाराची ४६ महत्त्वपूर्ण कागदपत्रे जप्त केली. अचलपूर शहरातील दोन ठिकाणी ही कारवाई स्वतंत्र दोन पथकांमार्फत करण्यात आली.

जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्याकडे अचलपूर शहरातील दोन ठिकाणी अवैध सावकारीच्या व्यवसायासंदर्भात तक्रारी आल्या होत्या. त्यानुसार त्यानी दोन स्वतंत्र पथक गठित करून कारवाई केली. कांडली येथील राजकुमार गुळधे यांच्या निवासस्थानी साहाय्यक निबंधक के. एस. बलिंगे यांच्या नेतृत्वातील पथकाने छापा टाकला.

या कारवाईत करारनामे, कोरे धनादेश व इतर असे १३ दस्तऐवज जप्त करण्यात आलेत. तर, दुसरी कारवाई अचलपूरातील जुना सराफा येथील रमेश गुलाबचंद तांबी यांच्या निवासस्थानी करण्यात आली. या कारवाईत कोरे धनादेश, करारनामे व इतर कागदपत्रे असे ३३ दस्तऐवज जप्त करण्यात आलेत.

ही कारवाई साहाय्यक निबंधक ए. डी. चर्जन यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कागदपत्रांच्या तपासणीनंतर दोन्ही सावकारांविरूद्ध नियमानुसार सावकारी कायद्यानुसार गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया प्रारंभ करण्यात आली आहे.

कांडली येथील कारवाईत पथकप्रमुख ढोके, गडलिंग, सपकाळ व कुऱ्हाडे, तर जुना सराफा बाजार येथील कारवाईत मुळे, अरबट, कुकडे व दहातोंडे यांचा सहभाग होता.

शहरात आणि जिल्ह्यात अवैध सावकारी फोफावली असून, कारवाई सुरू राहणार आहे.

## यवतमाळ जिल्ह्याच्या पालकत्वाचा तुरा कोणाच्या शिरपेचात?

■ रघुवीरसिंह चौहान
यवतमाळ, दि. २८ :
महाराष्ट्रात भाजप, शिंदेसेना, रा.का. अजित गट या तीन पक्षांसह महायुतीचं सरकार अस्तित्वात आलं, जम्बो मंत्रिमंडळही गठीत झालं, खातेवाटपही झाले. आता सर्वांच लक्ष लागलं आहे पालकमंत्रीपदाकडे...!

यवतमाळ जिल्ह्याचे पालकत्व संजय राठोड यांच्याकडे की, अशोक उईके यांच्याकडे जाणार? यावर सर्वत्र खलबते सुरू आहेत.

जिल्ह्यातून एकच मंत्री असले की आपोआपच पालकमंत्रीपद त्याच मंत्र्यांकडे जाते. पण, यावेळी राज्याची सत्ता भाजप,सेना आणि रा.का. या तीन प्रमुख पक्षांत विभागली गेली आहे. त्यामुळे या तिघांनाही वाटते की,प्रत्येक जिल्ह्यात आपापले पक्ष सुदृढ संपन्न झाले पाहिजे. कारण, पालकमंत्रीपदाच्या मागे बरेच काही दडलेले असते. म्हणून पालकमंत्रीपदावर तिघींच्याही नजरा असने स्वाभाविकच आहे.
यापूर्वी सुध्दा असाच एक प्रसंग ओढवला होता. तो प्रसंग सुध्दा युती सरकारच्याच काळातील होता.

तेव्हा भाजपचे मदन येरावार व अशोक उईके हे दोन मंत्री आणि शिवसेनेचे संजय राठोड हे तिसरे मंत्री होते.मदन येरावार हे सिनियर आमदार असल्याने त्यांच्यासाठी पालकमंत्रीपद प्रतिष्ठेचा प्रश्न झाला होता. तर दुसरीकडे संजय राठोड हे सिनियर आमदार व मंत्री असल्याने दोघांमध्ये पालकमंत्रीपद प्रतिष्ठेचा प्रश्न निर्माण झाला होता. पण, वरिष्ठांनी त्यात समझोता करून मदन येरावार याना यवतमाळचे आणि संजय राठोड यांना वाशीमचे पालकमंत्रीपद बहाल करून प्रसंग निभावून नेला आणि अशोक उईके यांना कॅबिनेट मंत्री केले होते.

यावेळी मात्र मदन येरावार यांचा मतदारांनीच पत्ता कट केला, त्यामुळे आता पालकमंत्रीपदासाठी रस्सीखेच आहे सेनेचे संजय राठोड आणि भाजपचे अशोक उईके यांच्यात..!
तिसरे मंत्री इंद्रनील नाईक नवीन आणि राज्यमंत्री आहेत त्यामुळे ते पालकमंत्रीपदासाठी खूप आग्रही असणार नाहीत.पण, अजित पवार जर काही खेळी खेळले तर मात्र दोघांच्या प्रतिष्ठेत तिस-याचा लाभ झाल्यास नवल वाटू नये..! कारण, राजकारणात काहीही होऊ शकते..

काल यवतमाळात पत्रकारांशी संवादात संजय राठोड म्हणाले की, वरिष्ठांनी माझे जुनेच खाते मृद व जलसंधारण मला बहाल केले आणि यवतमाळचे पालकमंत्रीपद सुध्दा माझ्याकडे कायम राहील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करून आपला पालकमंत्रीपदावर दावा असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. आता बघने हेच आहे की,यवतमाळचे पालकत्व कोणाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवते..?

## चार दुर्मिळ चांदी अस्वलांचा मृत्यू



■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २८ :
जंगलाला लागून असलेले मार्ग वन्यप्राण्यांच्या मृत्यूसाठी कारणीभूत ठरत आहेत. चंद्रपूर-मूल महामार्गावरील डोनी फाट्याजवळ दोन दुर्मिळ चांदी अस्वलांचा वाहनाच्या धडकेत मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी रात्री उघडकीस आली.

यापूर्वी मूल जवळ आणि विसापूर टोल नाक्याजवळ अपघातात चांदी अस्वलांचा मृत्यू झाला असून, जिल्ह्यात ४ चांदी अस्वलांचा मृत्यू झाल्याची नोंद हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीने केली आहे

चंद्रपूर-मूल मार्गावर रोजच एखादा पक्षी, साप, तृणभक्षी, मांसभक्षी प्रकारातला वन्यप्राणी मृत्यूमुखी पडतो. हा राष्ट्रीय महामार्ग ९३० क्रमांकाचा असून, या राष्ट्रीय महामार्गावर वन्यप्राण्यांसाठी उपशमन योजना राबविण्यात येणार आहे. परंतु, हे काम रखडले असून, वन्यजीवांना याची किंमत मोजावी लागत आहे.

हाच महामार्ग पुढे गडचिरोली-धानोरा-मुरमगावपर्यंत जातो. धानोरा भागात सुद्धा संख्या कमी होत चाललेल्या तडसाचा अनेकदा अपघाती मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, अशी माहिती हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीने दिली.

घटनास्थळी हॅबिटॅट कंझर्वेक्षण सोसायटीचे अध्यक्ष दिनेश खाटे, अमित देशमुख, ओमकार मत्ते, संजीवणी पर्यावरण संस्थेचे उमेश झिरे, तन्मय झिरे, वनविकास महामंडळाचे सहाय्यक वनरक्षक आर. एस. कदम, वनपरिक्षेत्र अधिकारी बोथे, वनरक्षक कुमरे उपस्थित होते. तर मुल व विसापूर येथेही चांदी अस्वलाचा मृत्यू आला.

चार चांदी अस्वलाचा अपघातात मृत्यू आल्याने या मार्गावर वाहन चालकांना वेगावर नियंत्रण ठेवण्याची मयार्दा असतानाही सुसाट वेगात वाहन धावत असल्याने वन्य जीव प्रेमींनी नाराजी व्यक्त केली आहे.

## ऊर्जा विभागाच्या इंग्रजी चित्रफितीला राष्ट्रीय पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :
पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने आयोजित छत्तीसगडमधील रायपूरच्या हॉटेल बेबीलॉन इंटरनॅशनलमध्ये ४६ व्या राष्ट्रीय संमेलनात महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभागाच्या इंग्रजी भाषेतील चित्रफितीला राष्ट्रीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

छत्तीसगड राज्याचे उप मुख्यमंत्री अरुण साव यांच्या हस्ते हा राष्ट्रीय पुरस्कार महानिर्मितीचे मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते यांनी देशातील सुमारे २०० जनसंपर्क तज्ज्ञांच्या उपस्थितीत स्वीकारला.
या प्रसंगी पीआरएसआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, राष्ट्रीय कार्यकारिणी सचिव डॉ. पीएलके मूर्ती, डॉ. यू. एस. शर्मा, नरेंद्र मेहता, सत्येंद्र प्रसाद सिंग, दिलीप चौहान, अनु मुजुमदार, रायपूर चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. शाहिद अली व मान्यवर उपस्थित होते.
गांधीनगर गुजरात येथे सप्टेंबर २०२४ मध्ये संपन्न झालेल्या चवथ्या जागतिक नवीकरणीय ऊर्जा परिषदेसाठी सहभागी होणाऱ्या देश-विदेशातील प्रतिनिधींना महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित करण्यासाठी विशेषत्वाने तयार करण्यात आलेल्या ऊर्जा विभाग महाराष्ट्राच्या चित्रफितीला राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार तसेच अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांचे मार्गदर्शनाखाली ऊर्जा विभागाने केलेल्या उल्लेखनीय कामांचा, हरित ऊर्जा क्षेत्रातील अभिनव योजनांचा आगामी संसाधन पर्याप्तता आराखडा या चित्रफितीत मांडण्यात आला आहे.





### रायपूर येथे कार्यक्रमात पुरस्कार प्रदान

महानिर्मितीच्या जनसंपर्क विभागाने अतिशय कमी वेळेत ही आकर्षक चित्रफीत तयार केल्याबद्दल तसेच राष्ट्रीय पुरस्काराबद्दल अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, महासंचालक महाऊर्जा डॉ. कादंबरी बलकवडे यांनी अभिनंदन केले आहे.

**श्यामबाबू कधीच कोणत्याही प्रवाहात वाहत गेले नाहीत. आपल्याला रुचतील तेच विषय निवडले. त्यांच्या फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त 'जुनून'मध्येही ब्रिटीशांच्या काळातला विषय घेऊन वैविध्य जपले होते. त्याची मांडणीही वेगळी होती. आपल्या प्रत्येक चित्रपटामध्ये त्यांनी वेगळेपण जपले. कधीच प्रसिद्धीची वाट धरली नाही. त्यामुळेच त्यावेळी सत्यजीत रे वा त्यासारख्या मंडळींचा प्रभाव असला तरी ते आपली शैली जपू शकले.**

# एक लाट किनारी विसावली

श्याम बेनेगल हे समातंर चित्रसृष्टीतील फार मोठे नाव. तसे पहायला गेले तर त्यांच्यापासूनच समांतर चित्रपटाच्या चळवळीला सुरूवात झाली. त्यांच्याबरोबर अनेकांनी आपला या सृष्टीतील प्रवास सुरू केला. शबाना आझमी हे यातील एक नाव. श्याम बेनेगल यांच्या पहिल्या फिचर फिल्म



पासूनच तिने या क्षेत्रात प्रवेश केला. आधी ते जाहिरात विश्वात कार्यरत होते. मात्र पुढे त्यांचा प्रवास या वेगळ्या वाटेकडे वळला. तो इतका सुंदर होता, की त्यांच्याकडे बघूनच अनेकांना याकडे वळण्याची प्रेरणा आणि हिंमत मिळाली.

म्हणूनच ते अनेकांचे गुरू होते. अनेकांचे प्रेरणास्थान होते. त्या काळात आमच्या पिढीतील सगळेच संघर्ष करत होतो. प्रत्येकजण आपापल्या वाटेने पुढे जात होता. काही काळाने मीदेखील या क्षेत्रात स्थिरावले. ते माझे काम बघत होते. 'पार्टी' या चित्रपटातील काम बघून आवर्जून भेट घेत त्यांनी मला शाबासकी दिली होती. खूप छान काम केले आहेस, तू मोठ्या पारितोषिकाला पात्र आहेस... असे ते तेव्हा म्हणाले होते. त्यावर गमतीने मी त्यांना 'श्यामबाबू, तुम्ही मला कोणतेही पारितोषिक देऊ नका, एक रोल द्या' असे म्हटले होते. दुर्दैवाने तो योग कधी आला नाही.

कदाचित त्यांच्याबरोबर काम करण्याचे माझे भाग्य नव्हते, असे म्हणावे लागेल आणि ही खंत कायमच मनात राहील. श्यामबाबू कधीच कोणत्या प्रवाहात वाहत गेले नाहीत. त्यांनी कायम स्वत:ला पाहिजे तसेच चित्रपट केले. आपल्याला रुचतील तेच विषय निवडले. उदाहरणादाखल फिल्मफेअर ॲवॉर्ड मिळवणारा त्यांचा 'जुनून' बघा. यातही त्यांनी ब्रिटीशांच्या काळातला विषय घेऊन वैविध्य जपले होते. त्यावेळी तो पूर्णपणे नवीन असा विषय होता आणि मांडणीही वेगळी होती. अशा प्रकारे आपल्या प्रत्येक चित्रपटामध्ये त्यांनी वेगळेपण जपले. त्यांना कधीच प्रसिद्धीच्या मागे जावेसे वाटले नाही. त्यामुळेच त्यावेळी सत्यजीत रे वा त्यासारख्या मंडळींचा प्रभाव असला तरी ते आपली शैली जपू शकले. ती समर्थपणे लोकांसमोर आणू शकले. असे वेगळेपण जपण्यासही ताकद लागते. अर्थात त्यांचे सगळे चित्रपट खूप चालले, प्रचंड कमाई केली असे नाही. पण त्यांचा प्रत्येक चित्रपट पाहून लोक प्रभावित झाल्याचेही नाकारुन चालणार नाही. हा चित्रपट वेगळा आहे, काही तरी वेगळे समोर आणतो आहे, हे त्यांची प्रत्येक अभिव्यक्ती बघून जाणवत राहिले. अगदी हंसा वाडकर यांच्या आयुष्यावर बेतलेल्या 'भूमिका' सारख्या चित्रपटाचा विचार केला तरी ही बाब जाणवते. असे नवनवीन विषय त्यांनी रुपेरी पडद्यावर आणले. ते प्रेक्षकांनाही भावले आणि समिक्षकांनाही दखल घ्यावी लागली. श्याम बेनेगल अत्यंत हुशार आणि विचारी होते. ट्रेंड सेट करणारे होते. स्मिता पाटील, अमोल पालेकर, अमरिश पुरी ही सगळी त्यांची नटमंडळी होती. अमरिश पुरी यांच्या वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका तर केवळ त्यांच्याच चित्रपटांमध्ये बघायला मिळतात. एरवी खलनायकी भूमिकांमध्ये दिसले तरी श्यामबाबूंच्या चित्रपटांमध्ये त्यांना खऱ्या अर्थाने अभिनयातील वैविध्य दाखवण्याची संधी मिळाली, असे म्हणता येईल. नसीर, ओम, शबाना अशी किती तरी नावे घेता येईल. त्या वेळच्या या पिढीने वेगळा प्रभाव निर्माण केला, एक काळ गाजवला. त्यातील एक मोठे नाव आता आपल्यात नाही याचे दु:ख आहे.



**रोहिणी हट्टंगडी**
**ज्येष्ठ अभिनेत्री**


**(शब्दांकन: स्वाती पेशवे)**

✦✦✦

# प्रवाह आणि विचार बदलणारा दिग्दर्शक

ख्यातनाम दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्याबरोबर काम केले. या दोन वर्षांव्यतिरिक्त कधी तसा योग आला नाही. पण आजही 'निशांत' आणि 'मंथन'चे ते दिवस आठवतात. पुढे त्यांच्या 'भूमिका'चे चित्रीकरण पुण्यात सुरू होते आणि त्यात मी पाहुण्या कलाकाराची भूमिका बजावली होती. शाम बेनेगल यांच्या चित्रपटांनी प्रवाह आणि विचार बदलण्याचे काम केले. या माणसाने अगदी जिद्दीने या क्षेत्रात पाय रोवले आणि खंबीरपणे होता त्या जागी उभा राहिला. त्यांना पहिली फिचर फिल्म करण्यासाठी तब्बल वीस वर्षे वाट पहावी लागली. त्याआधी ते जाहिराती, डॉक्युमेंटरी, कॉर्पोरेट फिल्मस या क्षेत्रामध्ये कार्यरत होते. मात्र योग्य संधी मिळताच त्यांनी फीचर फिल्म केली आणि 'अंकुर' या त्यांच्या पहिल्याच चित्रपटाने समांतर चित्रपटांच्या विश्वात एक ट्रेंड सेट केला. तोपर्यंत हे वारे बंगाल आणि मल्याळी चित्रसृष्टीपुरतेच सीमित होते. त्यामुळेच हिंदी चित्रसृष्टीत समांतर चित्रसृष्टी सुरू करण्याचे सगळे श्रेय श्याम बेनेगल यांना जाते. १९६०-७० च्या दशकात समांतर सिनेमा जन्माला आला, वाढला पण अल्पायुषी ठरला, कारण टेलिव्हिजनचे विश्व विस्तारण्याचा तोच काळ होता. त्यामुळे टीव्ही मोठा झाला तसे समांतर चित्रपट करणारे सगळे तिकडे वळाले. याचे कारण म्हणजे तेवढ्या बजेटमध्ये चित्रपट करणे, तो प्रदर्शित करणे शक्य होत नव्हते. हा प्रवाह थांबण्यामागील हे आर्थिक कारणही लक्षात घ्यायला हवे. म्हणूनच सत्यजीत रे यांच्यापासून श्याम बेनेगल यांच्यापर्यंत सगळ्यांनी टेलिव्हिजन मालिका केल्या. अर्थात त्यातही त्यांनी वेगळेपण दाखवले. 'यात्रा', भारत की खोज' यासारख्या मालिका आजही अनेकांच्या स्मरणात असतील. असे असले आणि चांगले नाव झाल्यानंतरही श्याम बेनेगल यांचा पुढचा प्रवास सुकर झाला, असे म्हणता येणार नाही, कारण अशा दिग्दर्शकांनाही निर्माते मिळणे अवघड जातेच. श्याम बेनेगल यांनाही या समस्येचा सामना करावा लागला. म्हणून त्यांनी 'मंथन' केला. यातही त्यांनी सामाजिक विषयालाच हात घातला होता. असाच काळ सरला आणि पुढे पुढे तर ते केंद्र सरकारचे लाडके दिग्दर्शक झाले. 'मेकिंग ऑफ महात्मा', नेताजी सुभाषचंद्र', 'हरीभरी', 'भारत: एक खोज' यासारखी उदाहरणे याची साक्ष देतील. थोडक्यात, प्रोड्युसर म्हणून केंद्र सरकारची साथ मिळवण्याचे भाग्य त्यांना लाभले आणि त्यामुळेच आपल्याला हवे तसे चित्रपट त्यांना करता आले. व्यक्ती म्हणून ते मोठे होतेच. कुतूहल जपणारा, अभ्यासू असा हा माणूस होता. माझे त्यांच्याबरोबरचे संबंधही अगदी जिव्हाळ्याचे होते. कधीही भेटलो तरी आपुलकीने विचारपूस करणारा तो चांगला मित्र होता. पद्मश्री मिळाल्यानंतर माझे अभिनंदन करण्यासाठी ते खास मुंबईहून आले होते.

– **डॉ. मोहन आगाशे**, ज्येष्ठ अभिनेते



# सुडाचा दक्षिणाध्याय...

**तेलंगणामध्ये 'मनी लॉँड्रिग'च्या कथित गैरव्यवहारावरून माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचे चिरंजीव के. टी. रामाराव यांच्याविरोधात कारवाई सुरू झाली आहे. सुमारे चार महिन्यांपूर्वी त्यांची मुलगी कविता दिल्ली दारू घोटाळ्यात अडकली होती. ती तिहार तुरुंगातून सुटल्यानंतर आता मुलगा के. टी. रामाराव मोठ्या राजकीय आणि वैयक्तिक संकटाचा सामना करत आहे. तेलगणामध्ये सूडनाट्य पेटले आहे.**

**नोंद**
**शैलेश रेड्डी**

कोणताही पक्ष कायम पराभूत होत नसतो, तसेच कायम विजयी होत नसतो. जनता राजकीय पक्षांना जोखत असते. सहनशीलतेच्या पलीकडे गेले की जनता कितीही मोठा पक्ष असला, तरी धडा शिकवते. नुकत्याच निवडून दिलेल्या सरकारविरोधातही ती बंड करू शकते. याच सुमारास राजकीय विरोधकाला कस्पटासमान वागवायची सध्याच्या सत्ताधाऱ्यांची रीत झाली आहे. आपल्या हाती असलेल्या वेगवेगळ्या यंत्रणांचा वापर करून एखाद्याला आयुष्यातून उठवले जाते. गंभीर गुन्हा असला, तर तसे करायलाही हरकत नाही; परंतु हेमंत सोरेन यांनी पाच महिने तुरुंगात काढल्यानंतर त्यांच्याबाबत न्यायालयाने नोंदवलेली निरीक्षणे तपासी यंत्रणाच्या तपास पद्धतीवरच प्रश्न उपस्थित करणारी आहेत. महाराष्ट्रातही अजित पवार, रवींद्र वायकर यांच्याविरोधात तपास यंत्रणेने चुकीच्या माहितीवर कारवाई केली, असा पवित्रा घेतला. या यंत्रणांमुळे झालेल्या बदनामीमुळे कोणी न्यायालयात खेचत नाही, हे त्यांचे भाग्य. आंध्र प्रदेशमध्ये चंद्राबाबू नायडू यांनाही असेच तुरुंगात पाठवण्यात आले. ते



के. टी. रामाराव

संपले, असे वाटत असताना दहा वर्षांनंतर का होईना, त्यांचे जोरात राजकीय पुनरागमन झाले. जगातील वेगवेगळ्या देशातील उद्रेक पाहिले, तर तिथेही सत्ताधाऱ्यांनी अतिरेक केल्यामुळे विद्रोहाची लाट आली. जनतेच्या उठावापुढे सत्ताधीशांना नमावे लागले. लोकशाही व्यवस्थेतही सर्वच यंत्रणांना सर्व काळ मॅनेज करता येते, असा काहींचा गैरसमज असेल, तर तो ही जनता कधी ना कधी दूर करतेच.

'मनी लॉँड्रिग'च्या कथित गैरव्यवहारावरून माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचे चिरंजीव के. टी. रामाराव यांच्याविरोधात आता कारवाई सुरू झाली आहे. सुमारे चार महिन्यांपूर्वी त्यांची मुलगी कविता दिल्ली दारू घोटाळ्यात अडकली होती. कविता तिहार तुरुंगातून सुटल्यानंतर आता मुलगा के.टी. रामाराव मोठ्या राजकीय आणि वैयक्तिक संकटाचा सामना करत आहे. तेलंगणातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) केटीआर यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. २०२३ मध्ये हैदराबादमध्ये झालेल्या फॉर्म्युला-ई शर्यतीच्या दुसऱ्या स्पर्धेच्या वेळी केटीआर यांनी लंडनच्या एका कंपनीला ५५ कोटी रुपये हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाबरोबरच अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केटीआरविरुद्ध मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायद्या (पीएमएलए) अंतर्गत माहिती अहवालदेखील दाखल केला आहे. 'हैदराबाद मेट्रोपॉलिटन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी' (एचएमडीए)कडून 'फॉर्म्युला-ई ऑपरेशन्स'मध्ये ५५ कोटी रुपये हस्तांतरित केल्याचा आरोप आहे. त्यासाठी कोणतीही औपचारिक मान्यता घेण्यात आली नव्हती. या आरोपांवर केटीआर यांनी स्पष्टीकरण दिले आहे. यात घोटाळ्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पैसे हस्तांतरित झाल्याचे आणि त्याचा वापर केल्याचे प्राप्तकर्त्याने मान्य केले आहे. त्यामुळे हा गैरव्यवहार होत नाही, तर ती अनियमितता आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. भारत राष्ट्र समिती या पक्षाचे म्हणणे आहे, की मुख्यमंत्री रेवंत रेड्डी या प्रकरणांचा वापर करून त्यांची राजकीय बदनामी करत आहेत.

या प्रकरणी केटीआर यांनी हेही कबूल केले की, मंत्री या नात्याने त्यांनी विशेष मुख्य सचिव अरविंद कुमार (या प्रकरणातील दुसरा आरोपी) यांना पैसे देण्यास सांगितले होते. रेड्डी आणि 'बीआरएस'मधील वैर कोणापासून लपलेले नाही. काँग्रेसची सत्ता आल्यास या कुटुंबाला तुरुंगात पाठवू, असे रेवंत यांनी निवडणूक प्रचारादरम्यान सांगितले होते. २०१५ मध्ये 'कॅश फॉर व्होट' प्रकरणात तुरुंगात घालवलेल्या एका महिन्याबद्दल रेवंत रेड्डी संतापलेले आहेत. ते तेव्हा 'टीडीपी'चे आमदार होते आणि एका अपक्ष आमदाराला पैसे देताना व्हिडीओमध्ये पकडले गेले. हा गुन्हाही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नोंदवला होता आणि आता हाच विभाग केटीआर यांच्या प्रकरणाचा तपास करत आहे. रेड्डी काँग्रेसमध्ये आपले स्थान टिकवण्यासाठी 'बीआरएस'ला कमकुवत करण्याची एकही संधी सोडत नाहीत. केटीआर यांच्या विरोधात लाचलुचपत विभागाला चौकशीचे आदेश देऊन त्यांनी मोठा राजकीय जुगार खेळला आहे. तेलंगणा उच्च न्यायालयाने केटीआर यांच्या अटकेला ३० डिसेंबरपर्यंत स्थगिती दिली आहे; परंतु त्यांना अटक झाल्यास पक्षाला बळ मिळू शकते किंवा कमी होऊ शकते. त्यामुळे 'बीआरएस'चे काही आमदारही पक्ष सोडू शकतात. या संपूर्ण प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर भाजप सक्रिय झाल्याचे दिसत आहे. राज्यपालांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला प्रकरण पुढे चालवण्याची परवानगी दिली.

भाजप आणि काँग्रेस विळ्या-भोपळ्याचे सख्य असताना या प्रकरणात मात्र रेवंत रेड्डी यांनी या प्रकरणी कारवाईसाठी दिल्लीतून भाजपचा पाठिंबा घेतला आहे, असा आरोप 'बीआरएस' करत आहे. आंध्र प्रदेशमधील चंद्राबाबू



के. कविता

नायडू यांच्या अटकेतून रेवंत रेड्डी यांनी धडा घ्यायला पाहिजे. नायडू यांच्या अटकेमुळे त्यांच्याबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण झाली. त्यामुळे ते २०२४ मध्ये सत्तेत परतले. विशेषतः तरुण आणि शहरी भागात केटीआर यांची लोकप्रियता आहे. अशा परिस्थितीत रेवंत यांनी अत्यंत सावधपणे पावले उचलण्याची गरज आहे. तेलंगणामधले राजकारण सध्या गोंधळाचे आहे. आता केटीआर आणि बीआरएस या संकटाचा सामना कसा करतात आणि काँग्रेस हा राजकीय जुगार कसा खेळते हे पाहायचे आहे. दरम्यान, अंमलबजावणी संचालनालया (ईडी) नेही केटी रामाराव, वरिष्ठ आयएएस अरविंद कुमार आणि 'एचएमडीए'चे माजी मुख्य अभियंता बीएलएन रेड्डी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. 'मनी लॉँडरिंग प्रतिबंधक कायदा' (पीएमएलए) आणि परकीय चलन व्यवस्थापन कायदा (फेमा) अंतर्गत 'ईडी'ने गुन्हा दाखल केला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केल्यानंतर अवघ्या २४ तासांमध्ये ही घटना घडली आहे. 'ईडी'च्या सूत्रांनी या प्रकरणाच्या नोंदणीची पुष्टी केली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या यंत्रणा एकाच वेळी कशा सक्रिय झाल्या, याचे कोडे सामान्यांना पडले असले, तरी शत्रूचा शत्रू तो आपला मित्र या नात्याने ही दोन्ही सरकारे एकत्र येऊन यंत्रणांना कामाला लावले असल्याचा संशय आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक ब्यूरोने (एसीबी) केटीआर यांच्याविरुद्ध मागील सरकारच्या काळात हैदराबादमध्ये फॉर्म्युला-ई रेस आयोजित करण्यात अनियमितता केल्याबद्दल फिर्याद दाखल केली होता. तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी अलीकडेच या मुद्द्यावर केटी रामाराव यांच्याविरोधात तक्रार दाखल करण्यास परवानगी दिली होती. रामाराव आणि अन्य दोन अधिकाऱ्यांविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात 'ईडी'चा तपास 'एसीबी'च्या तपासाच्या समांतर चालेल, असे मानले जात आहे. 'आवश्यकता भासल्यास ईडी' रामाराव आणि इतर दोन आरोपींच्या निवासस्थानांची झडती घेऊन छापे टाकू शकते. तीन आरोपींना येत्या काही दिवसांमध्ये हजर राहण्यासाठी 'ईडी' नोटीस बजावू शकते. या शक्यतेमुळे रामाराव आणि त्यांच्या समर्थकांची चिंता वाढली आहे.

इंडियन ओव्हरसीज बँकेत एचएमडीए' (हैदराबाद मेट्रोपॉलिटन डेव्हलपमेंट अथॉरिटी) चे खाते आहे आणि त्या खात्यातून रेस आयोजनाप्रसंगी पैसे ट्रान्सफर करण्यात आले. भारत राष्ट्र समितीचे आमदार केटीआर यांनी राज्यातील काँग्रेस सरकारवर निशाणा साधला आहे. त्यांच्या आरोपांनुसार तेलंगणाच्या जीएसटी संकलनात वर्षभरात एक टक्क्यांहून कमी घट झाली आहे. त्यांच्या मते तेलंगणामध्ये नेहमीच जीएसटी संकलनात किमान १५ टक्के वाढ झाली आहे. तेलंगणा आता उत्तर प्रदेशच्या अर्थव्यवस्थेशी स्पर्धा करत आहे. राज्याने आपल्या विनाशकारी धोरणांमुळे जीएसटी संकलनात शेवटच्या स्थानावर असण्याचा पराक्रम साधला आहे. एकंदरीत, सत्तास्थानी आल्यावर रेवंत रेड्डी सरकार दांडगाई करत विरोधकांवर कारवाई करत आहे. मात्र या कामी अंतिमत: कोणाची बाजू उचलून धरली जाते, हे आता पहायचे.

✦✦✦

**रवीचंद्रन अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी मालिकेदरम्यान अचानक निवृत्तीची घोषणा करून चाहत्यांना धक्का दिला. संघाला गरज उरली नसेल तर निरोप घेतलेला बरा, असा विचार त्याने केला. भारतीय फिरकीचा आधारस्तंभ बनून अश्विनने भारतीय क्रिकेटची मनोभावे सेवा केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली असली तरी एक महान फिरकी गोलंदाज म्हणून अश्विन नेहमीच स्मरणात राहील.**

# अष्टपैलू क्रिकेटपटू

कौतुक
श्रीशा वागळे



फिरकी गोलंदाजी ही एक कला आहे आणि ही कला जपणारा एक उत्तम कलाकार म्हणजे रविचंद्रन अश्विन. अश्विन आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला आहे. ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी मालिका सुरू असताना त्याने तडकाफडकी निवृत्तीची घोषणा केली. त्याच्या निवृत्तीमुळे भारतीय क्रिकेटमधला फिरकीचा एक अध्याय संपला आहे. अश्विनने भारतीय क्रिकेटमध्ये भरीव कामगिरी करून ठेवली आहे. त्याने दिलेले योगदान कोणीही नाकारू शकणार नाही. अश्विनला अन्य खेळाडूंप्रमाणे फारसे वलय लाभले नसले तरी त्याने मैदानावर अगदी चोख कामगिरी बजावली. त्याने कोणत्याही स्टारडमची अपेक्षा ठेवली नाही. तो निरपेक्ष वृत्तीने खेळत राहिला. आपल्या शिरपेचात मानाचे तुरे खोवत राहिला. गोलंदाजीसोबतच फलंदाजीतही योगदान देत राहिला. तसे पहायला गेले तर भारत ही फिरकी गोलंदाजांची भूमी. या मातीने एकापेक्षा एक फिरकी गोलंदाज दिले. बेदी, प्रसन्ना आणि चंद्रशेखर हे भारताचे फिरकी त्रिकूट तर त्यांच्या काळात फलंदाजांना चकवून चारी मुंड्या चीत करायचे. त्यानंतर अनिल कुंबळे भारताचा हुकमी एक्का बनला. त्यानेही एक काळ गाजवला. कुंबळेच्या पावलावर पाऊल टाकत हरभजन सिंग आला. त्यानेही फिरकीच्या तालावर फलंदाजांना नाचवले. मधल्या काळात बरेच फिरकी गोलंदाज भारतीय संघात आले आणि गेले. मात्र रवीचंद्रन अश्विन सगळ्यांमध्ये उजवा ठरला. त्याने भारतीय संघातले स्थान राखलेच, पण वेळोवेळी स्वत:ला सिद्धही केले. प्रसंगी तो संघाबाहेरही बसला. अश्विनने नेहमीच संघहिताला प्राधान्य दिले. कसोटी सामन्यांमध्ये मिळवलेले ५३७ बळी त्याची महानता अधोरेखित करण्यासाठी पुरेसे आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या गोलंदाजांच्या जागतिक यादीत अश्विनचा चौथा क्रमांक लागतो. त्याच्या पुढे फक्त मुथय्या मुरलीधरन, शेन वॉर्न आणि अनिल कुंबळे आहेत.

जगभरात क्रिकेट खेळणारे असंख्य खेळाडू आहेत. त्यापैकी मोजकेच खेळाडू देशांतर्गत क्रिकेट खेळतात आणि यातलेही हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढेच खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचतात. त्यातही दीर्घकाळ एखाद्या संघाचा भाग राहणारे कमीच असतात. अश्विन हा अशा मोजक्या खेळाडूंपैकी एक. आजवर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये गोलंदाजी केलेल्या गोलंदाजांपैकी फक्त नऊजणांनी कसोटी क्रिकेटमध्ये ५०० हून अधिक बळी मिळवले आहेत. त्यापैकी चार जलदगती गोलंदाज आहेत तर फक्त पाच फिरकी गोलंदाज आहेत आणि या यादीत आपला अश्विन अण्णा चौथ्या स्थानी आहे. या आकड्यांवरून अश्विनच्या सातत्यपूर्ण कामगिरीचा अंदाज येतो. अश्विनने या वर्षाच्या सुरुवातीला इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत ५०० बळींचा टप्पा ओलांडला होता. अश्विनची आकडेवारी आपल्याला चकित करून सोडते. कसोटीत सर्वाधिक बळी मिळवणाऱ्या आंतरराष्ट्रीय गोलंदाजांच्या यादीत अश्विन सातव्या स्थानी आहे. २०११ मध्ये कसोटी पदार्पण केल्यानंतर अश्विन थांबला नाही. त्याने मागे वळूनही बघितले नाही. फक्त लोकप्रियतेमुळे नाही तर कामगिरीच्या बळावर त्याने संघातले स्थान टिकवून ठेवले, नव्हे त्याने स्वत:चे स्थान निर्माण केले. कसोटी बळींच्या बाबतीत भारतीय गोलंदाजांमध्ये त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळे आहे. कसोटीसह एकदिवसीय आणि टी-२० क्रिकेट मिळून अश्विनने ७६५ बळी मिळवले आहेत. याबाबतीही त्याच्यापुढे फक्त अनिल कुंबळेच आहे.

अश्विन हा सर्वात कमी कसोटी सामन्यांमध्ये ५०, १००, १५०, २००, २५०, ३००, ३५०, ४००, ४५० आणि ५०० बळी मिळवणारा भारतीय गोलंदाज आहे हे फारसे कोणाला माहीतही नसावे. जसप्रीत बुमराहने ३४ कसोटी सामन्यांमध्ये १५० बळी मिळवण्याची कामगिरी केल्यानंतर त्याचे कोण कौतुक झाले. मात्र अश्विनने ही कामगिरी फक्त २९ सामन्यांमध्ये करून दाखवली आहे. भारताला गोलंदाजीच्या बळावर कसोटीत विजय मिळवून द्यायची अश्विनची टक्केवारीही सरस आहे. अश्विनने फिरकीला साथ देणाऱ्या भारतातीलच नाही तर ऑस्ट्रेलिया, इंग्लंडमधील खेळपट्ट्यांवरही यश मिळवले. त्याने १०६ कसोटींमध्ये ३७ वेळा एका डावात पाच बळी मिळवण्याचा पराक्रम केला आहे. यासोबतच कसोटी सामन्यात दहा बळी मिळवण्याची कामगिरी त्याने आठ वेळा केली आहे. अश्विनचा स्ट्राईकरेट ५०.७ एवढा जबरदस्त आहे. त्याने २६८ वेळा डावखुऱ्या फलंदाजांना बाद केले आहे. दुसऱ्या कोणत्याही गोलंदाजाला अशी कामगिरी करता आलेली नाही. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये एक किंवा दोन नव्हे तर तब्बल दहा वेळा स्पर्धेतल्या सर्वोत्तम खेळाडूचा किताब पटकावला आहे. सचिन तेंडुलकर आणि विरेंद्र सेहवाग यांना प्रत्येकी पाच वेळा हा मान मिळाला असून कपिल देव, अनिल कुंबळे, राहुल द्रविड आणि हरभजन सिंग यांना प्रत्येकी चार वेळा हा किताब मिळाला आहे. विराट कोहलीने अशी कामगिरी तीन वेळा केली असून रोहित शर्मा आणि रवींद्र जडेजा यांना एकदाही हा किताब मिळालेला नाही.

अश्विनने कसोटी पदार्पणातच कमाल केली होती. त्याने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्यावाहिल्या कसोटी मालिकेत २२ बळी टिपले होते. तेव्हाच तो भारतीय क्रिकेटचे फिरकीचे भवितव्य असल्याचे निश्चित झाले होते. अनिल कुंबळेनंतर कोण, या प्रश्नाचे उत्तर अश्विनने आपल्या कामगिरीने देऊन टाकले होते. त्यानंतरच्या काळात अश्विनने भारतीय फिरकीची जबाबदारी समर्थपणे सांभाळली. त्याने वेळोवेळी आपल्या गोलंदाजीच्या शैलीत तांत्रिक बदल केले. एका कसोटी मालिकेत पंचवीसहून अधिक बळी घेण्याची कामगिरी अश्विनने २५ वेळा केली आहे. अश्विनने कसोटीत पदार्पण केल्यानंतर म्हणजे २०११ नंतर भारतीय संघाने भारतात खेळलेल्या ६५ कसोटी सामन्यांमध्ये तो खेळला. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये मिळवलेल्या ५३७ बळींपैकी ३८३ घरच्या मैदानात मिळवले आहेत. या बाबतीत अश्विनच्या पुढे फक्त मुरलीधरन, जेम्स अँडरसन आणि स्टुअर्ट ब्रॉड आहेत. अश्विनने गोलंदाजीसोबतच फलंदाजीतही चमक दाखवली आहे. त्याच्या नावे कसोटी क्रिकेटमध्ये पाच शतके आहेत. त्याने शिखर धवन, रिषभ पंत आणि वसिम जाफर यांच्यापेक्षा अधिक कसोटी अर्धशतके ठोकली आहेत. फलंदाजीच्या बळावरही अश्विनने अनेक कसोटी सामने जिंकून दिले आहेत किंवा अनिर्णित राखले आहेत. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये ३५०३ धावा केल्या आहेत. ३००० हून अधिक धावा आणि ५०० हून अधिक बळी मिळवणाऱ्या क्रिकेटपटूंच्या यादीत तो तिसरा आहे. त्याच्या पुढे फक्त शेन वॉर्न आणि स्टुअर्ट ब्रॉड आहेत.

अश्विन हा विचारी आणि हुशार क्रिकेटपटू. इंजिनिअर असल्यामुळे त्याने नेहमीच इंजिनिअरींगचे कौशल्य क्रिकेटमध्ये वापरले. त्याच्यात कर्णधार होण्याची क्षमता होती. मात्र नशिबाने त्याला नेहमीच हुलकावणी दिली. भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधारपदाचा मुकुट काही त्यांच्या शिरावर सजला नाही. कोणत्याही वलयाची, मानसन्मानाची अपेक्षा न करता अश्विन आपली कामगिरी बजावत राहिला. कारकिर्दीच्या अखेरीस न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानात झालेल्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत अश्विनला फारसे यश मिळू शकले नाही. त्यातच वयाच्या ३८ व्या वर्षी सतावणाऱ्या गुडघ्याच्या दुखापतीमुळेही त्याला भवितव्याबाबत अनिश्चिता वाटत होती. त्यातच सध्याच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यातल्या तीन कसोटींपैकी एकाच कसोटीत अश्विनला संघात स्थान मिळाले. अन्य दोन कसोटींमध्ये अश्विनला बाहेर बसावे लागले. संघ व्यवस्थापनाने अश्विनच्या जागी रविंद्र जडेजा किंवा वॉशिंग्टन सुंदरला प्राधान्य दिले. गेली जवळपास १३ वर्षे भारतासाठी खेळताना कसोटीत ५३७ बळी मिळवल्यानंतर बाहेरच्या बाकांवर बसणे अश्विनला फारसे रूचले नसावे. युवा खेळाडूंना प्राधान्य दिले जात असल्यामुळे आंतरराष्ट्रीय क्रिकेटला रामराम ठोकण्याची हीच वेळ आहे, याची जाणीव अश्विनला झाली असावी. अश्विनने आजवर मानापमानचा फारसा विचार केला नाही. मात्र आजवरची देदीप्यमान कामगिरी झाकोळली जाऊ नये यासाठी त्याने निवृत्तीचा निर्णय घेतला असावा.

अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका होईपर्यंत निवृत्ती जाहीर करायला नको होती, असे काही जाणकारांचे म्हणणे आहे. मात्र जे मनापासून वाटले ते त्याने केले, असेच म्हणावे लागेल. अश्विनसारखा अनुभवी फिरकीपटू निवृत्त झाल्यामुळे किमान कसोटीत तरी भारताच्या फिरकीची जबाबदारी जडेजा आणि अन्य युवा फिरकीपटूंच्या हाती असेल. अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला असला तरी आयपीएलमध्ये खेळणार आहे. त्यामुळे तिथे त्याच्या फिरकीची जादू अनुभवता येईल. मात्र भारतीय संघाला त्याची उणीव पुढचा काही काळ तरी निश्चितच भासत राहील.


---


**ज्या साहित्य अकादमीत काम केलं, त्याच अकादमीनं प्रा. डॉ. सुधीर रसाळ यांच्या ''विंदांचे गद्यरूप'' या समीक्षात्मक ग्रंथाला यंदाचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. एका ज्ञानपीठ विजेच्या कवीवर लिहिलेल्या समीक्षणात्मक ग्रंथाला पुरस्कार मिळावा, यासारखा दुसरा चांगला योगायोग नाही. कोकणी साहित्यातील योगदानाबद्दल मुकेश थळी यांनाही पुरस्कार जाहीर झाला आहे. दोघांच्या या सन्मानानं मराठी आणि कोकणी भाषेच्या शिरात मानाचा तुरा रोवला गेला आहे.**

# विचक्षण लेखकाचा सन्मान

कौतुक
डॉ. संजय कळमकर


मुकेश थळी





प्रा. डॉ. सुधीर रसाळ

विचक्षण लेखक आणि वाचनमग्न समीक्षक म्हणून साहित्य क्षेत्रात स्वत:ची नाममुद्रा असलेले डॉ. सुधीर रसाळ ९१ व्या वर्षात देखील त्याच उत्साहाने साहित्य सेवा करत आहेत. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख तसेच प्राध्यापक म्हणून ख्यातकीर्त आहेत. शतकी वाटचालीकडं निघालेल्या रसाळ सरांच्या 'नव्या वाटा शोधणारे कवी' या १६ व्या पुस्तकाचं नुकतंच प्रकाशन झालं आहे. त्यांनी संपादित केलेली तीन पुस्तकंदेखील प्रकाशित आहेत. त्यांना आतापर्यंत २८ नामवंत पुरस्कारांनी गौरविण्यात आलं आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'पीपल्स एज्युकेशन सोसायटीज कॉलेज'चे अर्थात मिलिंद महाविद्यालयाच्या पहिल्या फळीचे ते विद्यार्थी होते. अध्ययनानंतर छत्रपती संभाजीनगरच्याच शासकीय ज्ञानविज्ञान महाविद्यालयात तीन वर्षे अधिव्याख्यातापदावर त्यांनी अध्यापन कार्य केलं. १९५९ मध्ये मराठवाडा विद्यापीठात मराठी विभाग सुरू झाला, तेव्हा पहिल्याच वर्षी सुप्रसिद्ध समीक्षक वा.ल. कुलकर्णी व डॉ. यु.म. पठाण यांच्यासमवेत त्या विभागात रसाळ हे अधिव्याख्याता म्हणून रुजू झाले.त्यानंतर निवृत्त होईपर्यंत ऑगस्ट १९९४ पर्यंत याच विभागात अधिव्याख्याता- प्रपाठक- प्राध्यापक अशा पदांवर ३४ वर्षे ते कार्यरत होते. वा.ल. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली 'काव्यातील प्रतिमासृष्टी: मराठी काव्याच्या संदर्भात' या विषयावर त्यांनी पीएच.डी.साठी संशोधन केलं. या पीएच.डी.प्राप्त प्रबंधाचं संस्कारित रूप म्हणजे 'कविता आणि प्रतिमा' हा गाजलेला काव्यविषयक मीमांसा-ग्रंथ. जून १९८२ मध्ये हा ग्रंथ प्रकाशित झाला. 'प्रतिमा' ही संकल्पना आणि तिचं काव्यातील महत्त्व व कार्य यांची सांगोपांग मांडणी करणारा असा ग्रंथ मराठीत दुसरा नाही. भारतीय आणि पाश्चात्त्य मतांतरांचा परामर्श घेत, अनेक गुंतागुंतींची उकल करीत, कठीण विषय सुगम पद्धतीनं समजावून सांगण्याची रसाळ यांची समीक्षाशैली या ग्रंथरूपानं आदर्श म्हणून स्थापित झाली. याशिवाय त्यांचे 'काही मराठी कवी: जाणिवा आणि शैली' (१९८४) हे काव्यसमीक्षेचं पुस्तक प्रसिद्ध आहे. प्रमुख संपादित ग्रंथांमध्ये 'साहित्य: अध्यापन आणि प्रकार' (वा.ल. कुलकर्णी गौरव ग्रंथ, सहकार्याने संपादन, १९८७), 'गंगाधर गाडगीळ: निवडक समीक्षा' (१९९६), 'दासोपंत: गीतार्णव' (मराठवाडा विद्यापीठ) यांशिवाय जवळजवळ दीडशेवर समीक्षालेख विविध वाययीन नियतकालिकांतून व काही संपादित ग्रंथांतून प्रसिद्ध आहेत. बहुतेक प्रमुख व गाजलेल्या चर्चासत्रांतून त्यांनी महत्त्वपूर्ण वाययीन विषयांवर निबंधलेखन केलं आहे. विविध ललित साहित्यकृतींच्या समीक्षणांप्रमाणंच मराठी भाषेची सद्यःस्थिती, मराठी साहित्याचे अध्यापन, वाचनसंस्कृती, मराठीच्या पीछेहाटीची कारणमीमांसा इत्यादी विषयांवर त्यांनी महाराष्ट्रभरातील विविध व्यासपीठांवरून मौलिक चिंतन मांडलं आहे. डॉ. रसाळ यांनी दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व केलं आहे. १९५६ पासून ते मराठी वाययाची समीक्षा करताना साहित्यविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे.

९१ वर्षीय सुधीर रसाळ म्हणजे मराठीतील अग्रगण्य समीक्षक. हजारो प्रतिभावान विद्यार्थी घडवणारे मराठी भाषेचे शिक्षक. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागाचे प्रमुख तसेच प्राध्यापक म्हणून त्यांची प्रदीर्घ कारकीर्द संस्मरणीय आहे. ते अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे अध्यक्ष होते. मराठवाडा साहित्य परिषद, विश्वकोश निर्मिती मंडळ, साहित्य अकादमी अशा विविध संस्थांवर त्यांनी काम केलं. त्यांचा 'कविता आणि प्रतिमा' हा काव्यविषयक मीमांसा ग्रंथ गाजला. राज्य शासनाचा मराठी भाषा अभ्यासक पुरस्कार त्यांना मिळाला आहे. मराठीमध्ये वाङ्मयाच्या सैध्दांतिक समीक्षेचा अभाव आहे. वाङ्मयविषयक सर्व जटिल प्रश्नांची समर्पक उत्तरं देणाऱ्या आणि वाङ्मयकृतीच्या अस्तित्वाचा आनि तिच्या मूल्यमापनासंबंधीचे योग्य निकष देणाऱ्या भूमिकेचा नव्यानं शोध घ्यावा, ही प्रेरणा मराठी समीक्षेत दिसून येत नाही. दीडशे वर्षांच्या मराठी समीक्षेच्या इतिहासात असे दोनच प्रयत्न झाले. बा.सी. मर्ढेकरांनी सर्व ललित कलांच्या आंतररचनेसंबंधीचा आपला लयसिद्धांत मांडला. त्यानंतर लगेचच विंदा करंदीकरांनी सर्व ललित कलांमधून वाङ्मयकला बाजूला काढणारा आणि वाङ्मयकलेचं वेगळे स्वरूप अधोरेखित करणारा जीवनवेधी कलेचा सिद्धांत मांडला. मराठीत जशी मर्ढेकरांच्या लयसिद्धांताची दखल घेतली गेली, तशी करंदीकरंच्या जीवनवेधी कलेच्या सिध्दांताची घेतली गेली नाही. किंबहुना त्यांच्या वाङ्मयविषयक सैद्धांतिक भूमिकेची उपेक्षाच झाली. खरं म्हणजे करंदीकर यांनी केवळ जीवनवेधी कलेचा सिद्धांतच मांडला नाही, तर त्यांनी हा सिद्धांत केंद्रस्थानी ठेवून समग्र काव्यशास्त्रच उभं केलं. शिकवण्यासोबत रसाळ सर रमले, ते समीक्षा आणि साहित्य संस्थात्मक कामात. मराठवाडा साहित्य परिषद, अखिल भारतीय महामंडळ, साहित्य संमेलनात ते वावरले. अनंतराव भालेराव, भगवंतराव देशमुख, पाध्ये, नानासाहेब चपळगावकर यांच्यात ते रमले. मराठी साहित्य प्रांतीचा १९६० नंतरच्या पडद्याआडही घडलेल्या घटनांचा बिनचूक संदर्भ म्हणजे सुधीर रसाळ आहेत. नव्वदीतही रसाळ ते व्यासंगमग्न आहेत. सकाळी साडेआठ ते साडेबारा, दुपारी दोन ते साडेचार आणि संध्याकाळी साडेसहा ते रात्री साडेआठ ही त्यांची साधारणपणे दररोजची लेखनाची वेळ असते. लेखन म्हणजे टाईप करणं. रसाळ सर संगणकावर लेखन करण्याची कला वयाच्या साठीत शिकले. त्यांची कॉपी एकदम नेटकी. मुद्रणासाठी अंतिम कॉपी कशी बिनचूक असावी, याचा आदर्श म्हणजे रसाळ सरांची कॉपी. लेखनासोबत वाचनही सुरू असतंच. ते अतिशय परखड. आपल्या बोलण्यानं, समीक्षेनं कुणी दुखावलं जातं, म्हणून बोलायचंच नाही, समीक्षा करायचीच नाही का, असं ते थेट विचारतात.

डोंबिवलीतील एक दिवशीय साहित्य संमेलनात त्यांनी केलेलं भाषण असंच लक्षवेधी आणि मर्मभेदी होतं. समीक्षा या प्रकाराकडं लक्ष दिलं जात नाही. साहित्याच्या झाडावर बांडगूळ उगवतं, त्या दृष्टीनं समीक्षकाकडं लेखक पाहतात. मराठी साहित्य वाचलं जात नसल्याने साहित्याची समीक्षा कोण वाचणार, असा प्रश्न आहे. मराठी साहित्यात समीक्षकांची वानवा आहे. मराठी साहित्याची समीक्षा ही पाश्चात्यांच्या समीक्षेवर अवलंबून राहिली आहे. आपल्या समीक्षकांनी परंपरेशी जोडून घेऊन ती केलेली नाही. मध्ययुगीन समीक्षक नवं लिहिणाऱ्याचं काही वाचत नाहीत. नवं लिहिणारे मध्ययुगीन साहित्याच्या भानगडीत पडत नाहीत. त्यामुळं दोन्ही प्रकारच्या साहित्याची समीक्षा योग्य प्रकारे झालेली नाही, असं मत व्यक्त करताना आपल्याकडं दीडशे वर्षांच्या कार्यकाळात मराठीतील एकही ग्रंथ अन्य भाषेत भाषांतरित झालेला नाही, याकडं त्यांनी लक्ष वेधलं. 'आपला समाज आधुनिक कधी होणार' ?नंदी दूध पितो अशी बातमी आज वर्तमानपत्रांतून वाचली. अशा प्रकारची बातमी देणं हेच मुळात चुकीचं आहे. नंदी दूध पितो यावर श्रद्धा ठेवणं म्हणजे अंधश्रद्धा आहे. एकवेळ परमेश्वरावर विश्वास ठेवण्याच्या पातळीवर श्रद्धा असणं हे असू शकतं, असं त्यांनी खडसावलं होतं. एक विचार करणारा नागरिक म्हणून अशा प्रकारच्या बातम्या देणं आणि त्यावर विश्वास ठेवणं या सगळ्यांमधून आपला समाज अजून किती बदलण्याची गरज आहे हे कळतं. आपल्या समाजाचे आधुनिकीकरण कधी होणार असा सवाल करीत जेव्हा विचारवंताचा मोठा वर्ग सतत अनेक सामाजिक प्रश्नांवर विचार मांडत राहील तेव्हा या गोष्टी दूर होतील, असं त्यांनी सांगितलं होतं.

मुकेश थळी यांनी पणजी आकाशवाणी केंद्रावरून वृत्तनिवेदक म्हणून ३० वर्षे सेवा दिली आहे. गेल्यावर्षी ते निवृत्त झाले. कोकणी, मराठी, इंग्रजी भाषेत ते सातत्यानं स्तंभलेखन करतात. 'वळेसर', 'हंसध्वनी', 'अक्षरब्रह्म', 'जीवनगंध', 'रंगतरंग' हे त्यांचे निबंधसंग्रह प्रकाशित झाले आहेत. 'दोरेमीफा', 'सारेनीसा' या पुस्तकांना कला अकादमी कोकणी नाट्य स्पर्धेत लेखनाचे प्रथम बक्षीस मिळालं होतं. ते कोकणी-इंग्रजी शब्दकोशाचे सहरचनाकार असून गोवा विद्यापीठाच्या कोकणी विश्वकोश विभागात संशोधन साहाय्यक म्हणून त्यांनी सहा वर्षे सेवा दिली आहे. त्यांनी कथा, कविता, एकांकिका, असंख्य गीत व नाटकांचं लेखन केलं आहे. सूत्रसंचालक आणि मुलाखतकार म्हणून त्यांची खास ओळख आहे. साहित्य आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात थळी यांचा अनेक पुरस्कारांनी सन्मान करण्यात आला आहे. 'रंगतरंग' पुस्तकात २० ललित निबंध आहेत. थळी हे बहुभाषी साहित्यिक, अनुवादक आहेत. त्यांना गणित आणि शास्त्रीय संगीत या विषयांत रूची आहे. ते गोवा विद्याप्रसारक मंडळाच्या शाळांत शालेय स्तरावर गणिताचं अध्यापन करत. गोवा विद्यापीठाच्या कोंकणी विश्वकोश विभागात संशोधन सहायक, आकाशवाणी पणजी केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागात वृत्तनिवेदक आणि भाषांतरकार म्हणून त्यांनी काम केलं. त्यांचे कोकणी भाषेत चार ललित लेख संग्रह आणि एक नाटक प्रकाशित आहे. कोकणी-इंग्रजी शब्दकोशाकरता सहसंपादक, कोकणी कथांचे इंग्रजी अनुवाद जे साहित्य अकादमी व फ्रंटलाईन अशा राष्ट्रीय स्तरावरच्या नियतकालिकांत प्रसिद्ध आहेत. कथा, कविता, गीतं आणि नाटकांचं लेखन तसंच कोकणी, इंग्रजी, मराठी नियतकालिकांसाठी स्तंभलेखक, सूत्रसंचालक, मुलाखतकार म्हणून काम केले आहे. थळी यांना त्यांच्या 'रंगतरंग' या कोकणी पुस्तकासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

# स्वातंत्र्य संपू लागलं की संस्कृती रसातळाला जाते

लेखक असो, चित्रकार असो, गायक असो; कुठल्याही कलावंताला निर्मिती करू द्यायची असेल, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य असावं लागतं. तो समाजाच्या विरोधात असला, तरी त्याला व्यक्त होता आलं पाहिजे. तरच श्रेष्ठ दर्जाचं वाङ्मय आणि कला निर्माण होईल. स्वातंत्र्य नष्ट व्हायला लागलं की संस्कृती रसातळाला जाते. आपण केवळ पशू म्हणून जगू लागतो... असे मत मांडले आहे ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी. नुकताच त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला.

-------------------

सुधीर रसाळ यांच्या विंदांचे गद्यरूप पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला . रसाळ सर म्हणाले, निझामी राजवटीत वाढलो. तेव्हाचा हैदराबाद प्रदेश. निझामाला प्रांताची भाषा उर्दू करायची होती. सगळं शिक्षण उर्दूत. त्यानं इथल्या मराठी, कन्नड, तेलगू भाषांची गळचेपी सुरू केलेली. तेव्हाच्या औरंगाबादहून नगर, नाशिकला जायचंही अतिशय कष्टाचं काम. औरंगाबादहून मनमाडपर्यंत मीटरगेज. पश्चिम महाराष्ट्रामध्ये ब्रॉडगेज. त्यामुळं इकडून तिकडं जाणं दिव्यच. बरं औरंगाबादहून पुण्याला जायचं, तर मध्ये गोदावरीवर पूल नाही. छोट्या-छोट्या नावेत बसून पलीकडं जावं लागायचं. शक्यतो पश्चिम महाराष्ट्राचा मराठवाड्याशी संबंध येऊ नये याची एक तरतूद निझामानं केलेली.

इथं ग्रंथालयं स्थापन झालेली नव्हती. बाहेरून पुस्तकं येऊ दिली जात नसत. आलेली पुस्तकं सेन्सॉर केली जायची. हरी नारायण आपटे यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांना बंदी होती. कारण त्यात इस्लामविरुद्ध भूमिका घेतली, असं त्याचं म्हणणं. मराठी वर्तमानपत्र नव्हतं. मराठीत पुस्तकं छापली जात नव्हती. मराठी प्रकाशन संस्था नव्हत्या. असं सगळं मध्ययुगीन वातावरण. तरीही इथं लेखक निर्माण होतं. तरुण कथाकार सुंदर हस्ताक्षरात कथा लिहून काढी. त्याचे बाइंडिंग करून हेच आपलं पुस्तक म्हणे.

औरंगाबादला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आलेले. ते धावणी मोहल्ला भागात उतरलेले. त्यांच्या नावानं ग्रंथालय स्थापन करायचं ठरलं. मात्र, निझामानं टिळक नावाला परवानगी नाकारली. मग इथल्या लोकांनी टिळक नाही, तर त्यांचं मूळ नाव लावू असं ठरवलं आणि बळवंत मोफत वाचनालय सुरू झालं.

मराठवाड्यातल्या जनतेनं खचून जावू नये म्हणून कर्त्या लोकांनी जागोजाग कुस्तींच्या तालमी सुरू केल्या. ग्रंथालंय स्थापन केली. त्यातून लोकांच्या मनात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. स्टेट कॉंग्रेस सुरू झाली. मात्र, तिच्यावरही बंदी आली. तेव्हा लोकांनी राजकीय हेतूनं मराठवाडा साहित्य परिषद स्थापन केली. तिच्यामार्फत मराठी भाषेची सेवा सुरू झाली. इथल्या लोकांनी वेगवेगळ्या मार्गांनी आपली भाषा, संस्कृती टिकवायचा प्रयत्न केला. या वातावरणात आम्ही वाढलो. तशात आत साहित्याचं बीज रुजलं.

सुधीर रसाळ यांचं 'कविता आणि प्रतिमा' हे मराठी समीक्षेच्या इतिहासात कवितेची सैद्धांतिक मांडणी करणारं पहिलंच पुस्तक. आजही ते एकमेव. या पुस्तकाच्या निर्मितीची गोष्ट खूप मजेशीर. त्याबद्दल रसाळ सर म्हणाले, एम. ए. झाल्यावर तीनेक वर्ष गव्हर्मेंट कॉलेज आणि नंतर विद्यापीठात मराठीचा प्राध्यापक म्हणून चिकटलो. आमचे गुरू म. भि. चिटणीस. मिलिंद कॉलेजचे प्राचार्य. त्यांनी मला बोलावलं. म्हणाले, तू कवितेवर पीएच.डी. कर. 'प्रतिभा' हा विषय घे. म्हटलं ठीक आहे. कविता वाचलेली होतीच. त्यामुळं कवितेकडं वळालो. 1950 ते 1970 या काळातील मराठी कवितांच्या प्रतिमा, त्यावर मला संशोधन करायचं होतं.

अभ्यास सुरू केला. तेव्हा असं लक्षात आलं की, मराठी समीक्षेत प्रतिमा कशाला म्हणायचं हे काहीच लिहिलेलं नाही. प्रतिमा कशाला म्हणायचं, कविता आणि प्रतिमा यांचं नातं काय, याबद्दल जोपर्यंत समजावून दिलं जात नाही, तोपर्यंत या कवितेतल्या प्रतिमेचं विवेचन करता येणं शक्य नव्हतं. जर तसं न करता काही विवेचन केलं, तर ते वाचकांना कळालं नसतं. त्यामुळं सहा महिन्यांनी माझे मार्गदर्शक आणि विभागप्रमुख वा. ल. कुलकर्णी यांच्याकडे गेलो. त्यांना म्हणालो, मला 'कविता आणि प्रतिमा' असा विषय बदलून द्या. मात्र, ते म्हणाले असे सैद्धांतिक विवेचन करणं फार अवघड गोष्टय. तू करशील याची खात्री मला वाटत नाही. मी ठाम होतो.

आपल्याला पीएच.डी. नाही मिळाली तरी चालेल, पण असंच काम करायचा हट्ट धरला. त्यासाठी जवळपास आठ वर्ष केवळ इंग्रजी वाचन केलं. नोट्स काढल्या. सगळे हसायचे. अरे एक-दोन वर्षात पीएच.डी. होते. सहा वर्ष तुझं कामच होत नाही म्हणायचे.

व्हाइस चान्सलरांनी दोनदा बोलावून तंबी दिली. तरीही वाचन पूर्ण होईपर्यंत मी याकडं लक्ष दिलं नाही. आपण लवकर काम नाही केलं, तर पीएच.डी. रद्द करतील. तसं झालं तर त्याचं पुस्तक करू, असा निर्धार केला. वा. ल. कुलकर्णी सुद्धा माझ्यावर वैतागून गेलेले. ते म्हणाले, पहिली टर्म जून ते ऑक्टोबर दरम्यान तू प्रबंध लिहायचं काम कर. एकही वर्ग घेऊ नको. तुझे सगळे वर्ग मी घेईन. दुसऱ्या टर्ममध्ये तू माझे वर्ग घे. त्याप्रमाणे ते वर्ग घेऊ लागले.

मी विद्यापीठात बसून सकाळपासून संध्याकाळपर्यंत लेखनाचं काम केलं. तीन महिन्यात लिहून झालं. टाइप झालं. प्रबंध सादर झाला. रा. भा. पाटणकर, मेघश्याम पुंडलिक रेगे हे माझे परीक्षक. या दोघांनी तीन तास मौखिक परीक्षा घेतली. मी खरंच वाचलंय का, की कुठून तरी तळटीपा दिल्यात हे पाहिलं. त्यानंतर हा प्रबंध चांगला असून यांना पीएच.डी. द्यावी, असा रिपोर्ट दिला.

याच परीक्षकांनी मोठे समीक्षक प्रभाकर पाध्ये यांना हा प्रबंध खूप उत्तम असल्याचं सांगितलं. त्यामुळे पाध्येंनी मला पत्र पाठवून प्रबंध वाचायला मागितला. त्यांनाही आवडला. त्यांनी कौतुकाच पत्र लिहून कळवलं,

तुमचा हा प्रबंध मी मौजकडे श्री. पु. भागवतांकडे दिलाय. त्यांना वाचायची उत्सुकताय. श्री. पु. भागवतांनी मला मुंबईत बोलावून पुन्हा प्रबंध वाचला. चर्चा केली. अन् 1982 मध्ये कविता आणि प्रतिमा हे पुस्तक प्रसिद्ध झालं. श्री. पु. भागवतांनी या पुस्तकाचं महत्त्व ओळखलेलं. त्यामुळं त्या मोठ्या संपादकानं माझं सर्व लेखन मौज छापेल, असं सांगितलं.

रसाळ सर पुढे सांगतात, मी मराठीचा शिक्षक. शिकवायचं म्हणजे साहित्यकृतीचं विश्लेषण करून तिचं स्वरूप काय, हे समजावावं लागतं. यासाठी तुमची समीक्षा पक्कीच पाहिजे. चांगला शिक्षक व्हायचं असेल, तर मुळात तो चांगला समीक्षक असावा लागतो. मी शिक्षक असल्यामुळं समीक्षेकडं वळलो. वेगवेगळ्या प्रकारच्या सर्व समीक्षा मराठीत आणल्या. सेवानिवृत्त होण्यापूर्वी दोनच पुस्तकं आलेली. पहिलं कविता आणि प्रतिमा, दुसरं काही मराठी कवी, जाणीवा आणि शैली. त्यानंतर इतर सारी पुस्तकं आली.

मर्ढेकर, विंदा करंदीकर, पु. शि. रेगे ते नवकवितेचा प्रारंभ, नवकविता नाकारणारं बंड इथपर्यंतचा कवितेचा सगळा काळ ग्रंथरूपानं सिद्ध केला. पण मला खरा रस नाट्यवाङ्मयात. मी कवितेकडे केवळ अपघाताने वळलो. मग नाटकावर लिहायचं ठरवलं.

मराठीतला मोठा नाटककार महेश एलकुंचवार. त्यांच्यावर प्रदीर्घ लेख लिहिला. शेक्सपिअरच्या किंग लिअर या महान शोकांतिकेचं अतिशय उत्तम भाषांतर विंदांनी केलंय. म्हणलं याचं आपण मूल्यमापन करू. यावर शंभर पानांचा लेख लिहिला. काही नाटकांवर चार-पाच लेख लिहिलेले. या साऱ्यांचं एक पुस्तक झालं.



> पाश्चात्य कादंबऱ्या, त्यांच्या भूमिकांचं आक्रमण मराठी कादंबरी आणि एकूणच वाङ्मयावर झालंय. तिकडं एलिनियशन, डी. ह्युमनायझेशनचा मुद्दा कादंबरीतून मांडला जातोय. तिथं यांत्रिक संस्कृती मोठ्या प्रमाणातय. आपली सगळी परिस्थितीच वेगळीय. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीमध्ये जे निर्माण झालं, ते घेऊन आपण कशाला लिहायचं? आपण आपल्या जगाकडं बघावं. आपले प्रश्न विचारात घ्यावेत. त्यातून आपलं वाड्मय निर्माण करावं. पण आमचे कादंबरीकार तिकडचे विचार घेतात आणि कादंबरीत मांडतायत.
>
> **– सुधीर रसाळ**
>
> **ज्येष्ठ समीक्षक, साहित्य अकादमी पुरस्काराचे मानकरी**

रसाळ सरांनी नव्वदीपार केली. या वयातही त्यांचं लिखाण सुरू आहे. त्यांचं कादंबरीवरचं एक पुस्तक एक-दोन महिन्यात मौजेकडून येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. रसाळ सर म्हणाले, 'सांस्कृतिक आक्रमण आणि मराठी कादंबरी' असं या पुस्तकाचं नावय. पाश्चात्य कादंबऱ्या, त्यांच्या भूमिकांचं आक्रमण मराठी कादंबरी आणि एकूणच वाङ्मयावर झाल आहे.

तिकडं 'एलिनियशन'चा मुद्दा कादंबरीतून मांडला जातोय. या पृथ्वीवर असूनही आपलं आणि पृथ्वीचं काही नातंच नाही. आपण इथे परके आहोत. झाडाची मुळं पूर्ण जमिनीत पसरलेली असतात. हे झाडं जमिनीचं आहे, पण आम्ही जमिनीच्या वर नांदणारी माणसं. आमचं जमिनीशी काही नातंच नाही, अशी एक चमत्कारीक भावना कादंबऱ्यांतून मांडली जावू लागलीय. आधुनिक संस्कृतीनं माणसाला यंत्र बनवलंय. त्याला ते 'डी. ह्युमनायझेशन' म्हणतात. तेव्हा आपलं डी. ह्युमनायझेशन विज्ञानानं केलं आहे.

सगळीकडे यंत्र, यंत्र, यंत्र. माझ्या हातांना काम करायला वावच ठेवलेला नाही. निसर्गानं मला हात दिले. हातातून मी निर्मिती केली पाहिजे. मी कुदळ घेऊन जमीन खोदली पाहिजे. मी बी पेरलं पाहिजे. मी त्याला पाणी घातलं पाहिजे. मी झाड उगवलं पाहिजे. ही माझी निर्मितीय. ट्रॅक्टरनं जमीन नांगरली. दुसऱ्या यंत्रानं बी शेतामध्ये टाकलं. तिसऱ्या यंत्रानं शेतामध्ये पाणी दिलं. चौथ्या यंत्रानं तयार झालेलं पीक कापून घेतलं. मग मी कशासाठी? मला या जगात काय काम? माझं तुम्ही 'अमानवीकरण' करता. माणसाचा जो निसर्गय. स्वतः निर्मिती करायची. आपलं अन्न आपण निर्माण करायचं. आपली वस्त्र आपण निर्माण करायची. हे आम्हाला करताच येत नाही. त्यामुळं या जगात आमचं जगणं अर्थविहीन झालंय. हे पाश्चातीकरण.

तिथं यांत्रिक संस्कृती मोठ्या प्रमाणात. आपल्याकडं अजून शहरात वॉशिंग मशीन्स नाहीत. आपली सगळी परिस्थितीच वेगळीय. त्यामुळे त्यांच्या संस्कृतीमध्ये जे निर्माण झालं, ते घेऊन आपण कशाला लिहायचं? आपण आपल्या जगाकडं बघावं. आपले प्रश्न विचारात घ्यावेत. त्यातून आपलं वाङ्मय निर्माण करावं. पण आमचे कादंबरीकार तिकडचे विचार घेतात आणि कादंबरीत मांडतात. हे आक्रमण मराठी कादंबरीमध्ये कसं आलं? ते घेऊन काही कादंबऱ्या निवडल्या. त्यावरचं हे पुस्तक येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

सध्याचं सरकार व्यक्तिस्वातंत्र्य, राज्यघटनेवर आक्रमण करते आहे, असा आरोप अनेक लेखक-कवी करतायत? तुम्ही याकडे कसे पाहता? यावर रसाळ सर म्हणाले, लेखक असो, चित्रकार असो, गायक असो. कुठल्याही कलावंताला निर्मिती करू द्यायची असेल, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य असलंच पाहिजे. कलावंताला जे निर्माण करावंसं वाटतं, ते निर्माण करण्याचं स्वातंत्र्य म्हणजे अभिव्यक्ती स्वातंत्र्य. जे आपल्या मनात निर्माण होतं, ते व्यक्त करण्याचं स्वातंत्र्य.

विचारवंताला विचार मांडता आला पाहिजेत. तो समाजाच्या विरोधात असला, तरी त्याला व्यक्त होता आलं पाहिजे. विचार स्वातंत्र्य ही सांस्कृतिक विकासासाठी आवश्यक गोष्ट आहे. म्हणजे तुमच्या संस्कृतीमध्ये संपन्न विचार निर्माण होतात. तुमच्या संस्कृतीमध्ये श्रेष्ठ दर्जाचे वाङ्मय आणि कला निर्माण होतात. आणि तुमची संस्कृती सांस्कृतिक पातळीवर मोठी बनते.

तुमच्या जगण्याच्या पद्धती, तुमची मूल्यव्यवस्था यात बदल करण्याचा तुम्हाला अधिकार पाहिजे. जर सत्ता म्हणू लागली या जातीमधल्या युवकानं या जातीतल्या मुलीशी लग्न करायचं नाही. या धर्माच्या मुलानं या धर्माच्या मुलीशी लग्न करायचं नाही. कायद्यानं बंदी. तर हा बदल होणारच नाही. समाज आहे तसा स्थिर राहील.

बदल हा जीवनावश्यक आहे. कारण जीवनात नवे-नवे प्रश्न निर्माण होतात. आणि त्याला तोंड देण्यासाठी बदल हे करावे लागतात. आपल्या संस्कृतीमध्ये त्यासाठी आपदधर्म नावाचा शब्द आहे. उदाहरणार्थ मी मांसाहारी नाही. परंतु अशी परिस्थिती निर्माण झाली की मला जगायचं असेल, तर मांसाहार केलाच पाहिजे. तर करायला परवानगी आहे. त्याला आपदधर्म असं म्हणतात.

तेव्हा बदल ही एक आवश्यक अशी गोष्ट आहे. हा बदल करण्याचं स्वातंत्र्य पाहिजे. याला आचार स्वातंत्र्य असं मी म्हणतो. वागण्याचं स्वातंत्र्य, व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य, कृती करण्याचं स्वातंत्र्य. हे समाजामध्ये प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. ज्या देशांमध्ये लेखकांच्या लेखनावर अनेक बंधनं टाकली. तिथलं वाङ्मय पार नष्ट झालं. याचं उत्कृष्ट उदाहरण रशिया आहे.

रशिया हा देश कादंबरी वाङ्मयाच्या निर्मितीमध्ये फार मोठा होता. टॉलस्टॉय, दोस्तोव्हस्की असे लेखक तिथे झाले. जगात शेक्सपिअरचं जे स्थान नाटकात आहे, ते या दोन कादंबरीकारांचं स्थान मानलं जातं. स्टॅलीनची राजवट आल्यावर अनेक बंधनं घातली. तुम्ही हेच लिहिलं पाहिजे, मार्क्सवादी तत्वज्ञान तुमच्या लेखनात आलंच पाहिजे.

व्यक्ती समाजाचा घटक आहे. त्यामुळे व्यक्ती नव्हे, समाज महत्त्वाचा. त्यामुळे व्यक्तीच्या नको तर समाजाच्या भावना व्यक्त करा. ही बंधनं ज्यांनी तोडली त्यांची सैबेरियात रवानगी केली. नाही तर हत्या केल्या. किती तरी लेखक मारले गेले. सैबेरियासारख्या अतीशीत प्रदेशात जिथं माणूस जगणं अशक्य आहे, तिथं लेखक हद्दपार केले गेले. त्यामुळं स्टॅलीनच्या काळात 1920 पासून रशियाचं विभाजन होईपर्यंत संपूर्ण वाङ्?मयीन वातावरण अतिशय वाईट अशा प्रकारचं होतं. त्यामुळं थॉ हा काळ तयार झाला. बर्फ वितळून उबदार अशी हवा तयार होते आहे, असं वातावरण नंतर रशियात आलं. त्या नंतर रशियन कादंबरीनं पुन्हा उभारी घेतली. झिवॅगो या कादंबरीला नोबेल पुरस्कार मिळाला.

एका हिंदूनं मुसलमान घरातील मुलाशी, मुलीशी लग्न केलं की झालं लोकांनीच मारायचं. हे सुरू झालं तर आचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य नष्ट व्हायला लागेल. हे एकदा सुरू झालं की तुमची संस्कृती पूर्ण रसातळाला जाते. तुम्ही केवळ पशू म्हणून जगायला लागता. खाणं, पिणं याच्यापलीकडे तुम्हाला काहीच करता येत नाही. माणूस हा माणूस आहे, कारण तो विचार करतो. विचाराप्रमाणे वर्तन करतो. आचार स्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य समाजात आवश्यक आहे.

■ ■ ■

# ..अन्यथा, ऱ्हास अटळ आहे!



**समीर गायकवाड**

उत्तम कथा, कसदार अभिनय, दर्जेदार निर्मितीमूल्ये, अफलातून लोकेशन्स आणि चोख मार्केटिंग यांच्या बळावर दाक्षिणात्य सिनेमांचा यशोरथ वेगाने धावतोय. त्याला आवर घालण्याची चर्चा करण्याऐवजी हिंदी आणि मराठी सिनेमांनीही तशी धाव घेण्याची तयारी केली पाहिजे. त्यासाठी पुष्पाच्या आडून येणाऱ्या हाका सावधपणे ऐकल्या पाहिजेत !

अल्लू अर्जुन अभिनित पुष्पा - द रुल हा सिक्वेलपट प्रदर्शित होऊन दोन आठवडे झाले आहेत. मूळच्या तेलुगू भाषेतील या सिनेमाने एव्हाना भारतीय सिनेमांच्या उत्पन्नाचे आजवरचे रेकॉर्ड मोडले आहेत. हिंदीसह अन्य प्रादेशिक भाषांमध्येही हा सिनेमा प्रदर्शित झाला आहे. पहिल्या आठवड्यात एक हजार कोटींची कमाई करणारा तो पहिला सिनेमा ठरला आहे. वास्तविक या सिनेमात व्हीएफएक्स आणि धमाकेदार ॲक्शनची स्टाइलबाज मांडणी वगळता विशेष काही नाही. त्यातील गाणीही पहिल्या भागाच्या तुलनेत जास्त लोकप्रिय झाली नाहीत. तरीही तो इतकी कमाई कशी करू शकला?

**मार्केटिंग, पब्लिसिटीचे यश**

पुष्पाचे हे यश त्याच्या तुफान मार्केटिंग आणि माऊथ पब्लिसिटीमध्ये आहे. प्रदर्शनापूर्वीच केवळ टिझर आणि ट्रेलरच्या माध्यमातून तसेच ब्रँड पब्लिसिटीतून जवळपास शंभर कोटींची कमाई या सिनेमाने केली.

या सिनेमाच्या डोळे दीपवणाऱ्या कमाईचे गणित विक्रमी स्क्रीन ब्लॉकिंग आणि बुकिंगमध्येही दडले आहे. देशभरातील शेकडो थिएटर या सिनेमासाठी आधीच ब्लॉक केले गेले, तर काही हजार स्क्रीन बुक करण्यात आले. पुष्पा रिलीज होईल, तेव्हा प्रेक्षकांना दुसऱ्या सिनेमांचे फारसे ऑप्शन राहणार नाहीत, याची दक्षता वितरकांकडून घेतली गेली. काही मेट्रो शहरांत पहिल्या ठराविक दिवसांत तिकीट दरही वाढीव ठेवले गेले. जोडीला टीव्ही चॅनल, सोशल मीडिया, प्रिंट मीडिया तसेच गॉसिपिंगमधून पुष्पा सतत चर्चेत राहील, याची नीट खबरदारी घेतली गेली. अशा सगळ्या गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणजे या सिनेमाने केलेली विक्रमी कमाई !

**आशय, शैली अन् तंत्राचे नावीन्य**

पुष्पा - दोन'चे हे आर्थिक यश एखादा सिनेमा काढताना व्यावसायिक गणिते कशी मांडावीत, याचे उत्तम उदाहरण ठरावे. या तुलनेत फार कमी हिंदी सिनेमे अशी अफाट कमाई करतात. या वर्षी आलेल्या सिनेमांमध्ये चांगल्या कमाईच्या बाबतीत ॲनिमल, लापता लेडीज, तसेच पठाण, जवान, गदर- भाग दोन अशी काही मोजकी नावे घेता येतील. मात्र, दक्षिणेकडील सिनेमे विलक्षण प्रमाणात तिकीटबारीवर कमाई करताहेत.

लोकमानसाला भिडणारा आशय, वेगळ्या व्यक्तिरेखा, अनोखी शैली आणि नव्या तंत्रज्ञानाचा नेमका वापर यामुळे त्यांना हे यश मिळत आहे, ते कमी लेखता येणार नाही. एस. एस. राजामौलींचा आरआरआर, अभिनेता यशचा ॲक्शनपट केजीएफ-२ आणि अल्लू अर्जुनचा पुष्पा : द राइज या सिनेमांनी देशभरातील प्रेक्षकांच्या मनावर जे गारुड केलं, तशी संधी हिंदी चित्रपटांनाही होती; मात्र तिचे सोने करता आले नाही.

**हिंदी सिनेमे का मागे पडले?**

दक्षिणेच्या मानाने हिंदी सिनेमा मागे पडलाय, हे मान्यच करावे लागेल. एक काळ होता, जेव्हा सगळीकडे केवळ येऊ घातलेल्या हिंदी सिनेमांची चर्चा असायची. त्यातली गाणी, सीन, संवाद, ॲक्शन, तांत्रिक वैशिष्ट्य यांची माहिती झळकत राहायची. ही वातावरणनिर्मिती सिनेमाच्या पथ्यावर पडायची. हा प्रकार अनेकदा आताच्या पेड मार्केटिंगच्या स्वरूपाचा असायचा, मात्र त्याचे बाह्यरुप बटबटीत नव्हते.

आता परिस्थिती बदलली. माध्यमांचा सुकाळ आहे, माहितीचा भडिमार आहे, तरीही आगामी काळात कोणते हिंदी सिनेमे प्रदर्शित होणार आहेत, याबद्दल लोकांमध्ये फारशी उत्सुकता दिसत नाही. उलट दक्षिणेकडील कोणते सिनेमे कधी रिलीज होणार आहेत, त्यांचा यूएसपी काय आहे, याविषयी लोक भरभरून बोलतात. दाक्षिणात्य सिनेमांना मिळालेले व्यावसायिक यश अभिनंदनपात्र का आहे, याची अलीकडे चर्चा होते. त्यातून धडा घेत हिंदी सिनेमानेही थोडीफार कूस बदलायला सुरूवात केली आहे. ओटीटीवरील तसेच नियमित हिंदी सिनेमांच्या आशय- विषयात याचे प्रतिबिंब दिसू लागले आहे. वितरण, विपणन पद्धतीतही बदल होत आहेत. या गोष्टींमुळे फरक पडला आणि त्यात सातत्य राहिले, तरच हिंदी सिनेमांचे जुने दिवस परत येतील.

**मराठी सिनेमा कुठं आहे..?**

या सगळ्याच्या तुलनेत मराठी सिनेमा कुठे दिसतो, याचे उत्तर निराशाजनक आहे. त्याच त्या साचेबद्ध कथा, त्यातील त्याच बंदिस्त व्यक्तिरेखा, त्या साकारणारे तेच ते चेहरे, प्रयोगशीलतेचे दुर्भिक्ष्य आणि कमालीचे कल्पनादारिद्र्य असलेले सादरीकरण! अशा पठडीबद्ध सिनेमांकडे मराठी प्रेक्षकही हल्ली फारसा वळत नाही. एखाद्याने वेगळा प्रयोग करत, नव्या दमाच्या लोकांना घेऊन, कसदार आशयाचा सिनेमा काढला तर त्यालाही यश मिळत नाही, कारण त्याची काहीच पब्लिसिटी झालेली नसते. त्याला किमान पन्नास स्क्रीनही मिळत नाहीत, हेही वास्तव आहे.

ही सगळी विलक्षण साचलेपणाची, उदासीनतेची लक्षणे आहेत. शंभर वर्षांहून मोठा वारसा असलेल्या मराठी सिनेमाच्या परिघात शंभर कोटीची कमाई करणारा सैराटचा एकच सुवर्णबिंदू आहे. अलीकडे तर मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, कल्याण - डोंबिवली इतकेच मराठी सिनेमाचे क्षेत्र उरलेय की काय, असे वाटण्यासारखी स्थिती आहे. ग्रामीण तसेच निमशहरी नागरजीवनाचे फारसे प्रतिनिधित्व तो करत नाही. मग त्या भागातील लोक मराठी सिनेमावर फुली मारत असतील, तर त्यात त्यांचा दोष नाही. हिंदी आणि मराठी सिनेमांनीही तशी धाव घेण्याची तयारी केली पाहिजे. त्यासाठी पुष्पाच्या आडून येणाऱ्या हाका सावधपणे ऐकल्या पाहिजेत!

■ ■ ■

# गुन्हेगारी आणि पारंपरिक मूल्ये

**डॉ. भूषणकुमार उपाध्याय**

आपली जुनी समाजव्यवस्था तुटून गेली, पण जी नवीन व्यवस्था आली, ती तेवढी प्रभावशाली नाही. त्यामुळे गुन्हेगारीच्या मुळावर इलाज करण्यासाठी भारतीय ज्ञान-परंपरा जोपासत, प्रासंगिक गोष्टींचे पुनरुज्जीवन करावे लागेल. संस्कारांची परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधला, तर समाजातील गुन्हे निश्चित कमी होतील.

समाजामध्ये दिवसेंदिवस सर्वच प्रकारच्या गुन्हेगारीची वाढ होत आहे. त्यातही महिलांच्या बाबतीत घडणारे गुन्हे अत्यंत चिंताजनक आहेत. त्याचवेळी सायबर फ्रॉडने उच्छाद मांडला आहे. आर्थिक गुन्हांचा विळखाही वाढत आहे. एकीकडे गुन्हे नियंत्रणात पोलिसांची दमछाक होत आहे, तर दुसरीकडे सर्व न्यायालयांमध्ये प्रचंड प्रमाणात गुन्हे प्रलंबित आहेत. अशा पार्श्वभूमीवर समाजात गुन्हे का घडतात, याचा याविषयी अनेक मते मांडली जातात.

काही तज्ज्ञ सांगतात की, आर्थिक कारणामुळे गुन्हे घडतात. काहींच्या मते गुन्हे घडण्याचे कारण सामाजिक असते. आणखी काही जण सांगतात की त्यामागे मानसशास्त्रीय कारणे असतात, तर काहींना गुन्हे घडण्यामागे सांप्रदायिक उन्माद हेही कारण असल्याचे वाटते. गुन्ह्यांचे अवलोकन केल्यावर असे दिसून येते की, प्रासंगिकतेनुसार ही सगळी कारणे कुठे ना कुठे लागू होतात. पण, सगळ्यात महत्त्वाचे कारण माणसाच्या जडणघडणीत दडलेले असते. या जडणघडणीलाच भारतीय संस्कृतीमध्ये संस्कार म्हणतात. लहानपणापासून माणूस जे बघतो आणि अनुभवतो, त्या गोष्टी त्याच्या मेंदूवर कायमच्या कोरल्या जातात आणि भविष्यात त्याची वागणूकही त्यानुसारच घडत जाते.

भारतीय संस्कृती सर्वसमावेशक आहे आणि ती वैश्विक मूल्यांवर आधारित आहे. या संस्कृतीमध्ये सर्वांच्या भल्याची कामना करण्यात आलीआहे. सर्वे भवन्तु सुखिनः हा या संस्कृतीचा उद्घोष आहे. वसुधैव कुटुंबकम् हा संस्कृतीचा आत्मा आहे. स्त्रीला या संस्कृतीने देवी मानले आहे. कर्माच्या सिद्धांताप्रमाणे जो जसे करेल, तसे भरेल हाही या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे.

भारतीय संस्कृतीने प्रत्येक नात्याला एक वेगळे नाव दिले आहे. ही संस्कृती आध्यात्मिक आहे. ती भौतिक सुखापेक्षा आत्मिक आनंदला जास्त महत्त्व देते. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपूंवर कसे नियंत्रण ठेवता येईल, याचा साकल्याने विचार करण्यात आला आहे. ज्ञान, भक्ती आणि कर्मयोग हे मनाच्या शुद्धीचे मार्ग आहेत आणि ते आपापल्या पद्धतीने माणसाला ईश्वराजवळ नेतात, अशी या संस्कृतीची धारणा आहे.

अशा या भारतीय संस्कृतीच्या मुळाशी आत्मसंयम आहे. आत्मसंयम म्हणजे मनावर ताबा मिळवणे. तो कसा मिळवावा, यासाठी अनेक उपाय सांगण्यात आले आहेत. इंद्रियनिग्रह हा अशा आत्मसंयमाचाच भाग आहे. भारत हा आध्यात्मिक पाया असलेला देश आहे. त्यामुळे साहजिकच आध्यात्मिक साधनेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राचीन काळापासून या साधनेद्वारे आत्मा आणि परमात्म्याचा शोध घेतला जात आहे. त्यामुळे जीवनाकडे पाहण्याची दृष्टी विशाल आणि व्यापक बनली आहे.

ही संस्कृती सगळीकडे ईश्वराचे अस्तित्व असल्याचे मानते. अगदी दगड-माती, झाडे-वेली, नदी-सागर, पक्षी-प्राणी या सर्वांची पूजा केली जाते. त्यामुळे दयाभाव हे या संस्कृतीचे मूळ आहे. षड् आस्तिक दर्शन वेगवेगळ्या पद्धतीने सत्याचे वर्णन करते. एकम् सद् विप्रा बहुधा वदन्ति। या उक्तीप्रमाणे असे मानले जाते की, सत्य एकच आहे, विद्वान लोक ते विविध प्रकारे मांडतात.

गुन्हेगारी मानसिकता वाढू नये म्हणून भारतीय जीवनपद्धतीचे हे सगळे संस्कार आपल्या शिक्षण पद्धतीत समाविष्ट होणे गरजेचे आहे. इंग्रजांनी जी शिक्षण पद्धत लागू केली, ती पूर्णपणे भौतिकवादी दृष्टिकोनावर आधारित आहे. या शिक्षण पद्धतीमुळे भारताची अस्मिताच अस्तित्वहीन झाली आहे. शिक्षण एक चांगले चारित्र्य निर्माण करते. स्वस्थ शरीर, विकसित मन आणि नैतिक भावना या शिक्षण पद्धतीचे मूलाधार आहेत. शिक्षण माणसामध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करते. त्यामुळे लहान वयातच कायद्यांचे पालन करणे शिकवायला हवे. संविधान सर्वोच्च आहे आणि त्याचे पालन करणे आपले आद्यकर्तव्य आहे, ही गोष्ट सर्व मुलांच्या मनात रुजवली पाहिजे. अन्यथा, गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविणे कठीण होऊन बसेल.

■ ■ ■



## रणबीर-आलियाच्या लेकीने जिंकली नेटकऱ्यांची मन

बॉलिवूड सेलिब्रिटींनीही सोशल मीडियावर खिसमस सेलिब्रेशनचे फोटो आणि व्हिडीओ पोस्ट केले. बॉलिवूड इंडस्ट्रीतील अत्यंत प्रतिष्ठित कपूर कुटुंबीय हे दरवर्षी खिसमसनिमित्त खास फॅमिली लंचचं आयोजन करतात.

यावेळी कुटुंबातील सर्व सदस्य एकमेकांना भेटतात आणि जेवणाचा आस्वाद घेतात. या पार्टीला सर्वांत आधी अभिनेता रणबीर कपूर त्याची पत्नी आलिया भट्ट आणि मुलगी राहा कपूरसोबत पोहोचला होता. यावेळी चिमुकल्या राहाने सर्वांचं लक्ष वेधलं. पार्टीला जाण्याआधी तिघांनी पापाराझींसमोर फोटोसाठी पोझ दिले. राहानेही तिच्या गोड आवाजात पापाराझींना हाय असं म्हटलं. त्यानंतर तिने खिसमसच्याही शुभेच्छा दिल्या.

या व्हिडीओवर नेटकऱ्यांकडून लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होत आहे.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये आधी आलिया भट्ट गाडीतून उतरल्यानंतर पापाराझींसमोर येते. ह्लथोडं हळू बोला, ती घाबरतेह्व, असं म्हणत ती पापाराझींना विनंती करते. त्यानंतर रणबीर गाडीमधून राहाला कडेवर घेऊन उतरतो.

यावेळी राहाने गुलाबी रंगाचा ड्रेस परिधान केल्याचं पहायला मिळतं. फोटोग्राफर्सना पाहताच ती त्यांच्याकडे हातवारे करून हाय असं म्हणते. खिसमस पार्टीसाठी आलियाने लाल रंगाचा ड्रेस परिधान केला, तर रणबीरचा कॅज्युअल लूकसुद्धा नेटकऱ्यांच्या पसंतीस उतरला.

सर्वजण तिला हाक मारून फोटोसाठी पोझ द्यायला सांगत होते. या फोटो सेशननंतर जेव्हा राहा परत जाऊ लागली, तेव्हा मागे वळून तिने पापाराझींना मेरी खिसमस असं म्हटलं आणि त्यांना फ्लाइंग किससुद्धा दिला. ती आता सर्वांचीच आवडती झाली आहे.

■ ■

## ऐश्वर्या रायच्या भरजरी लेहंग्यांची थेट ऑस्करमध्ये निवड



ऐश्वर्या राय सध्या तिच्या आणि अभिषेकच्या नात्यावरून बरीच चर्चेत असते. तसचे अभिषेक आणि तिच्याबद्दलच्या कोणत्याना कोणत्या चर्चा या होतच असतात. नुकतेच आराध्याच्या शाळेतील कार्यक्रमात ऐश्वर्या आणि अभिषेक एकत्र दिसले होते तसेच त्यांनी डान्सही केला होता. याबद्दलही बऱ्याच चर्चा होताना पाहायला मिळाल्या. पण आता ऐश्वर्या राय एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे.

मिस वर्ल्ड असणारी ऐश्वर्या सौंदयासोबतच तिच्या अभिनयासाठी सुद्धा ओळखली जाते. ऐश्वर्या राय ज्या कारणाने चर्चेत आली आहे ते कारण आहे तिचा लेहंगा. होय, एका चित्रपटात घातलेल्या तिच्या नक्षीदार लेहंग्यामुळे ती चर्चेचा विषय बनली आहे. ऐश्वयार्चा जोधा-अकबर हा चित्रपट 2008 मध्ये प्रदर्शित झाला होता.

**ऐश्वर्या रायच्या लेहंग्याची चर्चा जगभर**

ऐश्वर्या राय आणि हृतिक रोशन यांनी ह्यजोधा-अकबरह्ण मध्ये मुख्य भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटात दोघांच्याही अभिनयाचं तर कौतुक झालं होतं. तसेच या चित्रपटातील गाणीदेखील प्रसिद्ध झाली होती. आजही या चित्रपटातील गाणी प्रेक्षकांच्या नक्कीच फेव्हरेट लिस्टमध्ये आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवरही जबरदस्त हिट ठरला. तसेच या चित्रपटातील ऐश्वर्याचा लूक फार चर्चेत आला होता.

ऐश्वर्याने या चित्रपटात सुंदर असे भरजरीत लेहंगे, आकर्षक दागिने घातले होते. याची गाणी सुद्धा खूप गाजली होती. 16 वर्षांपूर्वी आलेल्या जोधा-अकबर या चित्रपटात ऐश्वर्याने घातलेल्या लेहंग्याची आता इतक्या वर्षांनंतर दखल घेण्यात आली आहे.

**ऐश्वर्याच्या लेहंग्याची थेट ऑस्करमध्ये**

ऐश्वर्याच्या लेहंग्याची थेट ऑस्करमध्ये निवड झाली आहे. हा सुंदर लेहंगा ऐश्वयार्ने चित्रपटात लग्नाच्या सीनवेळी घातला होता. या लेहंग्याला सुप्रसिद्ध डिझायनर नीता लुल्लाने तयार केले आहे. हा नक्षीदार लेहंगा म्हणजे एक अद्वितीय मास्टरपीस आहे. तो लेहंगा आता जगभरातील लोकांना दाखवण्यात येणार आहे.

■ ■

## दाक्षिणात्य सिनेसृष्टीसाठी धक्कादायक वर्ष

दाक्षिणात्य सिनेसृष्टीसाठी 2024 वर्ष काहीसं नरम गरम राहिलं आहे. या वर्षात साऊथच्या सिनेमांनी प्रचंड गल्ला कमावला. हिंदीलाही मागे टाकेल इतकं मोठं यश मिळवलं. त्यामुळे साऊथची वाहवा झाली. मात्र, अभिनेते, दिग्दर्शक आणि इतरांच्या अटकेमुळेही साऊथ सिनेमा बराच चर्चेत राहिला. खास करून मल्याळम सिनेसृष्टीसाठी 2024 हे वर्ष अत्यंत धक्कादायक राहिलं आहे.

हेमा समिती रिपोर्ट आला आणि मल्याळम सिनेमातील कटू सत्य बाहेर आलं. मल्याळम सिनेसृष्टीत अभिनेत्रींच्या होणाऱ्या लैंगिक शोषणाचा पडदाच या समितीने फाडला. त्यामुळे अनेक प्रमुख व्यक्तींना अटक झाली. लैंगिक शोषणापासून हत्यापर्यंत अनेक घटनांमुळे या प्रसिद्ध कलाकारांनाही अटक झाली. 2024 मध्ये अटक झालेल्या कलाकारांवर टाकलेली ही नजर.

**अल्लू अर्जुन**

सध्या अलू अर्जुनच्या अटकेचं प्रकरण बरंच गाजत आहे. 13 डिसेंबर रोजी हैदराबाद पोलिसांच्या टास्क फोर्सने अल्लू अर्जुनला अटक केली. पुष्पा 2 च्या विशेष स्क्रीनिंग दरम्यान झालेल्या गोंधळामुळे एका महिलेच्या मृत्यूची घटना घडली होती. याच प्रकरणात पोलिसांनी अल्लू अर्जुनला अटक केली आहे.

या प्रकरणात त्याला एक दिवस तुरुंगातही राहावं लागलं. सध्या तो जामिनावर आहे. या प्रकरणानंतर बरंच राजकारण झालं. त्याच्या घरात घुसून काही लोकांनी तोडफोडही केली होती. त्यामुळे त्याला घर सोडून दुसरीकडे जावं लागलं.

**अभिनेत्री कस्तुरी**

कस्तुरीला काही महिन्यांपूर्वी अटक करण्यात आली होती. तेलंगणाविरुद्ध विधान केल्यामुळे पोलिसांनी तिला अटक केली. तिची ओळख लपवण्यासाठी ती काही दिवस चुपचाप घरात होती. मात्र, हैदराबाद पोलिसांनी अखेर तिला अटक केली होती.

**बाला**

अभिनेता बाला याला ऑक्टोबर महिन्यात अटक केली होती. त्याच्या आधीच्या पत्नीच्या तक्रारीवरून त्याला अटक करण्यात आली. सोशल मीडियावर स्वतःच्या मुलीला बदनाम केल्याच्या आरोपावरून त्याच्या विरोधात खटला भरण्यात आला आहे.



**सिद्धीक**

हेमा समितीचा रिपोर्ट आल्यानंतर अनेक महिलांनी शोषणाच्या तक्रारी केल्या. यातील ब?याचश्या तक्रारी या अभिनेता सिद्धीकच्या विरोधात होत्या. 2016 मध्ये एका महिला कलाकारवर लैंगिक अत्याचार केल्याच्या आरोपावर सिद्धीकला अटक करण्यात आली.

**बायजू संतोष**

मद्यपान करून वाहन चालवताना बायजू संतोषला अटक करण्यात आली होती. थोडक्यात दुर्घटना घडली होती आणि त्याच्या वाहनाने बाईकला धडक दिली होती.

**गणपती**

गणपतीला मद्यपान करून वाहन चालवण्याच्या आरोपावरून अटक करण्यात आली होती. मात्र, नंतर त्याला जामिनावर सोडण्यात आलं होतं.

**विनायकन**

मद्यपान करून धांगडधिंगा केल्याचा विनायकनवर आरोप आहे. गोव्याहून कोचीला जात असताना त्याने मद्यपान करून गोंधळ घातला होता. इंडिगो एअर लाईन्सच्या कर्मचाऱ्यांसोबत वाद घालून तो अडचणीत आला होता.

**मुकेश**

अभिनेता मुकेश याच्यावर एका अभिनेत्रीने बलात्काराचा आरोप केला होता. ही 2011ची घटना होती. पण ऑक्टोबरमध्ये त्याला अटक करण्यात आली होती. सध्या तो जामिनावर आहे.

**दर्शन थूगूदेप**

कन्नड चित्रपट अभिनेता दर्शन थूगुदीपला जून महिन्यात हत्या प्रकरणात अटक झाली होती. रेणू स्वामीच्या मृत्यूशी संबंधित आरोपावरून त्याला अटक केली. हे प्रकरण केवळ कर्नाटकच नव्हे तर संपूण देशभरात गाजलं होतं.



■ ■ ■

## अवघ्या 3000 रुपयांवर नोकरी

अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा नेहमीच चर्चेत असते. तिच्या चित्रपट तसेच अभिनयापेक्षाही तिच्या खाजगी आयुष्याबद्दल जास्त चर्चा होताना दिसते. नुकतचं तिने झहीर इक्बालसोबत लग्न केलं त्यानंतरही बरीच चर्चा झाली. काही जणांनी तिला शुभेच्छा दिल्या तर काही जणांनी तिला ट्रोलही केलं.

अभिनय ही सोनाक्षीची पहिली आवड कधीच नव्हती. सोनाक्षी सिन्हाच्या चित्रपटांबद्दल आपल्याला माहित आहे पण ती अभिनय क्षेत्रात येण्याआधी तिच्या आयुष्यात काय करत होती किंवा तिचं शिक्षण काय आहे? याबद्दल फार माहित नाही.

तुम्हाला हे वाचून आश्चर्य वाटेल की सोनाक्षीची पहिली आवड ही ॲक्टींग नाही तर दुसरं क्षेत्र होतं. शिवाय ती फिल्म इंडस्ट्रीमध्ये येण्याआधी एका ठिकाणी कामही करत होती. ज्याचे तिला 3000 मानधन मिळत असे.



सोनाक्षीचा पहिला चित्रपट सलमान खानसोबत होता. 2010 मध्ये रिलीज झालेला हा सिनेमा म्हणजे दबंग.

दबंगमुळे सोनाक्षीचा चेहरा बॉलिवूडमध्ये प्रसिद्ध झाला आणि नंतरही तिला अनेक चित्रपट ऑफर झाले. तसेच ते काहीप्रमाणात तिचे चित्रपट हीटही ठरले. मात्र दबंग आधी तिने कधीच अभिनय क्षेत्रात येऊ असा तिने विचारही केला नव्हता. तिने वेगळ्याच एका क्षेत्रात काम केले होते.

सोनाक्षी सिन्हाने आर्य विद्या मंदिर शाळेत शिक्षण घेतले आहे. शाळेनंतर, तिने SNDT महिला विद्यापीठाच्या प्रेमलिला विठ्ठलदास पॉलिटेक्निकमधून फॅशन डिझायनिंगमध्ये पदवी प्राप्त केली. 2005 मध्ये प्रदर्शित झालेल्या मेरा दिल लेके देखो या चित्रपटाचे पोशाखही तिने डिझाइन केले होते. सोनाक्षीला फॅशन डिझायनिंगमध्ये करिअर करायचे होते. फिल्मी दुनियेत येण्यापूर्वी सोनाक्षी सिन्हा फॅशन डिझायनिंगमध्ये काम करायची. एका मुलाखतीत सोनाक्षीने सांगितले होते की, सर्वात आधी तिने एका फॅशन शोमध्ये स्वयंसेवक म्हणून काम केले, ज्यासाठी तिला 3000 हजार रुपये मिळाले.

या शोदरम्यान ती सलमान खानलाही भेटली होती. फिल्म इंडस्ट्री ही सोनाक्षीची पहिली निवड कधीच नव्हती असंही तिने म्हटले आहे.

सोनाक्षीला बॉलिवूडमध्ये 14 वर्षे झाली आहेत. तिच्या पहिल्याच चित्रपटासाठी तिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला होता. रिपोर्टनुसार सोनाक्षीची एकूण संपत्ती 100 कोटी रुपये आहे. यामध्ये चित्रपटाचे मानधन, ब्रँड जाहिराती आणि गुंतवणूक यांचा समावेश आहे. 2024 मध्ये रिलीज झालेल्या हीरामंडी मालिकेतही सोनाक्षी दिसली होती. आणि तिच्या अभिनयाचे प्रचंड कौतुकही झाले. दरम्यान, एका रिपोर्टच्या अहवालानुसार, झहीर इक्बालची एकूण संपत्ती 1-2 कोटी रुपये आहे.

■ ■

## गुणरत्न सदावर्ते लवकरच चित्रपटात



बिग बॉसच्या 18 व्या पवार्मुळे प्रसिद्धी झोतात आलेले ॲड. गुणरत्न सदावर्ते तसे अनेक विषयांमुळे चर्चेत असतात. कधी बिग बॉस, कधी शरद पवार आणि उद्धव ठाकरेंवर केलेल्या वक्तव्यामुळे, तर कधी एसटी बँकेमध्ये गैरव्यवहारबद्दलची चौकशी असेल. अशा कारणांमुळे ते फेमस आहेत.

गुणरत्न सदावर्ते त्यांच्या बोलण्याच्या आणि आवजाच्या हटके स्टाईलसाठी ओळखले जातात. त्यांचा डंके की चोट पे हा डायलॉग तर अगदी सर्वत्र प्रसिद्ध झालेला आहे. प्रत्येक वेळी ते असे काही स्टेंटमेंट देतात की ते व्हायरल होतं आणि त्याची बातमी होते. आताही सदावर्ते अशाच एका विषयावर बोलले आहेत ज्याबद्दल सर्वत्र चर्चा आहे. ती म्हणजे सदावर्ते हे लवकरच चित्रपटात झळकणार आहेत.



गुणरत्न सदावर्ते यांनी याबद्दल खुलासा केला आहे. सदावर्तेंनी भाजप सरकार, एसटी बँकेमध्ये गैरव्यवहार केल्याच्या आरोप अशा अनेक विषयांवर बोलल्यानंतर त्यांनी थेट स्वतःच्या चित्रपटाची घोषणा केली. ते म्हणाले की, बिग बॉस नंतर जगभरामध्ये माझी ख्याती निर्माण झाली आहे. माझी एक वेगळीच ओळख तयार झाली. मी रुपेरी पडद्यावर सुद्धा येणार आहे. निर्माते -दिग्दर्शकांसोबत माझं बोलणं सुरू आहे. त्यामुळे लवकरच मी चित्रपटात दिसेल, असा खुलासा त्यांनी केला आहे.

गुणरत्न सदावर्ते यांचे वडील पेशाने पोलिस होते आणि स्वतः गुणरत्न सदावर्ते पेशाने वकील आहेत. गुणरत्न सदावर्ते यांचे कॉलेजच्या दिवसांमध्ये त्यांची प्रेयसी जयश्रीसोबत लग्न झाले. जयश्री ह्या पेशाने डॉक्टर असून त्यांना कायद्याबद्दल प्रचंड आवड आहे, त्यामुळे ते अनेकदा दोघेही एकत्र दिसत असतात. गुणरत्न आणि त्यांची पत्नी दोघेही करिअरच्या दृष्टीने वचनबद्ध आहेत. अनेकदा सदावर्ते कपलचे व्हिडिओ इन्स्टाग्रामवर व्हायरल होत असतात. गुणरत्न आणि जयश्री यांना एक मुलगी आहे, जिचं नाव झेन आहे.

■ ■ ■

## कियारा अडचणीत



कियारा अडवाणी लवकरच राम चरणसोबत गेम चेंजर या चित्रपटात दिसणार आहे. हा चित्रपट 10 जानेवारी 2025 रोजी प्रदर्शित होणार आहे. नुकतेच या चित्रपटातील 'धोप' हे गाणे प्रदर्शित झाले.

दरम्यान, कियाराने तिच्या सोशल मीडियावर या गाण्याच्या डान्स रिहर्सलचा एक व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामध्ये नृत्यदिग्दर्शक मास्टर जानीचा उल्लेख होता, ज्यावर बलात्काराचा आरोप आहे. यानंतर यूजर्स कियारावर भडकले. मात्र, कियाराने नंतर तिचे कॅप्शन बदलले. खरं तर, कियाराने तिच्या इंस्टाग्रामवर एका पोस्टच्या कॅप्शनमध्ये लिहिले होते, 'मला आठवते जेव्हा मी मास्टर जानीची कोरिओग्राफी पाहिली तेव्हा मला आश्चर्य वाटले की आम्ही ते कसे करू, परंतु आमच्या कामाची ही खास गोष्ट आहे की आम्ही नेहमीच काहीतरी करत असतो- नवीन गोष्टी शिकतो.

कियारा अडवाणीने कॅप्शन एडिट केले. कियाराचे कॅप्शन वाचून लोक संतापले. एका कमेंटकर्त्याने लिहिले की, 'बॉलीवूड कलाकारांना कशाचीही पर्वा नाही.', दुसऱ्याने लिहिले, 'जानी मास्टरला जामीन मिळाल्यानंतर आणि त्याचा राष्ट्रीय पुरस्कार काढून घेतल्याची बातमी असताना कियाराने हे का लिहिले?', तिसऱ्याने लिहिलं, 'महिला असून, तू तुझ्या पोस्टमध्ये जानी मास्टरचं नाव का घेतलंस? तुला त्याच्या ताज्या बातम्या माहीत नाहीत का?'.

सोशल मीडियावर ट्रोल झाल्यानंतर कियाराने तिच्या कॅप्शनमधून जानी मास्टरचे नाव काढून टाकले आणि त्यानंतर दिग्दर्शक आणि सहकलाकारांचे कौतुक केले.

गेम चेंजर या चित्रपटात राम चरण डबल रोलमध्ये दिसणार आहे. त्याच्यासोबत कियारा अडवाणी, अंजली, एसजे सूर्या, श्रीकांत आणि समुथिराकणीसारखे स्टार्स आहेत. चित्रपटात राम चरण एका आयएएस अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहे, जो भ्रष्ट व्यवस्थेला आव्हान देतो.

तेलुगू कोरिओग्राफर जानी मास्टर म्हणजेच शेख जानी बाशा याच्यावर 21 वर्षीय तरुणीने लैंगिक छळ केल्याचा आरोप केला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर, विशेष ऑपरेशन पथकाने (SOT) त्याला 19 सप्टेंबर रोजी गोव्यात अटक केली. यानंतर सर्वोत्कृष्ट कोरिओग्राफरचा राष्ट्रीय पुरस्कारही त्याच्याकडून हिसकावून घेण्यात आला. 2022 मध्ये रिलीज झालेल्या धनुषच्या 'तिरुचित्रंबलम' चित्रपटातील 'मेघम करुकथा' या गाण्याच्या नृत्यदिग्दर्शनासाठी जानी मास्टर यांना राष्ट्रीय पुरस्कार देण्यात आला. त्यांनी सतीश कृष्णनसोबत हे गाणे कोरिओग्राफ केले.

■ ■ ■